साप्ताहिक

# माणूस

१५ मार्च८६/२ रुपये



## डॉ.काशिनाथ घाणेकर नावाचं वादळ

## स्त्री मुक्तीतला 'खारीचा वाटा'

साप्ताहिक

# माणूस

◻

वर्ष : पंचविसावे

अंक : बेचाळिसावा

◻

१५ मार्च १९८६

किंमत : दोन रुपये

◻

संपादक

श्री. ग. माजगावकर

◻

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

◻

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

◻

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◻

: पत्ता :


साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

◻

मुखपृष्ठ–सुरेश नावडकर



# मुंबापुरी

## ◻ महाराष्ट्र देशा…

‘मंगल देशा, पवित्र देशा, दगडांच्या देशा…’ असं एक जे ‘महाराष्ट्र-गीत’ सगळ्या समारंभातून आवर्जून गाण्यात येतं त्यात आम्ही आणखी एक ओळ जोडू इच्छितो. ‘सहा महिन्याच्या टेंपरवायरी मुख्यमंत्र्यांच्या देशा’ अशी ती ओळ असावी. म्हणजे महाराष्ट्र–गीताला एक वेगळंच परिमाण लाभेल.

वसंतराव नाईकांनंतर एकाही मुख्यमंत्र्याने आपली पाच वर्षांची टर्म पूर्ण केली नाही असं काल कुणी तरी म्हणालं. अहो, हे आमच्या राजकीय प्रगल्भतेचं लक्षण नाही तर आणखीन काय? बिहार, हरियाणा वगैरे राज्यात वारंवार मुख्यमंत्री बदलला जातो त्याचं कारण भ्रष्टाचार, बजबजपुरी आणि राजकीय कद्रूपणा. आमच्या महाराष्ट्रात मुख्यमंत्र्याला जावं लागतं त्याचंकारण उच्च नैतिक परंपरेची बूज राखण्याचं ध्येय. (हुश्श!) प्रत्येक मुख्यमंत्री हे ध्येय पाळतो. पाळावंच लागतं. चेहरा थोडा पडतो, इतकंच.

शिवाजीराव आदल्या दिवशी म्हणाले की जजमेंटची प्रत आल्याशिवाय ते कसलाच निर्णय घेणार नाहीत आणि अवघ्या चोवीस तासात त्यांनी राजीनामा देऊन टाकला. हे का? तर उत्तर सोपं आहे. त्यांना नैतिक मूल्ये पाळण्याची इच्छा आठवली. गुरुवारी मध्यरात्री ते फोनवर महामंत्र्यांशी बोलले. राजीवजींनी निलंगेकरांना नैतिक ध्येयाची याद करून दिली. अंतुल्यांनी सुद्धा असाच उच्च मूल्यांसाठी पदत्याग केला होता. इतकं असूनही मऱ्हाटी माणसाची शान काही वाढत नाही. आम्ही आपलं खालमानेनेच जगतो. ज्या नैतिक मूल्यांसाठी भलेभले लोक पदत्याग करतात ती मूल्ये अद्याप बाळसं का धरत नाहीत? असो.

गोविंदाग्रजांनी ‘महाराष्ट्र गीता’त मऱ्हाटी संस्कृतीची महती गायिली आहे. कणाहीन, वळवळणारे राजकारणी हीदेखील आमची थोर परंपरा आहे. तेव्हा महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळवाल्यांनी, आम्ही आधी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्र गीतात मोलाचा बदल करावा.

## ◻ मुख्यमंत्री–राज्यपाल आणि डॉ. गोरे

कोटयावधी रुपयाच्या गैरव्यवहारामुळे मुख्यमंत्रीपद गेल्याच्या घटना महाराष्ट्रात घटल्या आहेत; पण पाच-दहा मार्कांसाठी राज्य सोडण्याची पाळी यावेळी प्रथमच आली असावी.

‘चंद्रकले, तू वेळच्या वेळी अभ्यास केला असतास तर आज माझ्यावर असा भीषण प्रसंग ओढवला नसता,’ असे दुःखाने गदगदून शिवाजीराव पाटील आपल्या मुलीला म्हणाल्याचे आम्हाला खात्रीलायकरित्या समजले आहे. आजकाल सकाळी लवकर उठून दोन तास ते मुलीचा अभ्यास घेतात असेही ऐकले आहे. डॉक्टर गोरे एम्. डी. चे क्लासेस घेत नाहीत, नाहीतर त्यांच्याकडे चंद्रकलेस शिकवणीसाठी पाठवण्याचा त्यांचा विचार होता. असो. हायकमांड देते आणि हायकोर्ट नेते असे म्हणून अखेर पक्षाशी एकनिष्ठ राहायचे असे त्यांनी ठरविले आहे.

राज्यपाल कोना प्रभाकर राव ह्यांनाही झाल्या घटनेचे फार दुःख झाले. ‘शिवबा, पाँडेचरीला माझ्या नातीला मी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून दिला; पण त्यामुळे काही माझे राज्यपालपद गेले नाही. या हायकोर्टाने तुझे पेपर्स फारच कठीण तपासले, त्यामुळे हा बाका प्रसंग ओढवला,’ असे ते मुख्यमंत्र्यांना त्यांचा राजीनामा स्वीकारताना म्हणाल्याचे आम्ही ऐकले आहे.

राजीनामा दिल्यानंतर 'वर्षा' वर पत्रकारांशी बोलताना शिवाजीराव म्हणाले की, वृत्तपत्रांनी एकत्र येऊन महाराष्ट्रात राजकीय अस्थिरता आणण्याचा डाव रचला आहे. शिवाजीराव पाटील गेल्याने आता महाराष्ट्रात नाव घेण्यासारखे राजकीय नेतृत्व उरले नाही असे त्यांच्या सर्व नातेवाईकाचे म्हणणे होते. कमीत कमी चंद्रकलेचे एम्. डी. पुरे होईपर्यंत तरी त्यांनी राजीनामा देऊ नये असाही एक मतप्रवाह होता. स्वच्छ चारित्र्याचा इतका बाऊ केला तर महाराष्ट्रात एकही मुख्यमंत्री टिकायचा नाही असे कॅबिनेटचेही मत पडले. परंतु दिल्लीला त्याचे काय ?


'वृत्तपत्रे आणि हायकोर्ट ह्यांनी एकत्र येऊन ही राजकीय अस्थिरता निर्माण करण्याचा डाव रचला असे तुम्हाला वाटते का ?' अशा एका ज्येष्ठ पत्रकाराने शिवाजीरावांना प्रश्न केला. 'मला हायकोर्टाविषयी काही म्हणावयाचे नाही, परंतु वृत्तपत्रांनी मात्र माझ्यावर अन्याय केला.' –शिवाजीराव म्हणाले.

'कर्नाटकात रामकृष्ण हेगडयांच्याविरुद्ध हायकोर्टाने निर्णय दिला तरी वृत्तपत्रांनी त्यांना डोक्यावर घेतले. त्यांनी राजीनामा देऊनही त्यांना मुख्यमंत्री पदावर पुन्हा बसविले. मग माझ्याच बाबतीत असा अन्याय का ?' असा सवाल त्यांनी केला.

शिवाजीवार स्वतः वकील आहेत. तेव्हा त्यांनी असा प्रश्न उपस्थित करावा हेच नवल आहे. कर्नाटकात हायकोर्टाने कंत्राट पद्धतीवर टीका केली होती. परंतु सरकारवर भ्रष्टाचाराचा आरोप केला नव्हता. तरीही हेगडयांनी राजीनामा दिला आणि त्यांची फेरनिवड झाली. शिवाजीरावांनी आता राजीनामा दिलेलाच आहे. महाराष्ट्रात त्यांच्या नेतृत्वाला पर्याय नाही– महाराष्ट्राचे आपण लाडके मुख्यमंत्री आहोत असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा आता पक्षाच्या आमदारांनाही तसे वाटते का हे पाहायचे. दैव आणि हायकमांड एकदा दिलेली संधी पुन्हा देत नाहीत, असे म्हणतात. तेव्हा शिवाजीरावही ह्या नियमाला अपवाद असायचे कारण नाही. रामकृष्ण हेगडयांशी आपली तुलना करण्याची शिवाजीरावांना इच्छा व्हावी हेच आश्चर्य आहे.

महाराष्ट्राचे दुर्दैव असे की यावेळी प्रथमच राज्यपाल म्हणून नेमणूक झालेल्या कोना प्रभाकर राव ह्यांचे वर्णन 'आचरट' ह्या एकाच शब्दाने करता येईल. आधीचे राज्यपाल इद्रिस लतीफ ह्यांच्या तुलनेत कोना प्रभाकर राव हे दुसरे टोक आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या मुलीची चौकशी करण्याकरता त्यांनी विद्यापीठाचे रजिस्ट्रार राजर्षी ह्यांना राजभवनावर बोलावून घेतले आणि त्यांच्या बरोबर उपकुलगुरू डॉक्टर गोरे ह्यांना विद्यापिठाचा वकील बदलण्यासंबंधीचा निरोप पाठविला. डॉक्टर गोरे आणि परीक्षा विभागाचे प्रमुख अरुणाचलम ह्यांनी तातडीने राजीनामे दिल्याने साऱ्याच प्रकरणाला गंभीर वळण लागले. करायला गेलो एक आणि झाले भलतेच अशी कोना प्रभाकर रावांची स्थिती झाली.




परंतु त्यांची कातडी आमच्या अपेक्षेपेक्षाही जाड निघाली. विद्यापिठाच्या पदवीदान समारंभात जेव्हा विद्यार्थ्यांनी सभागृहात शिरून घोषणा द्यायला सुरुवात केली, तेव्हा राज्यपालांनी उठून आपली बाजू मांडण्याची आवश्यकता होती. राज्यपालासारख्या पदाला नैतिक अधिष्ठानाची मोठी गरज असते. कोना प्रभाकर राव एखाद्या मठ्ठ मुलासारखे सारा प्रकार निर्विकारपणे पहात होते. सर्वात गमतीची गोष्ट म्हणजे इतके रामायण घडले तरी त्यांनी त्यांच्या छापील भाषणातले विद्यापिठातील भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप वगैरे संबंधीचे उतारे वाचून दाखविले.

डॉक्टर गोरे मात्र तीन–चार मिनिटेच बोलले. समारंभ सुरू होण्यापूर्वी आपल्या कार्यालयात बसून त्यांनी त्यांचे छोटे भाषण लिहून काढले होते. आपल्या भाषणात त्यांनी सर्व घटनांचा प्रत्यक्ष उल्लेख केला नाही. परंतु माणसे जेव्हा आपली कृती आणि बोलणे ह्यात एकवाक्यता ठेवतात तेव्हा त्यांच्या शब्दाला जे वजन येते, त्याची प्रचिती त्यांच्या भाषणात आली.

'आपण सर्वजण सत्य बोलणे, धर्माचरण आणि कर्तव्यपालन यासंबंधी बोलतो पण प्रत्यक्ष वेळ आली की मात्र स्वतःची फसवणूक करण्यात समाधान मानतो. आपल्या शिक्षणातून सत्याला सामोरे जाण्याइतके धैर्य अजून आपल्यापाशी नाही.' डॉक्टर गोरे म्हणाले.

त्यांचे भाषण संपताक्षणी साऱ्या सभागृहाने उभे राहून त्यांना मानवंदना दिली.

बाकी सारे ठीक. महाराष्ट्रात राजकीय अस्थिरता आल्याने पत्रकारांना मात्र हा आठवडा चांगला गेला. आता नवा मुख्यमंत्री कोण येणार ह्याबद्दल सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. शंकरराव चव्हाण ह्यांना आणले जाईल असे आम्हाला वाटते. पण ह्यावर पैज मारायची मात्र आमची तयारी नाही. दिल्ली हायकमांड हे स्टेट लॉटरीपेक्षाही भारी विचित्र प्रकरण आहे. आम्ही आपले अंदाज वर्तवायचे आणि अखेर सुनिल दत्त ह्यांची एकमताने निवड व्हायची. असो. हा मजकूर तुमच्या हाती पडेपर्यंत नवा भिडू निवडलेलाही असेल !

८ मार्च, ८६ –विष्णू जयदेव

## सांस्कृतिक नागपूर

**श्याम** रानडे, मधुकर वामोरकर, श्रीकात दाभाडे, सदानद जोशी आणि परिमल घोष या पाच जणानी येथल्या सिताबर्डीवरील माहिती केंद्रात आपल्या कलात्मक फोटोचे एक प्रदर्शन आयोजित केले पचमचे हे सातवे प्रदर्शन होते. फोटोंच्या ह्या जगाने नागपूरातल्या जाणत्या लोकाचे लक्ष आकृष्ट करून घेतले. दिनाक २४ फेब्रुवारी ते २ मार्च पर्यंत हे प्रदर्शन अनेकानी पाहिले आणि त्यातल्या कलात्मक विश्वाला सर्वच रसिकानी मनापासून दाद दिली; परंतु पहाता पहाता ह्या प्रदर्शनाला विवादाच्या एका वावटळीने घेरून टाकले. श्री. परिमल घोष यानी 'मातृशक्ती' ह्या शीर्षकाखाली स्त्रियाचे जे फोटो लावलेत ते अश्लिल आहेत आणि आमच्या भावनाना दुखविणारे आहे असे एक गट म्हणू लागला तर कलावताच्या स्वातत्र्यावर तुम्ही निर्वध घालू शकत नाही, असे कलावंत म्हणू लागले पहाता पहाता वातावरण तापले. शेवटच्या दिवशी ह्या विषयावर 'मुक्त चर्चा' आयोजित करण्यात आली; परंतु भावना अनावर झाल्यानतर 'मुक्त चर्चा' होणे अशक्य आहे, हे सर्वांच्याच लक्षात आले होते चर्चेच्या अध्यक्षस्थानी नागपूर विद्यापीठ ललित विभागाचे प्रमुख डॉ. सुनील सुभेदार होते. त्यानी मुद्दामहून आपले भाषण जास्त वेळ लाववत नेले. प्रदर्शन ज्यानी आयोजित केले त्याना प्रदर्शन गुडाळण्याला वेळ मिळावा हाच त्या मागील हेतू होता. झालेही तसेच. आयोजकानी अत्यत घाई करून सर्व फोटोग्राफस काढून घेतले आणि डॉ. सुभेदारानी सुटकेचा निश्वास सोडला! अश्लिलतेचा प्रश्न मात्र तसाच अनिर्णित राहिला!

मध्यतरी कर्नाटकचे एक इतिहासकार बगलोरच्या सस्कृती सभ्रम ह्या सस्थेचे अध्यक्ष आणि एक समाजसेवक नागपूरात येऊन गेले. त्यांना दिल्लीच्या साहित्य अकादमीने नुकतीच एक फेलोशिप दिलेली आहे. नागपूरातील धरमपेठ महाविद्यालयाच्या अभ्यासगटाने त्याना चर्चेकरिता आवर्जून बोलाविले. त्यावेळी आद्य रामाचार्यांनी पुष्कळच मनोरजक माहिती सागितली महाराष्ट्राला शिवाजीबद्दल जितकी आस्था आहे तेवढीच कर्नाटकालाही आहे. बॅरिस्टर अतुले याच्या जमान्यात भवानी तलवार आणण्याचे महाराष्ट्रात प्रयत्न झाले, त्यावेळी कर्नाटकात गुडुरावसुद्धा रामाचार्यांना भवानी तलवार आणण्याकरिता लंडनला जाण्याचा आग्रह करीत होते! कर्नाटकात ऐतिहासिक कादंबऱ्याना आता बरे दिवस आलेले आहेत. आद्य रामाचार्यांनी नुकतीच औरगजेबाच्या जीवनावर कादबरी लिहिली असून कर्नाटकात ती बरीच लोकप्रिय झालेली आहे. बागीनगेरा ह्या ठिकाणी औरंगजेबासबधी कन्नड भाषेतील बरीच कागदपत्रे सापडलेली आहेत. त्यावरून औरगजेबाच्या व्यक्तिमत्वावर बराच नवीन प्रकाश पडणार आहे. आद्य रामाचार्य रसाळ बोलण्यात प्रवीण दिसले. त्याच्या बोलण्यातून आधुनिक कर्नाटकासबधी बरीच मनोरंजक माहिती मिळाली.

□ राधेय प्रकाशनाचे श्री. येरकुटवार म्हणजे नागपूरातली जबरदस्त व्यक्ती. त्यानी श्री. श्यामकात कुलकर्णी याची 'सौमित्र' कादंबरी नुकतीच प्रकाशित केली. त्याचा प्रकाशन समारंभ दिनाक ४ मार्च रोजी राजाराम लायब्ररीत नुकताच साजरा झाला. समारभाचे अध्यक्षस्थान श्री. बाबुराव वैद्य ह्याच्याकडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मधुसूदन चान्सरकर उपस्थित होते. डॉ चान्सरकरानी ह्या समारभाच्या निमित्ताने दक्षिण भारत, श्रीलंका, थायलंड आणि इडोनेशिया इत्यादी विविध ठिकाणच्या रामकथांचा आढावा घेतला आणि ह्या सर्वांचा तुलनात्मक अभ्यास व्हावयास हवा असे मत माडले. डॉ. चान्सरकर श्रीलकेत अनेक वर्षे राहिल्याने त्यानी लकेत राहून तिथल्या रामायणाचा पाठपुरावा केला व त्यावर एक ग्रथही प्रकाशित केलेला आहे. त्यामुळे लक्ष्मणावर कादबरी लिहिताना असा तौलनिक अभ्यास निश्चितपणे उपयोगी पडला असता ह्यात शका नाही! आत्तापर्यंत रामायणातल्या दुर्लक्षित व्यक्तिरेखाकडे लक्ष वेधण्याचे कार्य महाराष्ट्रातल्या अनेक कादंबरीकारानी केले. त्यादृष्टीने श्री. शामकात कुलकर्णी यानी लक्ष्मणाकडे वळविलेला मोर्चा स्तुत्यच समजला पाहिजे.

युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशनने कोणत्या चागल्या गोष्टी केल्या ह्यावर अनेक मतमतातरे होऊ शकतील; परतु कमिशनने एक गोष्ट मात्र चागली केली. महाराष्ट्रातल्या विविध विद्यापिठातील विविध विभागातील प्राध्यापक एकमेकाच्या विभागात व्हिजिटिंग प्रोफेसर्स म्हणून जातील अशी चागली व्यवस्था कमिशनने करून ठेवली. त्यानुसार ह्या वर्षी मुबईहून प्रा. रमेश तेंडुलकर आणि कोल्हापूरहून प्रा. पवार ही दोन मराठीची मंडळी नागपुरात आली. त्यानी व्याख्यानांचा तडाखाच लावला. मराठाचे एम. फीलचे विद्यार्थी लेखण्या सरसावून होते. नोट्स घेण्याकरिता एकूण मराठीच्या दृष्टीने वातावरण मोठे चागले आहे त्यातच मागील आठवड्यात मराठीचेच दुसरे खदे लेखक प्रा. निर्मलकुमार फडकुले याचीही नागपुरात दोन व्याख्याने झाली.

— शरश्चंद्र


# कुंपण आणि आकाश

**मंगला गोडबोले**

**किंमत २० रुपये**

**राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव, पुणे ३०.**

## अमेरिकेतून...

# निरक्षरांचा अदृश्य प्रश्न

एक मध्यमवयीन रुबाबदार निळसर रंगाचा सूट घातलेला गृहस्थ सकाळी त्याच्या न्यूयॉर्कच्या फ्लॅटमधून बाहेर पडतो. कोपऱ्यावरच्या दुकानात न्यूयॉर्क टाइम्स विकत घेऊन त्याची नीट घडी घालतो आणि भुयारी लोकलने त्याच्या कार्यालयात ९ वाजता पोचतो. न्यूयॉर्क टाइम्स त्याच्या कामाच्या टेबलावर नीटपणे ठेवतो आणि रोजच्या कामाच्या तयारीला लागतो. तो जाहिरातीच्या एजन्सीमध्ये रेषाकृती आणि 'चित्रे याचे काम करतो.' पुनः एकदा मला जरा हे नीट समजावून सांगा म्हणजे मला या कामाची नीट कल्पना येईल.' असे तो म्हणतो. संपादकाना अशा विनंतीसंबंधी काहीच शंका येत नाही काम संपवल्यावर तो त्याच्या फ्लॅटवर सहा वाजता परत येतो. न्यूयॉर्क टाइम्सची घडी उलगडून एका कोपऱ्यात जुन्या वर्तमानपत्राच्या गठ्ठ्यावर नीटपणे ठेवतो. आणि संध्याकाळचे जेवण बीअर पिणे इ. चालू असताना, झोपेपर्यंत दूरदर्शन बघत बसतो. पुनः दुसऱ्या दिवशी आणि इतर कामाच्या दिवशी त्याचा ह्याच नित्यक्रम असतो. कामाच्या ठिकाणी तो फारसा कुणाशी बोलत नाही. त्याचे सर्व सहकारी त्याला एकलकोंडा समजतात. ह्या त्याच्या वागणुकीचे कारण म्हणजे स्वतःच्या निरक्षरतेवरती पांघरुण घालणे.

तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल. अमेरिकेत निरक्षरता ! १९८५ मध्ये या विषयावरील Illiterate America हे जॉनथन कोझॉल याचे प्रसिद्ध झालेले पुस्तक माझ्या वाचनात आले. त्याचा थोडा गोषवारा असा या लेखकाने हे पुस्तक रॉकफेलर आणि इतर काही प्रतिष्ठानांकडून अनुदान मिळवून एक वर्षभर संशोधन आणि अभ्यास करून लिहिले. ह्या विषयावर अभ्यास करण्याचे जवळजवळ अठरा वर्षे त्याच्या मनात घोळत होते. लेखक हार्वर्ड विद्यापीठाचे पदवीधर आहेत. काही वर्षे शिक्षक म्हणून त्यानी बॉस्टनच्या गरीब लोकांच्या वस्तीमधल्या शाळेत काम केले आहे.

ह्या लेखकाच्या संशोधनानुसार अमेरिकेत एकूण सहा कोटी म्हणजे अमेरिकेतल्या प्रौढ संख्येच्या सुमारे एक तृतियांश लोक रोजच्या व्यवहाराच्या दृष्टीने निरक्षर ( म्हणजे आपण त्याना अर्धसाक्षर म्हणू ) आहेत. यातल्या अडीच कोटी लोकांना जवळजवळ काहीच वाचता येत नाही--म्हणजे उदाहरणार्थ, कीटकनाशक रसायनच्या बाटलीवरचा 'विष' असा इशारा, किंवा मुलाच्या शिक्षकाने लिहिलेले पत्र इ. त्याना वाचता येत नाही. तर उरलेल्या साडेतीन कोटी जणाच्या जवळ आजच्या अमेरिकन समाजात संपूर्णपणे कार्यक्षम आणि समरस होण्याकरता वाचनाचे जेवढे नैपुण्य लागते तेवढे नाही. तुम्हाला वाटेल की या अर्धसाक्षरातले बहुतेक लोक काळे ( Blacks ) किंवा दक्षिण अमेरिकेतून इथे आलेले स्पॅनिश भाषिक असतील. पण संख्येने सर्वात जास्त अर्धसाक्षर श्वेतवर्गीयच आहेत. अर्थात टक्केवारी घेतली तर अशा निरक्षरतेचे प्रमाण काळे आणि स्पॅनिश भाषिक यांच्यातच जास्ती आहे. ही आकडेवारी अमेरिकन सरकारच्या खानेसुमारी खात्याच्या आकडेवारीपेक्षा खूपच जास्ती आहे. लेखकाने दिलेली ही आकडेवारी खाजगी संस्थाच्या आणि विद्यापीठाच्या संशोधनावर आधारित आहे. अमेरिकन सरकारी खानेसुमारीनुसार अमेरिकन साक्षरतेचे प्रमाण ९९.५ टक्के आहे.

या अर्धसाक्षरतेमुळे अमेरिकन समाजाचे कित्येक अब्ज डॉलर्सचे नुकसान होते आणि अनेक धोके या समाजाला पत्करावे लागतात. अर्धसाक्षरामधले बेकारीचे आणि गुन्हेगारीचे प्रमाण आणि त्यामुळे त्यांना द्यावे लागणारे बेकारीबद्दलचे भत्ते, तुरुंगाचे खर्च, कमी उत्पादनक्षमता, सूचना नीट न वाचता आल्यामुळे यंत्रसामुग्रीची होणारी नुकसानी आणि मोडतोड अशी त्याची उदाहरणे देता येतील.

ह्या अर्धसाक्षरतेचे निर्मूलन करण्याकरता चार महत्त्वाच्या योजना उपलब्ध आहेत, त्यातल्या दोन मध्यवर्ती सरकारच्या आहेत. (उदा. प्रौढ मूलभूत शिक्षण योजना, एकूण अनुदान सुमारे १० कोटी डॉलर्स ) आणि दोन योजना स्वयसेवक संस्थांतर्फे चालतात. शिवाय नगरपालिका, राज्यसरकारे याच्यातर्फे पण योजना चालू आहेत. पण लेखकाच्या मते या सर्व उपाययोजना थिट्या पडतात. त्या फारशा अर्धसाक्षरापर्यंत पोचत नाहीत आणि त्याना असलेले अनुदानही कमी पडते. शिवाय लेखक असा पण इशारा देतो की ज्याप्रमाणे गरिबी प्रसवते त्याप्रमाणे निरक्षरता प्रसवते. म्हणून ह्या अर्धसाक्षर अमेरिकनाच्या मुलाकडे विशेष लक्ष द्यायला हवे.

हा लेखक पुढे म्हणतो की प्रत्येक देशाची संपत्ती दोन प्रकारची असते. एक GNP म्हणजे उत्पादनक्षमता आणि दुसरी जी पैशाच्या रुपात मापता येत नाही अशी म्हणजे देशाच्या नागरिकांची आत्मसन्मानित (dignity) सभ्यता आणि बुद्धी. पहिल्या प्रकारची संपत्ती दुसऱ्या प्रकारच्या संपत्तीवर अवलबून असते. तेव्हा देशाच्या नागरिकांच्या बुद्धिमत्तेचे आणि आत्मसन्मानाचे 'भांडवल' सुधारणे अतिशय महत्त्वाचे आहे.

### ☐ अंतरिक्षयानाच्या स्फोटासंबंधी ताजा कलम (फेब्रु. २०, १९८६)

राष्ट्राध्यक्षानी नेमलेल्या खास कमिशनपुढे चाललेल्या जबान्यांनुसार स्फोटासंबंधी खालील माहिती आणि शंका आतापर्यंत प्रदर्शित झाल्या आहेत : (१) उड्डाणाच्या वेळी तपमान फक्त ३८ अंश फॅरेनहाइट ( सुमारे ०.५ अंश सेंटिग्रेड ) होते. इतक्या कमी तपमानात यापूर्वी उड्डाण झाले नव्हते. (२) यानाला जोडलेल्या प्रत्येक अग्निबाणाचे चार विभाग असतात. ते विभाग ज्या ठिकाणी साधलेले असतात, तेथे रबरासारख्या पदार्थाचे बनवलेले O च्या आकाराचे सील असते. त्या सीलमध्ये आणि त्याकरता वापरण्यात येणाऱ्या वंगणामध्ये (lubricant) इतक्या कमी तपमानात दोष निर्माण होण्याचा धोका असतो. (३) या शक्य असलेल्या धोक्यासंबंधी काही यंत्रज्ञानी उड्डाणाच्या आदल्या दिवशी इशारा दिला होता. (४) उजव्या बाजूच्या अग्निबाणाच्या मागच्या विभागामधल्या सीलमध्ये दोष निर्माण होऊन आतले गरम वायू बाहेर पडले असावेत आणि आग लागली असावी, अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे

अंतरिक्ष प्रवासातली आतरराष्ट्रीय स्पर्धा

आणि त्यावर अवलंबून असलेला व्यापारी नफातोटा यासंबंधी पण काळजी व्यक्त करण्यात येत आहे– उदाहरणार्थ, भारताचा कृत्रिम उपग्रह Challenger च्या स्फोटामुळे अमेरिकन यानातून पाठवण्याकरता विलंब लागणार असेल तर भारत सरकार स्वतःचे मार्ग शोधेल किंवा त्यासंबंधी दुसऱ्या देशाशी (फ्रान्स, रशिया) करार करण्याची शक्यता राहील.

–विजय वि. आणि
जयश्री वि. जोशी, वेस्टफिल्ड

# आपण असे जगतो

वि. ग. कानिटकर

## □ अचल आणि चंचल

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात काही गोष्टी अचल असतात तर काही भरवशाच्या नसतात– नशिबावर सारे अवलंबून असते. ज्या गोष्टी अचल असतात त्याचे अस्तित्व हे गृहीतच धरले जाते. परंतु ज्या चंचल वाटतात त्याबद्दल माणूस आशा बाळगून असतो, धास्तावलेलाही असतो. यामुळे माणसाचे भावजीवन हे ज्या सामाजिक परिस्थितीत तो रहातो त्यावरून ठरते. कारण ज्या गोष्टी अनिश्चित असतात त्याच्या संबंधीच तो विचार करत राहातो. समजा एखाद्या मनुष्याचे उत्पन्न हे निश्चित आहे. हा माणूस पैशासंबंधी फार विचार करीत नाही. जर त्याचे सामाजिक स्थान स्वयंसिद्ध स्वरूपाचे असेल तर तो मोठेपणाचा आव आणणारा असत नाही–कारण असे करण्याची त्याला गरज नसते. जर आपल्या देशाच्या मोठेपणाबद्दल त्याला संपूर्ण विश्वास असेल तर तो हिरीरीने राष्ट्रवाद सांगत नाही.

किंवा जरा निराळी मूल्ये पाहू : एखाद्या माणसाची आपण अगदीच टाकाऊ बुद्धिमत्तेचे आहोत अशी खात्री असेल तर तो कसलीही बौद्धिक महत्त्वाकांक्षा बाळगतच नाही. जर आपल्याला कसलीही सौंदर्यदृष्टी नाही असे एखाद्याला ठाऊक असेल तर तो कलावंत होण्याच्या भानगडीत पडणार नाही. थोडक्यात जे अगदी सामान्य कुवतीचे असतात ते कीर्तीरूपे उरण्याचा अट्टाहास करीत नाहीत.

आजच्या जगात-जिथे कम्युनिस्ट राजवट नाही– अशा सर्व ठिकाणी, माणसाला मिळू शकणारा पैसा व समाजातील स्थान या दोन गोष्टीचे चांचल्य पराकोटीचे वाढलेले आहे. कुणाला नेमका कोणत्या व्यवसायात किती पैसा मिळेल हे सांगता येत नाही. कुणी शेअर व्यवसायात करोडोपती होतात तर कुणी वडिलोपार्जित जमीन विकून लक्षावधी रुपये मिळवतात. सरकारी लॉटरी म्हणूनच लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. कारण दर आठवड्याला निदान चार माणसे तरी लखोपती होतातच असे सरकारी जाहीरात बोंबलून सांगते.

या सर्व अनिश्चिततेचा दृश्य परिणाम हा दिसतो आहे की बहुतेक जण पूर्वी कधीही नव्हते एवढे आज पैशाच्या मागे असतात. पूर्वी पैशाच्या मागे धावणारी एक छोटी जमात होती. पण आता जवळजवळ सर्वजणच या उद्योगात आढळतात. साहजिकच ज्याला पैसा करण्यात जेवढे यश मिळते तेवढी त्याची योग्यता मोठी गणली जाते. अगदी थोडे, जे आजही पैशाच्या मागे धावत नाहीत, त्यांच्याबद्दल कोणीही आदराने बोलत नाहीत. कारण त्यांना या जगात पैशापेक्षा इतर काही गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. हे कुणी मानीत नाही तर हे लोक भित्रे आणि बुजरे असल्याने पैशाच्या शर्यतीपासून दूर रहातात असेच बोलले जाते.

खूप श्रीमंत होण्याची आकांक्षा कोवळ्या तरुण मनात निर्माण होते ती मनावर होणाऱ्या परिणामामुळे ! सिनेमागृहात व दूरदर्शनवर तो ऐषारामाचे चित्रण पहातो. त्यात सत्ता गाजवणारे श्रीमंत संगमरवराच्या राजवाड्यामारख्या महालातून रहातात– त्यांच्या सुंदर सुंदर बायका, मुली या नेत्रदीपक साड्या व कपडे घालणाऱ्या असतात. जो कथेचा नायक असतो तो सुरुवातीला गरीब असला तरी शेवटी गडगंज श्रीमंत होऊनच सुखावतो ! इतकेच काय कलावंताची योग्यताही ते किती पैसा मिळवतात यावरून हल्ली ठरते. एखादा उत्तम कलावंत पैसा मिळवू शकला नाही तर त्याला कोणी विचारीत नाही.

शंभर वर्षापूर्वी जे श्रीमंत असत त्यांची सुशिक्षित व सुसंस्कृत होण्याची धडपड असे. कारण त्याशिवाय त्यांना मान मिळत नसे. आता शिक्षण आणि संस्कृतीची जोखडे, शिक्षक व प्राध्यापक, यांच्या गळ्यात अडकवण्यात आली आहेत– जे पैशाने गरीब असतात व म्हणून त्याना किंमतही दिली जात नाही. याचा एक परिणाम श्रीमंतांची पातळीही अलिकडच्या काळात कमालीची खाली आलेली आहे.

ही स्थिती बदलायची तर आपल्या सामाजिक परिस्थितीत बदल अटळ आहे. ज्या सामाजिक परिस्थितीत माणसाला आर्थिक विवंचनाही नसेल आणि अमाप पैसा करण्याची शक्यताही उपलब्ध नसेल त्याच समाजात पैशाव्यतिरिक्त अन्य मूल्यांना वजन प्राप्त होईल.

यासाठी प्रत्येकाला पुरेसे उत्पन्न मिळेल अशी शाश्वती देणारी व कोणालाच आवश्यकतेपेक्षा अधिक प्राप्त करण्याची सोयच नसलेली अर्थव्यवस्था निर्माण करणे जरुरीचे आहे.

## □ नोकरी करणाऱ्या आईचे मूल

सर्वसाधारणपणे सर्व आईवडील आपल्या मुलावर प्रेम करतात असे समजले जाते. शास्त्रीयदृष्ट्या व कल्पनेनुसार हे खरे आहे. पण प्रत्यक्ष व्यवहारात आई–वडिलांचे प्रेम आपत्यावर हात टाकण्यात वा खेकसण्यात व्यक्त होते. मुलाने काहीही केले तरी ते चूक असते. त्याने बडबड करता कामा नये. त्याने चिडता कामा नये. बागेत गेल्यावर गवतावर लोळता कामा नये. त्याला अजिबात कोणी बोलणार नाही, जर ते मूल अगदी स्वस्थ बसले व मेल्यासारखे पडून राहिले तर.

मुलांचे आधुनिक मानसशास्त्र ज्या आईबापांना माहीत असणार नाही, त्यांची ही स्थिती असते-आणि अद्याप याचा गंध नसलेले आईबाप बहुसंख्य आहेत. ज्या आधुनिक आईवडिलांनी मुलाचे मानसशास्त्र वाचले आहे व त्यातले नवे नवे वाक्प्रचार त्यांना मुखोद्गत आहेत तिथे परिस्थिती बरोबर उलटी असते. त्या घरातले मूल इतका उपद्रव देत रहाते की, आईबाप बिचारे शांतपणे त्याचा ताप सहन करीत

असतात. आधुनिक पालक हे हळवे असतात; परतु केवळ एवढ्यामुळं मुलाला एवढ्या-तेवढ्यावरून मार देऊन आपल्या रागाचा उपशम साधणाऱ्या परंपरागत पालकाहून मुलावर ते अधिक प्रेम करणारे ठरतात असे मात्र नाही. दोघाचीही धडपड एकच असते की, मुलाच्या सहवासातील वेळ आनंदात जावा, कारण भावनाविवश तर्कानें असे सागितलेले आहे की, मुले आणि आईबाप याच्या सहवासात खूप आनंद असतो !

हा जो सगळा उपद्रव निर्माण होतो तो एक साधी सत्य गोष्ट पुरेशी विचारात न घेतल्याने. दोन वर्षाखालील मुले वगळता माणसाना, आपल्यातून वयाने खूप लहान वा वयाने खूप मोठ्यांच्या सहवासापेक्षा—वयाने बरोबरीच्यांचाच सहवास आवडतो ! वीस ते तीस वर्षांच्या स्त्री–पुरुषाना, सत्तरी गाठलेल्या वृद्धाचा सहवास नको वाटतो. साठीच्या स्त्रियाना, कायम विशीतल्या मुलीची सगत सुखदायक वाटत नाही. परतु आईबाप व मुले यांच्याबाबतीत मात्र हा नियम विसरला जातो. जरी तो या दोघाच्या संबंधातही तितकाच लागू आहे. याचे मागचे कारण शुद्ध शारिरीक आहे. मुलाना सतत धागडधिंगा आवडतो, आरडाओरडा आवडतो. याउलट प्रौढांना स्वस्थ पडून रहायला आवडते. गोंगाट त्याना सहन होत नाही.

पूर्वीची गावाकडची घरे मुलांना यादृष्टीने आनंद देणारी असत. घरात आठदहा मुलातला तो एक असे. परंतु आता शहरात 'एक खोली–एक स्वैंपाकघर' पद्धतीच्या ब्लॉकमध्ये मुलाला जास्तीतजास्त एक भाऊ किंवा एक बहीण असते व या मुलाची परिस्थिती फारच कठीण होते. या परिस्थितीत मुले व आईबाप ही दिवसाचा जेवढा वेळ एकमेकापासून दूर असतील तेवढे त्याच्यातील प्रेम अधिक असण्याचा सभव जास्त. जर तसे नसेल तर आई–बाप व मुले २४ तास परस्परांना वैताग आणीत असणार. याचा परिणाम आई–बाप चिरचिरे होऊन, मुलावर तर खूपच वाईट परिणाम होत असणार.

मुलाचे शिक्षण सुरू होणार सहाव्या वर्षानतर आणि मुलाचा स्वभाव सहा वर्षापर्यंतच निश्चित होत जात असतो ! यादृष्टीने मूल दोन वर्षाचे होताच त्याला 'नर्सरी'मध्ये घालण्याची पद्धत उत्तम म्हणायला हवी. अशा शिशुगृहात त्याच्या वयाची खूप मुले असतात. शिवाय आई किंवा बाप नसलेली एकदोन मोठी मडळी लक्ष ठेवायला असल्याने त्याना सुरक्षितही वाटते. तिथे गोंगाट करायला परवानगी असते–धागडधिंगा करायला मिळतो. शिवाय वयानुरूप निवडलेले अनेक खेळ तिथे उपलब्ध असतात.

सायकाळी नर्सरीतून मूल घरी येईल तेव्हा आई–वडिलासाठी ते आतुर असेल आणि आई-वडिलानाही मुलाला कुरवाळावेसे वाटेल. अगदी प्रेमविवाह झालेल्या स्त्रीला देखील नवरा दिवसभर घराबाहेर उद्योगासाठी गेला तर फार आनद होतो. आई झालेल्या स्त्रीला अपत्यापासून अशीच सुटका असायला हवी.

आता बायको नोकरी करणारी असते त्या दापत्याला, दोन वर्षाखालील अपत्य शिशुगृहात ठेवण्यावाचून गत्यतरच नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ज्या स्त्रिया नोकऱ्या करीत नाहीत त्याना पाळणाघरात मुले सोडून नोकरीवर जाणाऱ्या स्त्रिया या फारच क्रूर वाटतात व तशी टीका होत असते. प्रत्यक्षात नोकरी करणाऱ्या स्त्रीला अपरिहार्यपणे एक नितात आवश्यक गोष्ट सहज साधता आलेली आहे आणि ती हीच की अपत्य तिच्यापासून दिवसाचे बरेच तास दूर असते. ते दोघाच्या हिताचे आहे. □

---

अहो, येता जाता

# 'खेड्यात चला'

फिरोझ रानडे

---

सकाळच्या 'श्रीरामपूर' मध्ये चढलो तर बस सगळी आपली रिकामी ! ते साहजिकच होते. आता शाळा-कॉलेज सुरू झाली होती, लग्न सराई संपली होती. आता बसला गर्दी असण्याचे काही कारण नव्हते व तशी ती नव्हती.

ड्रायव्हर–कंडक्टर अजुनी यायचे होते. प्रवासी जवळपासच्या गावचे असल्यामुळे आपसात पाऊस–पाण्याच्या गोष्टी करत होते. मला पावसाची फारशी माहिती नव्हती व मुंबईला रहात असल्यामुळे पाण्याबद्दल चिंता नव्हती मी नाशिकहून निघणार वर्तमानपत्र वाचत बसलो होतो

मी तसा नाशिकचा. त्यामुळे त्या दैनिकाच्या पहिल्या सपादकांना व प्रस्थापकांना चागलं ओळखत होतो. आमचा चागला परिचय होता.

महात्मा गाधीच्या तीस सालच्या राजकीय चळवळीत त्यानी भाग घेतला होता. त्या करता ते तुरुगात गेले होते. पण ते तेव्हढ्यावरच थाबले नव्हते. टिळक-आगरकराच्या पावलावर पाऊल टाकून त्यानी त्या वेळी आडगाव वाटणाऱ्या नाशिकसारख्या गावी साप्ताहिक काढले होते व मोठ्या नेकीने व नेटाने चालवले होते.

एकदा ते मला सांगत होते, '...अरे, काय त्या वेळची स्थिती. आता आमचा हा छापखाना वगैरे दिसतोय; पण त्या वेळी मी हाताने आमच्या साप्ताहिकाच्या प्रती काढत असे व आजूबाजूच्या खेड्यात पाठवून देत असे. बऱ्याच वेळा स्वत:लाच जावे लागे. कधी चालत, कधी सायकलवर. महात्माजींचा सदेशच होता 'खेड्यात चला' म्हणून, तेव्हा खेड्यापाड्यात कार्याचा प्रचार करणे अवश्य होते.'

हे सगळे ते वृत्तपत्र चाळता–चाळता माझ्या मनात येत होते. चाळता–चाळता म्हणण्याचे कारण की माझ्यासारख्या म. टा. ला व लो. सला चटावलेल्या मुंबईकराला ते वर्तमानपत्र अमळ अळणी वाटत होते. सकाळी–सकाळी ताजे वर्तमानपत्र वाचल्याशिवाय बरे वाटत नाही. म्हणून हे वर्तमानपत्र घेणे व चाळणे.

प्रथम कंडक्टर साहेब आले व आपल्या तिकिटाची बॅग काढून काही हिशोब करू लागले. तोपर्यंत ड्रायव्हरसाहेब आले. दोन घंटा झाल्यावर बस सुरू झाली. बस गेटच्या बाहेर पडणार तेवढ्यात अगदी तरुण अशा दहा–बारा तरुण–तरुणीचे टोळके बसकडे धावत आले. त्यानी बस थाबवली व भसाभसा आत शिरले.

कंडक्टर – ड्रायव्हर बाकी सगळ्याशी

नियमाप्रमाणे म्हणजे थोडे मग्रूरतेने वागत असले तरी तसे ते विद्यार्थ्यांशी वागत नाहीत हे मी प्रवासात अनुभवले होते. हेच जर खेड्यातली शेतकरी वा बाया मडळी असती, तर ड्रायव्हर बस थाबवता ना.

जशी ती तरुण मडळी उत्साहात बसमध्ये शिरली तशीच ती ह्या जागेवर बस त्या जागेवर बस करू लागली. प्रत्येकाला आप-आपल्या टोळक्याजवळ बसायला हवे होते.

ह्या आलेल्या मुलात काही मुलीपण होत्या; पण त्या फक्त नावाच्या मुली होत्या. वेशभूषा व केशभूषा जवळजवळ सगळ्याच्या सारख्या. वेशभूषा म्हणजे निळ्या डेनिमच्या रंग गेलेल्या पॅन्टस् व रंगी-बेरंगी कुडते किंवा टीशर्टस् आणि केशभूषा म्हणजे मुलानी केस लांब ठेवलेले व मुलीचा बॉब-कट वा पोरकट. 'पोर-कट' म्हणजे पोरा-सारखे कमी असलेले केस! कानातल्या डुलावरून वा रिंगावरूनच ओळखायचे आहे की हा मुलगा आहे की मुलगी आहे ते.

बस मार्गी लागली होती. पण त्या विद्यार्थ्यांचं बसण्याच्या जागेबद्दल अजुनी काही जमत नव्हते. मी मधल्याच एका तीन आसनाच्या बाकावर बसलो होतो त्यामुळे त्याची पचाईत झाली होती. मी जागा बदलून दुसरीकडे बसलो असतो तर त्याचे गणित जमले असते. पण माझा चेहरा जात्याच जरा राकट, त्यात दाढीची भर, त्यामुळे मी जास्तच अप्रिय दिसतो. तेव्हा मला सांगायचे कसे हा प्रश्न त्याना पडला. मी त्याची अड-चण ओळखली होती. पण आपणहून उठून दुसऱ्या जागी बसण्याआधी ते काय करतात हे बघावे म्हणून वर्तमानपत्रात तोड घालून बसलो होतो.

शेवटी एका 'डूल' घातलेल्या मुलाने धीर केला व मला म्हणाली, 'अकल, प्लीज जरा पुढल्या सीटवर बसता का?' 'का नाही? जरूर बसतो.' असे म्हणून मी पुढल्या सीटवर जाऊन बसलो.

आता त्या तरुण मडळीत ज्याला धागड-धिगा म्हणता येईल असा धिगा चालला होता. बहुतेक 'धिंगा' इग्रजीतून चालला होता. 'शिट'ची लयलूट होत होती. आमची पिढी व आमच्या पूर्वीच्या पिढ्या पूर्वी वर्षातून फक्त होळी-पौर्णिमेला शेण-मारा करत असत तो आता दररोजचा खेळ झाला होता.

मनात विचार येत होता, की ही मुल कोठे चालली असतील बरे? नाशिक-श्रीरामपूर रस्त्यावर सिन्नर व संगमनेर सोडून दिलं तर दुसरी तालुक्याचीसुद्धा गावे नाहीत आणि हे काही त्या गावी जाणारे पॅसेंजर नाहीत. मग कुठे? — शिरडीच्या बाबाच्या दर्शनाला तर जात नसतील? कारण आपल्या भारतीयाचा वेष बदलला तरी वृत्ती बदलत नाही. उलट 'बाबा' लोकाच प्रस्थ सुशिक्षितात व तरुणात वाढतच आहे तेव्हा एकदा वाटलं की, त्यांना सागाव की तुम्ही चुकीच्या बसमध्ये बसला आहात व सिन्नरला बस बदला म्हणून.

तेवढ्यात त्या मुलानी ज्या खेडेगावचं तिकिट मागितलं त्यामुळे माझ्या मनातला प्रश्न सुटला. तेव्हढेच नाही तर डोक्यात लख्ख प्रकाश पडला.

'अरे, ही तरी आपल्या जाण्याच्या गावी जाणारी मडळी आहेत. तेथे गेल्या वर्षापासून मेडिकल कॉलेज निघाल होतं, त्याचेच हे विद्यार्थी असावेत.

त्या खेडेगावी मी गेले दोन महिने जात होतो पण त्या काळात कॉलेजला सुट्टया असल्या कारणाने ह्या लोकाना पहाण्याचा योग आला नव्हता.

त्याना पहाण्याचा योग आला नव्हता तरी त्याच्याबद्दल खूप ऐकल होत. ज्या विद्यार्थ्यांना चांगले मार्कस् पडले नाहीत म्हणून मुबई-पुण्याच्या मेडिकल कॉलेजेसना प्रवेश मिळाला नव्हता त्यानी ह्या आडगावी असलेल्या मेडिकल कॉलेजमध्ये चागले दोन-दोन लाख, दिड-दिड लाख भरून प्रवेश घेतला होता व पुढे डॉक्टर होणार होते.

मी मनाशी म्हटल, 'चला, स्वतत्र भारतात महात्मा गाधीचा 'खेड्यात चला' हा सदेश निदान ह्या निमित्ताने तरी पाळला गेला!' □

---

## मुस्लिम महिला विधेयकाच्या निमित्ताने

# विधेयक संमत झाले तरी संघर्ष चालूच राहायला हवा

अभय गोखले

हा लेख छापून येईपर्यंत ससदेत मुस्लिम महिला विधेयक (प्रोटेक्शन ऑफ राईटस् ऑन डायव्होर्स) सत्ताधारी पक्षाच्या पाशवी बहुमताच्या जोरावर बहुधा समत झालेले असेल उर्जा राज्यमंत्री अरीफ मोहमद खान यानी या प्रश्नावर राजीनामा दिला असला तरी त्या निषेधाचा काही उपयोग होणार नाही. कारण अरुणसिंग व अरुण नेहरू या राजीव गांधी याच्या विश्वासू सल्लागारांनी राजीव गाधीचे मत केव्हाच या बाबतीत ठाम बनवून ठेवले आहे. मुस्लिमामध्ये मुल्ला मौलवी व तथाकथित जातीयवाद्याचा जबरदस्त पगडा असल्याने व हेच जातीयवादी मुस्लिम नेते उदा. बनातवाला सुलेमान सैत, शहाबुद्दिन हे मुस्लिमाचे खरेखुरे नेतृत्व करतात असा सत्ताधारी पक्षाचा समज असल्याने, अरीफ मोहमद खान वगैरे पुरोगामी नेत्यांना विचारात घेण्याचे सरकारला प्रयोजन वाटत नाही, तर बनातवाला, शहाबुद्दीन, नजमा हेपतुल्ला याच्या विचाराना अधिक महत्त्व दिले जाते; ही देशाची व विशेषत: हजारो मुस्लिम महिलाची शोकातिका म्हणावयास हवी. अरीफ मोहमद खान याच्यासारखे तरुणच मुस्लिमामधील मागासलेपणा, अशिक्षितपणा, जातीयवाद्याचा व मुल्लामौलवींचा पगडा दूर करू शकतील. परतु दुर्दैवाने त्याना विचारतो कोण? अलिगढ मुस्लिम विद्यापीठासारख्या जातीय-

वाद्याचा अड्डा असणाऱ्या शिक्षण संस्थेतून बाहेर पडणाऱ्या अरीफ मोहमदखान यांच्यासारख्या तरुणांनी अशी पुरोगामी विचारसरणी मांडावी व त्याकरिता मंत्रीपदालाही तिलांजली द्यावी ही खरोखरच अभिमानास्पद व आशादायक घटना आहे. अरीफ यानी आपल्या राजिनाम्याचे कोणत्याही प्रकारच्या मुलाखती देऊन व मेळावे भरवून भाडवल केलेले नाही. त्यामुळे त्यांचा राजिनाम्याचा हेतु शुद्ध आहे हे सिद्ध झालेलेच आहे तेव्हा त्यांनी हा जो स्वार्थत्याग केला त्यामागे हजारो तलाकपीडीत भगिनीच्या परवडीबद्दल त्यांना तळमळ आहे हेच दिसून आले आहे.

क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या १२५ व्या कलमातून मुस्लिमाना वगळून सरकार मुस्लिम स्त्रियावर जे उपकार करत आहे, त्याची चागली भलावण जातीयवाद्यामार्फत चालली आहे. प्रोटेक्शन ऑफ राईटस् ऑन डायव्होर्स हा फसवा शब्द असून सरकार मुस्लिम महिला बील समत करून हजारो मुस्लिम स्त्रियाना दुर्देवाच्या खाईत लोटत आहे, मुस्लिम स्त्रियामधील मागासलेपणामुळे व अशिक्षित असहाय्यतेमुळेच सरकारला त्याच्यावर अशा प्रकारचा अत्याचार करण्याचे धाडस होत आहे. या विधेयकामुळे ज्या हजारो मुस्लिम महिलांच्या भवितव्यास डाबर फासले जाणार आहे त्याची कोणतीही बाजू ऐकून घेण्यास राजीव गांधीचे सरकार तयार नाही आणि जे लोक हे विधेयक संमत केले जाऊ नये म्हणून घसा खरवडत आहेत त्याना हिंदूमहासभावादी, जनसंघवादी सबोधले जाऊन त्यांच्या प्रामाणिकपणाकडे, कळवळीकडे कानाडोळा केला जात आहे.

शहाबानो प्रकरणी सुप्रीम कोर्टाने ऐतिहासिक निर्णय दिल्यावर मुस्लिम जातीयवाद्याचे पित्त खवळले व देशभर मेळावे, सभा, मोर्चे आयोजित करून, त्यांनी सरकारने या बाबतीत विचार करून क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या १२५ व्या कलमातून मुस्लिमाना वगळावे असा दबाव सत्ताधारीपक्षावर आणण्यास सुरुवात केली. त्यातच या प्रश्नावर काही मुस्लिम जातीयवाद्यानी म्हणजे शहाबुद्दीन ( बिहार) मजलीस ( हैदराबाद महानगरपालिका ) निवडणुकीत घवघवीत यश मिळवल्याने त्याचा परिणाम सत्ताधारी पक्षाच्या मतावर झाला व मुस्लिम आपल्यापासून दूर जात असल्याची भावना बळावल्याने सरकारने जातीयवाद्यांपुढे मान तुकवली. निरनिराळ्या पोटनिवडणुकात कॉंग्रेस ( इ ) ने पराभव पत्करल्याने या बाबतीत काही केले नाही तर आपली धडगत नाही असा निष्कर्ष सत्ताधारी पक्षाच्या सल्लागारानी काढला व त्यातूनच मुस्लिम महिला विधेयकाचा जन्म झाला. या बाबतीत आपल्यावर अन्याय करणाऱ्या सरकारला मते न देता धडा शिकवणे मुस्लिम स्त्रियाना शक्य आहे परंतु त्याच्यातील अशिक्षितपणामुळे व असहायतेमुळे त्या तसे करू शकणार नाहीत याची पुरेपुर जाणीव सरकारला आहे.

या नवीन मुस्लिम महिला विधेयकान्वये आता तलाकपीडीत महिलाना अन्याय निवारणार्थ कोर्टाकडे धाव घेता येणार नाही. कारण तलाक दिल्यावर तीन महिन्यानतर त्याच्या पतीराजांची जबाबदारी सपणार असून ते नवीन निका लावण्यास मोकळे होणार आहेत. मग या स्त्रियाची सर्व प्रकारची जबाबदारी स्वीकारण्याचे बधन त्याच्या आई, वडील, भाऊ, बहीण याच्यावर रहाणार असून ( वा रे प्रोटेक्शन ! ) ते जर समर्थ नसतील तर त्याची जबाबदारी औकाफ मडळावर रहाणार आहे. ( या औकाफ मडळाकडे त्याच्या कर्मचाऱ्याच्या पगाराचे पैसे देण्याइतकेही बळ नसते. मग ते या शेकडो असहाय महिलांचा आर्थिक भार कसा उचलणार याची नुसती कल्पनाच न केलेली बरी. ) तेव्हा हे विधेयक म्हणजे सरकारची शुद्ध भोंदूगिरी असून मताच्या जोगव्यासाठी लाखो मुस्लिम महिलाच्या भवितव्याची कशीही परवड झाली तरी त्यासाठी कळवळण्याचे सरकारला प्रयोजन नाही. त्याना मताचे जास्त महत्त्व वाटते. सत्ता टिकविण्यासाठी ते काहीही करायला तयार होतील आणि प्रामाणिकपणे जर कोणी मुस्लिम महिलाच्या बाजूने, तलाकपिडीत महिलाना योग्य ती पोटगी मिळवून देण्यासाठी हे नवीन विधेयक आणू नये असे ओरडू लागला तर त्याच्यावर हिंदू जातीयवादी अशा शिक्का मारला जातो. तेव्हा या असहाय्य महिलांच्या मदतीकरिता मुस्लिम समाजातीलच सुधारणावादी लोक पुढे येत आहेत. परंतु मुठभर उच्चभ्रूची चळवळ म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, आणि या लोकांनी सरकारचा दरवाजा कितीही वेळा ठोठावला तरी सरकार त्याच्याकडे लक्ष देणार नाही. अगदी काही लोक सत्ताधारी पक्षात असले तरी. कारण हे लोक पुरोगामी असल्याने त्याना बहुसख्य मुस्लिमाचा पाठिंबा नाही, अशी सरकारची समजूत आहे आणि ती काही प्रमाणात खरीही आहे. कारण बनातवाला, शहाबुद्दिन वगैरे जातीयवादी नेत्यानी मुल्लामौलवीना हाताशी धरले आहे, ज्यांचा बहुसख्य अशिक्षित लोकावर जबरदस्त पगडा आहे. मुल्लामौलवीमध्ये पुरोगामी लोकाना थारा नाही व त्याचे त्याच्याशी पटणारेही नाही. २१ व्या शतकामध्ये देशाला नेण्याची भाषा वारंवार करणारे लोक मुस्लिम स्त्रियाना मात्र बरीच शतके मागे लोटून देत आहेत आणि तेही मताच्या लालसेने. या स्त्रियाना आता कोर्टाचा उरलासुरला जो आसरा होता तोही नाहीसा झाला आहे. समान नागरी कायद्याची मागणी करणाऱ्या लोकांनी आता तो विषय कायमचा विसरलेला बरा. कारण कॉंग्रेस (इ.) काय किंवा जनता पक्ष काय, मते मिळणार नाहीत म्हणून या मागणीचा विचार करावयासही तयार होणार नाहीत.

## दंगलींचे वाढते क्षेत्र

मुस्लिम जमातीतील पुरुषाची मात्र यामुळे बरीच सोय पहाण्यात आली आहे. मुस्लिम स्त्रियाची मते मिळविण्यासाठी त्यांच्या पुरुषांचीच मर्जी राखायला हवी अशी सरकारची धारणा दिसते. ती खरी का खोटी हे लवकर समजेल. आता तलाकचा मोठा फायदा उठवणाऱ्या पुरुषाची चगळ होणार आहे. कारण त्याना कोर्टाची भीती असणार नाही. पूर्वी कोर्टाच्या भीतीने तलाक दिलेली स्त्री पळून गेली असे दाखवण्याचा काही केसेसमध्ये प्रयत्न होत असे. तसेही करण्याची आता आवश्यकता नाही. मुस्लिम महिला विधेयक आणण्यामागचा सरकारचा मोठा उद्देश म्हणजे शहाबानो प्रकरणी सुप्रीम कोर्टाच्या निकालामुळे मुस्लिम जमातीत जो असतोष पसरला आहे तो आटोक्यात आणणे, कारण त्याचा गैरफायदा (असतोषाचा) मुस्लिम जातीयवादी मोठ्या प्रमाणात उठवत आहेत अयोध्या येथील बाबरी मशीद ही रामाचे जन्मस्थान आहे. ते मदिर हिंदूसाठी खुले करण्यात आल्याने मुस्लिम समाजात असंतोष पसरला आहे. कारण त्याच्यामते ते मदिर नसून मोगल सम्राट बाबराने बाधलेली मशिद आहे व त्यात रामाच्या मूर्तीची काही हिंदूनी प्रतिष्ठापना केलेली आहे, तर हिंदूच्यामते रामाच्या मूळच्या मदिराची पाडापाड करून बाबराने तेथे मशिद बाधली. अर्थात ही सपूर्ण वास्तू चमत्कारीकच आहे. रामाची मूर्ती तेथे एकेकाळी अवतरली अशी आख्यायिका आहे. या मशिदीचे किंवा मदिराचे वरचे घुमट ती वास्तू मशिद असल्यासारखे भासवतात मात्र या वास्तूचे प्रवेशद्वार, आतील खाब वगैरे एखाद्या मदिरात शोभणारे आहेत. शहाबानो प्रकरणी मुस्लिम समाज अस्वस्थ झालेला असतानाच अयोध्या येथील मदिर (रामजन्मभूमी) हिंदूना मोकळे केल्याने मुस्लिम समाजात असतोष पसरला व वारा-

णसी, अलीगढ, लखनौ, श्रीनगर वगैरे देशाच्या निरनिराळ्या भागात दंगली व तणावाचे वातावरण तयार झाले. मुस्लिम महिला विधेयक तातडीने मांडण्यामागे मुस्लिम समाजातील हा तणाव कमी करण्याचाही एक उद्देश असू शकेल. कारण पंजाबमधील हिंदू व शीख यांच्यातील तणाव वाढतच आहे व तो देशात इतरत्रही पसरण्याचा धोका आहे. त्यात आणखी हिंदू-मुस्लिम तणावाची भर पडायला नको, हाही उद्देश असावा. कारण विश्वहिंदू परिषदेसारख्या संघटना अयोध्या येथील मंदिर खुले करण्यात आल्याबद्दल आनंदोत्सव साजरे करून ठिकठिकाणी मिरवणुका काढत आहेत. त्यामुळे मुस्लिम समाजात साहजिकच त्याची प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक आहे. मात्र कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी या दोन्ही जमातींतील नेत्यांनी संयम राखायला हवा. काश्मीर खोऱ्यात अयोध्या प्रकरणावरून हिंदूवर, त्यांच्या घरांवर व मंदिरांवर हल्ले झाले, याचा निषेध व्हावयास हवा. कारण त्याची प्रतिक्रिया म्हणून शिवसेनेसारख्या संघटनांनी जम्मूमध्ये दंगली पेटवल्या.

मुस्लिम महिला विधेयक आणून सरकारने आपले दुबळेपणच सिद्ध केले आहे. या विधेयकाविरुद्ध बोलणारा प्रत्येक हिंदू हा अप्रामाणिक आहे, तो मुस्लिमांच्या खाजगी बाबीमध्ये नाक खुपसत आहे, या विधेयकाला विरोध करण्यामागे असहाय मुस्लिम महिलांबद्दल कळवळ नसून हा विरोध जातीय दृष्टिकोनातून केला जात आहे वगैरे आरोप मुस्लिम जातीयवाद्यांकडून होत आहेत व ते तसे होत रहाणारच. या बाबतीत एकच गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते की, सर्वत्र हिंदूंचा विरोध हा प्रामाणिक आहे असे मानण्याचे कारण नाही. परंतु मुस्लिम समाजातील भगिनींना या विधेयकाद्वारे दुर्दैवाच्या फेऱ्यात ढकलले जात असताना, हिंदूंनी ते केवळ मुस्लिम नाहीत म्हणून गप्प राहून विरोध न करणे कितपत योग्य आहे? अशा एकाकी अवस्थेत मुस्लिम महिला विधेयकाला विरोध करणारा मुस्लिम समाजातील अरीफ मोहमद खान यांच्यासारख्यांच्या पाठीशी उभे रहाणे हे प्रत्येक हिंदूचे कर्तव्य आहे. हे विधेयक संमत झाले तरी त्याविरुद्धचा संघर्ष हा संपता कामा नये. □

---

## वेशीबाहेरचे एक पान

वाटंवरल्या धर्मशाळत आपल्या तीन बायका घेऊन तो मुक्कामाला उतरला. कैक वरसं आषाढी-कार्तिकी वारीला इथच मुक्काम करायचा. गावच्या पांढरीपासनं दहावा मुक्काम इथं. आकरावा इठ्ठलाच्या दारात. परतीला इथं पहिला मुक्काम.

पोर नाह्य म्हणून वारी. एक-दोन-तीन बायका झाल्या, पर पोट पिकलं नाही आणि आता पिकावं असं वय बी राहिलं नाही. पोट पिकायचं आशाच सोडली. पर वारी धरली. तिघी बायकानीबी. साऱ्यांच्या पायाच्या गुणक्या झाल्या पर इठ्ठलानं त्याच्या वर माया केली नाही. गावात दोन चिरेबंदी वाडं, पर दिवा लावाय कोण वारस नाही असं झाल्यालं.

धर्मशाळत सयपाक झाला. जेवणं चालली आणि कारवत झोळीला बांधल्यालं पोर घेऊन बाई जेवणाकडं बघाय लागली. त्यांनी तिलाबी वाढलं. बाई थानच्या पोराला घेऊन जेवली आणि दुवा देत निरोप घेतला. जेवणं संपली. इळभर चालून दमल्याली अंग तवाच मुरगाळून पडली. मध्यान्ह रातीला बाई आली. थानचं पोर झोपल्यालं. झोळीतनं काढलं आणि चौघांच्या मधे झोपवून गप् झाली. सकाळी जाग आली ती पोराच्या वराडण्यानं. बिन येणाचं पोर लाभलं. मन भरलं. बेवारस वारस झालं.

देवानं वाटवर दिल्याला प्रसाद म्हणून त्या गोळ्याला वाढवला. मोठा केला. मात-बाऱ्याला नाव झाल. वाड्यासनी दिवा लागला. तिघीसनी तिटा झाला. तसा चंदर म्हातारा वरच्या वारीची तयारी करू लागला. दिस दळाय लागला.

एके दिसी त्यानं पोराला पुढं बोलावलं. देवाऱ्यातली झेंड्याची काठी घेतली. गळ्यातली माळ काढली. लोंबत्याला विणा घेतला 'हे घे पोरा, आता माझी वाट संपली—आता तू चालायचं, वाट पंढरीची मळवायची वारी चालत करायची' लई सांगितलं, गावच्या पांढरीसन् चंद्रभागेपतूर... तिघी रडाय लागल्या... पोर रडाय लागलं... हुंदकं देत म्हटलं, 'काय बी होऊ दे, पर वारी करीन पाय झडलं तर लोटांगण घालीत जाईन, पर वारी करीन. या माळची शपथ.'

त्या रातीलाच चंदरनं गोरीची वारी केली.

त्यो रंगा वारी करतो. अभंग गातो. विणा धरतो. प्रपंच्य करतो. माळ हाय. मांस-खारकांड शिवत नाही. आज लई वरसं झाली वारी चुकली नाही. चुकणार नाही. पाप नाही तर पुण्य, काय तरी हाय

तोंडावर वारी आली. गावातल्या वारकऱ्यासनी जाग आली. दिंडीची तयारी सुरू झाली. टाळास्नी नव दोर आलं आमच्या देवरायाच्या म्हातारीनं मला रंगा वारकऱ्याकडं पाठवलं 'कंच्या वक्ताला वारी निघायचा हाय' हे इच्चारायला

दिसाला पालवी फुटली होती. रंगा वारकरी गाईची धार काढत होता गोठ्याजवळ थांबली. एका थानाला वासरू पीत होतं. थान कसं पित्यात हे ठाव नव्हतं. थान पाझायला आईच राहिली नव्हती मला. वासराचं तोंड दुधानं फेसाळलं हातं. माझी आई आठवत होती मला. थानाला खोड ढुसण्या मारत होतं. दूध संपत आलं होतं—गाईनं लाथ झाडली... रंगाच्या हातातला तांब्या उडाला. दूध होऊन पडला. तसा रंगा उठला. खोंडाच्या गळपट्टीला धरून हिसडा मारला. वासरानं जीभ बाहेर काढला. तडफडलं. पुनः ढुसणा मारलां... रंगानं आणि एक हिसडा मारला. जिभ बाहेरच अडकली. ते तडफडून गोठ्यात पडलं. गायीनं कास वर वढून घेतली. रंगानं कासवर पाणी मारून-मारून थान वढली... दूध आटलं. रंगाचा राग रंगला. दोन-तीन वळणं वसलं गायीला.

'रंगामा, आजीनं इचारलय, वारी कवाशी निघायची?'

'परवा दिसी न्यारीच्या वक्ताला?'

तिसरा दिस. वारी निघाली. गावानं वारकऱ्यांचं पाय धरलं. विणाधारी मधी नाचू लागला. टाळ नाचत-नाचत घुमाय लागलं. ठेक्यावर गावानं ताल धरला. देवरायाच्या म्हातारीचं गठरं घेऊन वारीला पोहचवायला वेशीबाहेर निघालो. वेशीत गावच्या घागरी आल्या. बुक्का कपाळावर बसाय लागला झेंड डुलाय लागलं 'इठ्ठल हरी'चा गजर वेशीसनं पंढरीपतूर गेला.

गावची वेस सपली. आता उताराची वाट वरदळीत आजी दिसेना... वारी उतार उतरू लागली... वेशीबाहेर उतारावर रस्त्याच्या कडला माझी नजर गेली. रंगाच्या खोंडावर कावळा-कुत्री तुटून पडली होती. रंगाच्या खांद्यावर विणा होता. वारी वेशीबाहेर गेली होती.

—बापू जाधव
किर्लोस्करवाडी

# किती किती आशादायी चित्र हे !

अनिल शिंदे

अर्थसंकल्पपूर्व भाववाढीच्या तडाख्याने जागे झालेल्या विरोधकानी अवघा देश ढवळून काढला सरकारवर प्रचंड दबाव आणला आणीबाणीबाबत केलेल्या वक्तव्यामुळे पंतप्रधान राजीव गांधी यांच्यावर गेल्यावर्षी जो नामुष्की आली होती, तीच नामुष्की यावेळी भाववाढीच्यावेळी आल', पण हा परिणाम यावेळी इतका खोलवर झाला की, सरकारने अर्थसंकल्पात अगदी गुलाबी गुलाबी स्वप्न फुलविणारे किमान तसे भासविणारे चित्र देशापुढे मांडले.

मध्यमवर्ग, गरीब लोक, शेतकरी यांच्याकरता, तसेच उद्योजक, लघुउद्योजक यासाठी आपण बरेच काही केल्याचे, करणार असल्याचे सरकारने जाहीर केले. वीस कलमी कार्यक्रमासाठी आता आणखी एक हजार कोटी देणार, त्यामुळे या कार्यक्रमासाठी जवळजवळ सात हजार कोटी रु. उपलब्ध होणार आहेत, रॉकेलवरील उत्पादनकर पूर्णत: रद्द करण्यात आला. पगारदारासाठी आयकर वजावट दहा हजारावर नेण्यात आली. ४१ औषधे स्वस्त करणार, कारण त्यावरचा उत्पादनकर मागे घेतला, वहाणा आता स्वस्त होणार, घोंगड्या स्वस्त होणार वाह ! वाह ! कित्ती कित्ती आशादायी चित्र हे !

सरकार गरिबासाठी इतके काही करीत आहे तरी लोक 'उगाचच' ओरड करतात को यामुळे गरिबाचा कणा मोडेल, गरिबांसाठी या अर्थसंकल्पात काही नाही; पण हे 'ओरड' करणारे वेडे आहेत झाल. त्याना काय काहीही दिले, सांगितले, पुढे ठेवले, मांडले, दाखविले, देणार म्हटले, करू म्हटले तरी यांचा आपला ओरडण्याचा कायमचा धंदा अखंड चालूच असतो.

आता हेच पहा, सरकारने अर्थसंकल्पापूर्वी भाववाढ केली; पण अर्थसंकल्पात ती केली का ? या प्रश्नाला तुम्हाला–मलासुद्धा नाही असेच उत्तर द्यावे लागेल. मग जर असा भाववाढ न करणारा अर्थसंकल्प आहे. तर मग त्याचे 'स्वागत' नको का करायला ? विरोधकांच्या व जनतेच्या ओरडीमुळेच सरकारने भाववाढ केली नाही, असे तुम्ही म्हणणारच, पण शेवटी तुम्ही ओरडायचे थांबणार थोडेच आहात ? आधीच भाववाढ करून मग अर्थसंकल्पात करू छान छान वातावरण, दाखविणारे हे सरकार 'खरच' किती चांगले आहे.

रंगीत टिव्ही, मोटारी, फ्रीज, रिफाईन्ड तेल या चैनीच्या गोष्टी सरकार महाग करणार आहे. आता बोला, सरकार श्रीमंताना कसं कैचीत कस पकडते की नाही. आम्हा गरिबाना खूप सवलती देते, पण तुम्हा 'टीकाखोराना' हे पटणार नाही. तुमचे लक्ष लगेच माजी माहिती व प्रसारण मंत्री वसंतराव साठे यांच्या १९८२ मधील एका विधानाकडे धावणार. ते म्हटले होते ना की पिकावरचे रोग विविध रंगाचे असतात ते या रंगीत टिव्हीमुळे दिसू शकतील. जनतेला त्यांची माहिती मिळेल. बरोबर याचा फायदा तुम्ही लोक उठविणारच. त्यावेळीही तुम्ही त्यांच्या या विधानाला हसला होतात आणि आता त्याच विधानाचा दाखला तुम्ही नक्की येथे देणार.

फ्रीज, मोटार यांची मागणी मुळातच देशात कमी, मग त्याच्या उत्पादनावर भर कशाला दिला, असाही एक 'बूट' तुम्ही आपल्या सुपिक डोक्यातून बाहेर काढणारच. तीन बरस के बाद, सात बरस के बाद आणि आणखी काही बरस के बाद उपयोगी पडणाऱ्या फ्रीजची दणकून जाहिरात होते तेव्हा ती चैनीची नसते का ? प्रदर्शनीय परिणाम सामान्यावर किती होतो याची जाणीव सरकारला नसते का ? असे विचित्र सवालही विचारले जाणारच; पण मी म्हणतो सामान्य माणसाला फ्रीजमध्ये ठेवण्यासाठी जॅम, फळ, अंडी, बटर, वगैरे वगैरे हे खरेदी करण्यासाठी पैसेच नसतात ना, मग त्यानी फ्रीजच्या किंमती वाढविल्या तर ओरडायचं कशाला. त्याना लागत नाही म्हणून आता आम्ही उत्पादन रचना का बदलायची ? हे म्हणजे फारच बुवा.

**बजेटमधला 'सट्टा' कमी**

एकूण काय की, आमची २१ व्या शतकाकडची वाटचाल तुम्हाला मान्यच नाही आता लघुउद्योजकांना वाव मिळावा म्हणून सरकारने या क्षेत्रातील गुंतवणूक मर्यादा २० लाखावरून ३५ लाखापर्यंत वाढविली. आता याचे तरी स्वागत कराल की नाही ? पण छे ! हसतमुखाने स्वागत कराल तर तुम्ही टीकाकार कसले हो ? तुम्ही यातही खोड काढणार व म्हणणार, त्यात काय ही मर्यादा वाढविणे हा फक्त भाववाढीचा परिणाम शोषून घेण्याचा प्रयत्न आहे झाल म्हणजे याचही तुम्हाला कौतुक नाही.

मग तुम्हाला हवय तरी काय ? सरकारने मागच्या अर्थसंकल्पावेळी जी आश्वासने दिली ती पाळली. एक पाऊल पुढेच टाकले. दीर्घकालीन वित्तीय योजना म्हटल्याप्रमाणे जाहीर केली आणि आता शेतमालाच्या किंमतीबाबतही एक दीर्घकालीन धोरण लवकरच सादर करण्यात येणार आहे. गेल्यावर्षी पीक विमा योजना पुन्हा सुरू करण्यात आली तर यंदा तीच योजना आता फळासाठीही लागू करण्यात आली, तर मग या प्रयत्नाना आता रसाळ गोमटी फळे येणार असं तुम्हाला खरोखर वाटत नाही का ?

काही टीका करणारे, तुम्ही आहात तरी कोणत्या गटातले ? गरिबाचे भले करावे ते तुम्हाला रुचत पटत नाही. त्याच्यासाठी योजना आखल्या तर अमलबजावणी होईल का अशी भीती व्यक्त करता. या योजनासाठीचे पैसे मधले लोकच, आजपर्यंतच्या अनुभवानुसार, खातील असेही तुम्ही म्हणता अहो पण नव्या सरकारवर, नव्या धोरणावर थोडा विश्वास दाखविला तर काही बिघडणार आहे का ? बरं आम्ही मध्यमवर्गाचे भले करतो म्हटले, तर त्याबाबतच्या सगळ्या सोयी तुम्ही उपभोगता नि वर पुन्हा ओरड करता. तुमच्या स्थिर उत्पन्नासाठी आम्ही नव्या योजना आखतो, वजावट वाढवतो, घरभाड्याच्या तरतुदी देतो; पण तुमचा एकच घोष आणि कपाळावर सदा आठ्या. तेवढ्यानं काय होतय ? हा टाईप ठरलेला. बरं मोठ्या उद्योगाना सवलती दिल्या तर रोजगार, मक्तेदारी याबाबत बोंब करता. छे बुवा काय कटकट आहे शिची !

अन् काही टीकाकार, मग जेव्हा सरकार तुम्हाला व्यवस्थित कर भरा, वेळेवर कर भरा म्हणते तेव्हा तुम्ही मागे का पळता ? पण आमचे अर्थमंत्री आता पक्के आहेत. त्यांनी गेल्यावर्षी खूप धाडी घातल्यात आणि या धाडी अशाच चालणार अशी घोषणा या

वेळच्या अर्थसकल्पिय भाषणात पुन्हा एकदा केली. तेव्हा जरा बचके ! पण तुम्ही घाबरणार, डगमगणार नाहीत याबाबत खात्री आहेच. आता तुम्ही परस्पर विश्वासाचा मुद्दा जुना झाला म्हणून निर्याचीचा मुद्दा पुढे करणार सरकार निर्यात वाढवा म्हणते आणि दुसरीकडे धाडी घालते, तेव्हा बाहेरचे देश आपल्या व्यापारी वा उद्योजकाबाबत असाच अविश्वास व्यक्त करतात, करणार, असा युक्तिवाद तुम्ही करता; पण खरच साहेब, कर भरपाईला पर्याय नसावाच नाही का ? हे तुम्ही समजावून घ्याच.

तुमच एक बरय बुवा ! [तुमच्या बाजूने नानी पालखीवाल्यासारखे मध्यस्थी उभे असतात. गेला अर्थसकल्प ज्याना अत्यत युगप्रवर्तक वाटला, त्यानाच हा नवा अर्थसकल्प विकासविरोधी वाटतो, बड्यावरच्या या धाडी त्याना लष्करीशाही वाटते. तर असे मोठे लोक तुमच्या पाठीशी उभे असतात. मग काय तुम्ही बजेटवर फक्त टीका करायला टपलेले असणारच !

आपण बजेटमधला 'सट्टा' कमी केला, गोपनीयता कमी केली हे आमच्या अर्थमत्र्यानी मोठ्या अभिमानाने आपल्या भाषणात सागितले त्यासाठी त्यानी दीर्घकालीन वित्तीय धोरणाचे उदाहरण दिले; पण याचसाठी तुम्ही टीकाकार तत्परतेने भाववाढीचेच उदाहरण देणार यात तिळमात्र शका नाही. शिवाय वर मानभावीपणे अशी गोपनीयता कमी करणे योग्य का ? त्यावर मखलाशी करीत उदाहरण देणार एखाद्या पाश्चात्य देशाचे एक अर्थमत्री असतो त्याचा एक पत्रकार मित्र असतो. बजेटच्या आधी गप्पा मारताना हे मत्री महोदय मित्राला, जो 'चेनस्मोकर' असतो. त्याला सागतात, यावेळी तुला जड जाणार, मपल, तो पत्रकार लगेच बातमी लावतो. यावेळी सिगारेटवर प्रचड करवाढ होणार. आणि त्यामुळे अर्थमत्र्याला राजीनामा द्यावा लागतो, पण आपल्या येथे अस काही होणार नाही याची मी आपल्याला खात्री देतो. एवढ्या तेवढ्या कारणावरून राजीनामा द्यायची पद्धत आपल्या इथे नाही. तसा एखादाच 'लाल' असतो. त्यामुळे गोपनीयता कमी झाली म्हणून उगाचच ओरड करण्याचे कारण नाही. उलट आता आम्ही या अर्थसंकल्पाची गोपनीयता कमी केली याचा आमच्या अर्थमत्र्याना 'सार्थ' अभिमान आहे आम्ही खुल्या अर्थव्यवस्थेबाबत अमेरिकेशी बरोबरी करण्याचा प्रयत्न करू लागलो आहोत, याचा हा एक दाखला आहे काही वर्षांनी सरक्षण उत्पादनही खासगी क्षेत्रात गेले, तरी चिंता बाळगण्याचे कारण नाही; पण काही म्हणा, प्रा. एच्. के. पराजपे, याच्या सारख्याना सरकारच्या या 'व्यथा' कळत नाहीत हेच खरे. ते लगेच खासगीकरणाची आरड करतात

### अकल्याणच फक्त

असो, माफ करा टीकाकार हो, थोडे विषयातर झाले खरे. आले, आले माझ्या लक्षात आलेच आता. तुम्ही तुमच्यादृष्टीने महत्वपूर्ण वाटणाऱ्या एका विषयाकडे माझे लक्ष खेचू इच्छित आहात. मलाही आश्चर्य वाटलेच होते की, हा मुद्दा तुमच्या लक्षात का आला नाही. त्याबाबत टीका करायची सधी तुम्ही कशी सोडलीत. तुटीचा, अर्थसकल्पिय तुटीचाच मुद्दा म्हणताय ना ? काय ? ही महाभयंकर तूट आहे ! आता मात्र कहर झाला. भाववाढ केली तरी तुम्ही ओरडता, कर लादले तरी तुम्ही ओरडता मग सरकारने पैसा उभा करायचा तरी कसा ?

ठरं, सरकारचे बजेट म्हणजे काही घरगुती बजेट नव्हे. घरगुती बजेटमध्ये कस आपण आपल वेतन–मिळकतीचे पाघरूण किती लाब, मोठे आहे त्यानुसार आपले पाय पसरतो. शक्य झाल तर आपण थोडे पाघरूण शिल्लकच ठेवतो बचत करतो आपलं बजेट शिलकी करतो. पण सरकारला देशाचा विकास साधायचा असतो आजची मिळकत कमी असली तरी उद्या ती वाढवून अधिकाधिक लोकाच कल्याण साधायचे यासाठी सरकार वास्तव सपत्तीपेक्षा अधिक पैसा निर्माण करते. बजेटात तूट दाखवते आणि दुसऱ्या वर्षी वास्तव सपत्ती वाढवून ही तूट शोषून घेत असते. त्यामुळे तूट ही अनावश्यक म्हणणे चूक ठरते. उलट विकासासाठी ती आवश्यक ठरते

सॉरी साहेब, तुम्हाला ही उपपत्ती, थिअरी समजून सागावी हा काही उद्देश नाही कारण आपल्यासारख्या टीकाकाराना ती चागलीच ठाऊक आहे, याची मला जाणीव आहे पण थोडे विस्मरण झाले होते पण साहेब आणखी एक गोष्ट मला सागावीशी वाटते, आणि ती म्हणजे सरकारने दिलेली आकडेवारी पाहिली. तर किमतवाढीच्या दरात घट झालेली दिसते १९८३ मध्ये हा दर १२.८३ टक्के होता, १९८४–८५ मध्ये ४.४४ टक्के होता तर गेल्या वर्षी ७.१४ टक्के होता. आणि अशावेळी जेव्हा किमतवाढीचा धोका कमी असतो तेव्हाच तुटीचे हे पाऊल उचलावे लागते त्यामुळच सरकारने मग १९८६–८७ च्या अर्थसकल्पात ३६५० कोटी रु. ची तूट धरली आहे

आपल्यासारख्या महनीय टीकाकाराचे की टीकाखोराचे समाधान यामळे होईल अशी बिलकूल शक्यता नाही. तुम्ही लगेच स्वत चा अभ्यासूपणा दाखवित सरकारपुढे सरकारचीच आकडेवारी फेकणार व म्हणणार आजपर्यंत अपेक्षित तूट व सुधारीत अंदाजानुसार व्यक्त केलेली तूट यात नेहमीच फरक–वाढता फरक आढळून आलेला आहे. अगदी तुमच्याच नव्या सरकारच्या काळातले उदाहरण द्यायचे झाले. तर ३३१६ कोटी रु. तूट होईल हा तुमचा अदाज पण प्रत्यक्षात सुधारीत अदाजाप्रमाणे ही तूट आता ४४९० कोटी रु. होईल त्याचप्रमाणे यावर्षी आता १९८६–८७ साली, ३६५० कोटी रु अर्थसकल्पिय तूट अपेक्षिण्यात आली आहे. ती तूट सुधारीत 'आवृत्तीत' वाढलेली तर खात्रीने दिसणारच.

शिवाय किमतवाढ ही पाच टक्क्याच्या आत असेल तरच तूट योग्य ठरते. यावेळी ही भाववाढ ७.१४ टक्क्याने झाली आहे. खेरीज ही भाववाढ दिसते ती घाऊक स्वरूपातली. किरकोळ स्तरावर तर ही भाववाढ वेगवेगळ्या स्वरूपात दिसते. त्यामुळे तुटीमुळे उत्पादन वाढून कल्याण होण्याऐवजी अकल्याणच अधिक होते. कारण अधिक पैसाच फक्त अर्थव्यवस्थेत जातो, पण त्या प्रमाणात वास्तव वस्तू उत्पादन वाढत नाही. म्हणून फक्त मागणी वाढते व किमती वाढतात आणि एकदा हे सुरू झाले की अर्थव्यवस्था चलनवाढीच्या चक्रात गुतते. आणि त्यामुळे पश्चिमी अर्थतज्ज्ञ फ्रिडमन म्हणतो की, तुटीचा अर्थभरणा म्हणजे जनतेने सरकारला कर्ज म्हणून मोफत दिलेली रक्कम होय.

हो, हो, हो साहेब, तुम्हीही तात्त्विक चर्चेतच शिरलात. सरकारला या सर्व बाबींची कल्पना आहे म्हटल. तुम्हाला थोडी सधी मिळाली की तुम्ही सरकारला किती मेटाकुटीस आणता ? यामुळेच मग पतप्रधान राजीव गाधी हे लोकसभेत काही तासाच्या भाषणात आपली तळमळयुक्त तक्रार व्यक्त करतात या विरोधकांना सरकारची विधायक पाऊले दिसतच नाही, प्रगती दिसतच नाही. फक्त दोषावरच टीका करतात. पहा पतप्रधानाना तुमच्या 'दिशाहीन' टीकेचा किती त्रास होतोय. तेव्हा तुम्ही टीका करण्यापूर्वी विचार करा विधायकता प्रथम 'शोधा' नि नतर सरकारचे 'कुसळ' की 'मुसळ' दाखवा. □

# खारीच्या वाटा

सुधा नरवणे

स्त्रीमुक्ती चळवळींवर आजपर्यंत बरच काही लिहिल गेल आहे. उलटसुलट विचार व्यक्त होत आहेत. स्त्रीमुक्तीवादी नेत्यांनी काही वेळा अतिरेकी भूमिका घेतल्यानं या चळवळीला पोषक वातावरण निर्माण होण्याऐवजी त्यावर प्रतिकूल परिणाम मात्र होत आहे. स्त्रीमुक्तीची टिंगल, टवाळी करणारे लेख, विनोदी चुटकेही प्रसिद्ध होत आहेत.

मतामतांच्या या गलबल्यात सामान्य स्त्री आणि पुरुषही भावावून गेले आहेत. स्त्रीमुक्ती म्हणजे नेमकं काय हे समजत नाही. घर संसार नको, नवऱ्याचं बंधन नको आणि अपत्यांचे पाशही नकोत, मनात येईल तेव्हा स्त्री 'ऊंबरठा' ओलांडायला मोकळी असली पाहिजे असा स्त्रीमुक्तीचा अर्थ मला तरी अभिप्रेत नाही.

समाजात स्त्रीला, प्रत्येक ठिकाणी, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आणि कुठल्याही परिस्थितीत मानानं आणि प्रतिष्ठेन वागवलं गेल पाहिजे, आपण सर्वांनी याबाबत आग्रह धरला पाहिजे, स्त्रीला केव्हाही कमीपणानं वागवता कामा नये असा स्त्रीमुक्तीचा अर्थ मला अभिप्रेत आहे.

मी अनुभवलेले दोन तीन प्रसंग मला या संदर्भात वाचकांपुढं ठेवावेसे वाटतात.

माझ्या नेहमीच्या सुखी, शांत, संपन्न आयुष्यात एक दिवस असा आला की त्यामुळं माझ्या जीवनात मोठीच उलथापालथ झाली. माझी मुलगी लग्नानंतर चारच वर्षांनी माघारी आली. तिच्याबरोबर तिची पितृविहीन मुलगी—अवघी वर्षा सव्वा वर्षाची.

माझ्या मुलीवर पतिनिधनाचा प्रसंग ओढवला तेव्हा 'आकाश कोसळलं' किंवा 'वैधव्याची कुऱ्हाड कोसळली' असले विचार माझ्या मनात आले नाहीत. किंवा मी हे शब्दही वापरले नाहीत. त्याला अपघाती मरण आलं आणि तिच्या जीवनाची दिशा बदलली. दुःख वाटलं ते तिच्या वैयक्तिक हानीचं. तिचे सुखी संसाराचे इमले जमीनदोस्त झाले, मनोरथ भग्न झाले आणि स्वप्नांचे पक्षी परागंदा झाले...

माझ्या हृदयाची तडफड होई ती यासाठी की, प्रिय व्यक्तीच्या चिरविरहाचा हा आघात ती तरुण वयात कसा सहन करील? झेपेल का तिला हे दुःख? तिच्या अंतर्यामीच्या जखमेचा, त्या कोवळ्या जिवावर किती आणि कसा परिणाम होईल? निष्पाप, निरपराध, निर्व्याज आणि निरागस अशा त्या छकुलीला यापुढं कोणकोणत्या विचित्र प्रसंगांना तोंड द्यावं लागेल?

माझी मुलगी नोकरी करीतच होती. ती तिनं पुढंही चालू ठेवली. पतीच्या मृत्यूनंतर महिनाभरात ती नोकरीवर जायला लागली. पूर्वी जो पोषाख करीत होती तसाच—कधी साडी तर कधी सलवार कुडता, कुंकू कधी लावायची किंवा लावायचीही नाही. तिची संवय तिनं पुढंही चालू ठेवली. तिच्यामागं किंवा समोरही लोक कुजबुजत ...कशाला नेसायचं हे हिरव्या रंगाचं पातळ?... कशाला घातलेत ते लोंबते डूल?...आणि केसात फुलं?...नवरा गेल्याचं हिला दुःख तरी झालंय् का...'

एक ना अनेक...या प्रसंगांना तिनं स्वतः कसं तोंड दिलं कुणास ठाऊक? आम्हा दोघांना तिच्या आईवडिलांना – आणखी दुःख होऊ नये म्हणून ती हसतमुख राही. आम्ही तिला सांगितलं होतं,—'तू नेहमीसारखी रहा, पांढरी पातळं, भुंडे हात, बुच्चे कान हे सारं लोकलाजेनं करण्याची काही जरूरी नाही. कुणी कितीही नावं ठेवली तरी आम्ही तुझ्या मागं आहोत— हिरव्या रंगाची साडी नेसाविशी वाटली तर अवश्य नेस... लाल रंगाचा कुडता आवडतोय्...अवश्य घाल...' एकच कर...स्वतः कोसळू नकोस ...छोटया मुलीला नीट वाढवण्याचा प्रयत्न कर...वैयक्तिक दुःख, वैफल्य याचा वचपा तिच्यावर काढू नकोस— तिथं कमी पडू नकोस...तो धोंड आहे असं वाटून घेऊ **नकोस—**

तिच्या वैधव्यदशेत मी अनेक लहानमोठ्या कटु प्रसंगांना तोंड दिलं. त्यावेळी वाईट वाटलं नाही असं खोटं कशाला सांगू? पण त्या वाईट वाटण्यातही मी एक ठाम विचार मनात बाळगला होता का, माझी मुलगी विधवा असली तरी ती कोणत्याही प्रकारे कमी दर्जाची व्यक्ती नाही. मी तिला तसं वागवणार नाही आणि इतर कुणी वागवलेल खपवून घेणार नाही.

चैतातल्या हळदीकुंकवाची मला आमंत्रणं येत— 'या बर का अवश्य- सुनेला घेऊन या.'

तात्रडतोब मनात विचार येई. माझी मुलगी माझ्या घरी आहे ते माझ्या या मैत्रिणींना माहीत आहे. तिचा उल्लेख का नाही केला यांनी? का नाही तिलाही आमंत्रण दिलं? त्या व्यक्तींना दोष देण्याची माझी इच्छा नाही. त्यांच्या पुढेही पेच पडला असेल की, यांच्या मुलीला बोलवावं का न बोलवावं? प्रत्येक माणसाला सामाजिक रूढीच्या विरूद्ध जाण्याच धैर्य असतंच असं नाही. मंगळागौर, संक्रांतीचं हळदकुंकू, दिवाळीतलं लक्ष्मीपूजन, सत्यनारायणाची पूजा–किती तरी समारंभांना मला बोलावणी येत— मात्र तिला कुणी आवर्जून बोलावत नसत— कुणी मोघम आमंत्रण देत–'या बरं का सर्वजण!' एके ठिकाणी मी मुद्दाम मुलीला आणि नातीला लग्नाच्या स्वागत समारंभाला घेऊन गेले...खाऊन-पिऊन झालं आणि दारात हळदीकुंकू, अत्तरगुलाब, फुलं देण्याच्यावेळी नेमकं माझ्या मुलीला वगळलं गेलं—ते नजरचुकीनं झालं की, हेतुतः—मला माहीत नाही! माझं मन तेव्हा इतकं अधू झालं होतं की, एवढ्या—तेवढ्यानं मी दुखावली जायची—

शेवटी ठरवलं. जिथं असे प्रसंगी येण्याची शक्यता आहे, तिथं जायचंच नाही. आमंत्रण

करणाऱ्यांच्या इच्छेचा अवमान होऊ नये, म्हणून मी नंतर दोन-तीन दिवसांनी जाऊन शुभेच्छा, अहेर, बाळंतविडा काय द्यायचं ते देऊन येत असे. दुसऱ्या माणसांच्या सुख-दुःखात सहभागी व्हायचा माझा नेहमीच प्रयत्न असतो. माझ्या कुटुंबात शोकात्म घटना घडली म्हणून इतरांच्या जीवनातल्या आनंददायी प्रसंगांवर मी बहिष्कार घातला नाही.

काळ हे सर्व दुःखावरचं औषध आहे. माझ्या मुलीच्या दुःखावर खपली धरली. मीही स्वतःला सावरलं. तिचा उभा जन्म एकाकीपणे जावा असं मला मुळीच पटणारं नव्हतं. मी तिचं मन पुनर्विवाहासाठी तयार केलं. तिनं एकच अट ठामपणे घातली की, 'माझ्या मुलीसह माझा स्वीकार करणाऱ्या पुरुषाशीच मी लग्न करीन. पुनर्विवाहात इतर काहीही तडजोड करीन; पण मुलीच्या बाबतीत मी दुसरा पर्याय स्वीकारणार नाही–'

सर्व शक्तिनिशी मी तिच्या पुनर्विवाहाच्या खटपटीला लागले. तिची अट प्रथम सांगत होते.

'सापत्य विधवा' हे शब्द ऐकून लोक अंगावर पालच काय पण त्यापेक्षा किळसवाणी, गलिच्छ वस्तू अंगावर पडल्यासारखे शहारे देत. विधुर, घटस्फोटित, प्रौढ वयाचे प्रथम वर–प्रत्येकालाच वाटे असली मुलगी आम्हाला सुचवण्याचं औद्धत्य यांना होतंच कसं?

विधवा स्त्री म्हणजे कुणी पापिणी, गुन्हेगार, त्यातून तिला मूल असणं म्हणजे तर सर्व दुःस्थितीचा कडेलोटच– कुणी म्हणे, छोट्या मुलीला तुम्ही सांभाळा–एका सापत्य विधुराची, घटस्फोटित पुरुषाचा मुलं मात्र त्याच्या नव्या पत्नीनं सांभाळावीत ही अपेक्षा आणि त्या स्त्रीची मुलं मात्र तिनं दुसरीकडं ठेवून नव्या संसारात प्रवेश करावा ही अपेक्षा!!

ते सारं अन्यायकारक वाटलं एवढंच नव्हे, तर मला दुष्टपणाचंही वाटलं. येथेही मला स्त्रीला हीन, दुय्यम दर्जाची लेखणं या मनोवृत्तीचाच अनुभव आला. माझ्या मुलीचा पुनर्विवाह जमवणे कठीण आहे ते माझ्या लक्षात आलं. त्यावेळी तिनं पुनः निर्धारपूर्वक मला सांगितलं, 'मी जन्मभर अशीच राहीन. पण तिला सोडून दुसऱ्याचा संसार करायला जाणार नाही.' आमच्या पाठिंब्यामुळे तिला आणि तिच्या खंबीरपणानं आम्हाला आमच्या तत्त्वाशी चिकटून राहता आलं. पुरुषांची कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही वयात लग्नं होतात. परंतु स्त्रीला मात्र पदोपदी लाचारीची भूमिका घेऊन वागावं लागतं, ते संतापजनक आहे अशा वेळी नुसता वांझोटा संताप कुचकामी ठरतो. कृती करून दाखवली तरच मागच्याला काही मार्ग दिसतो.

माझ्या प्रयत्नांना यश येऊन आम्हाला एक प्रगल्भ विचाराचा तरुण भेटला. पहिल्या भेटीतच उभयपक्षांच्या अटी स्पष्ट झाल्या होत्या. लग्न ठरलं तोवर आमची नात सहा वर्षांची झाली होती. तिला पुष्कळसं काही कळत होतं आणि पुष्कळसं कळत नव्हतंही.

तिच्या चिमुकल्या भावविश्वात कोणते तरंग उठणार हे त्या क्षणी सांगता येत नव्हते. नव्या पित्याचं आडनाव तिला मिळावं म्हणजे तिच्या नव्या जीवनात तिला अडचण भासणार नाही, या हेतूनं आम्ही दत्तकविधानाचा घाट घातला. इथंही मला अनपेक्षितपणे एका वैचारिक संघर्षाला तोंड द्यावं लागलं. नातीचं दत्तकविधान हे केवळ



नाव बदलण्याच्या एकमेव हेतूसाठी होत. इस्टेटीचा प्रश्न नव्हता– पैशाची देवाणघेवाण नव्हती. कोर्टात जाऊन रजिस्ट्रारपुढं देवाणघेवाणीची शपथ घेण म्हणजे दत्तक घेणं किंवा देणं अस स्वरूप कायद्यात बसत नाही त्यासाठी कायद्यानुसार धार्मिक समारंभ करावाच लागतो असं कळलं.

मी पुरोहिताच्या शोधार्थ निघाले. एक जण भेटले समारंभाचं स्वरूप, गाभीर्य समजावून सागितलं दक्षिणा ठरली मग त्यानी विचारलं, 'मुलीला दत्तक देणार कोण ?'

'कोण म्हणजे ? तिची आई ?' मी आश्चर्यानं म्हटल...

'त्या कशा चालतील ? धार्मिक समारंभाला सवाष्ण हवी–'

पुन: अगाला चटके बसले. त्याना तिथंच तसं सोडून मी वकिलाकडे गेले. दत्तकविधान समारंभाच सपूर्ण कायदेशीर स्वरूप समजावून घेतलं. सवाष्णच पाहिजे अस कायद्यात कुठंही म्हटलं नव्हत–प्रश्न होता पौरोहित्य करणाराचा. दोघा-तिघानी नकार दिला.

मग एका प्रसिद्ध सामाजिक सस्थेची माहिती मिळाली. तिथं मुलाप्रमाणे मुलीच्याही मुजी लावतात अस कळल. मुजीचा अर्थ समजावून सागतात. तिथल्या गुरुजीना भेटले. त्यानी आढेवेढे घेतले. म्हणाले, वाईट दिसेल–'

मी विचारलं, 'कुणाला वाईट दिसेल ? आम्ही सारी घरचीच माणसं आहोत. त्यातूनही ज्या कुणाला वाईट दिसले त्यांना दिसू दे– त्यांनी डोळे मिटून घ्यावेत–'

माझा हा वादविवाद चालू असता माझ्या घरची माणसं, खुद्द माझी मुलगी मला म्हणत होती, 'जाऊ दे ना–तुम्हा दोघाच्या हातून ती दत्तक दिली गेली तरी काय हरकत आहे–? एक प्रकारे तुम्हीच तिचे आई-वडील आहात संकटकाळी तुम्हीच तिला साभाळत–आधार दिला–तुमच्या हातून ती दुसऱ्याच्या स्वाधीन केली तरी चालेल––

या टप्प्यापर्यंत मी हट्टाला पेटले होते. प्रश्न आमचा नाही. आम्ही दोघानी स्वत.च्या पोटच्या मुलीसाठी काय केलं अन् नातीसाठी काय केलं हा मुद्दा अगदीच वेगळा–

समाजान एका स्त्रीला ती केवळ सुवासिनी नाही म्हणून एका धार्मिक समारभात तिचा हक्क डावलायचा हेच मला अत्यत मानहानिकारक वाटलं–

मी कायदा वाचून आले आहे हे त्या गुरुजीना सांगितल– आमचे विचार त्याना पटले आणि त्यानी नंतर कोणताही अनमान न करता तो समारंभ पार पाडला. त्या दत्तविधानाची कायदेशीर नोंदणी होऊन आता आमच्या नातीला नवा पिता मिळाला आहे.

वादविवादाला कटाळून अथवा दुसऱ्या पुरोहिताला शोधण्याच्या त्रासाला भिऊन मी त्या प्रसंगी आग्रह धरला नसता, तर मी कच खाल्ली असा अर्थ झाला असता. मी माझ्या तत्त्वपालनात उणी पडले अशी खत मला जन्मभर भासली असती. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे कोणतीही स्त्री कुठल्याही प्रसंगी गौण मानली जाता कामा नये हे मी काही लोकाना तरी पटवून देऊ शकले नियतीनं दिलेल्या तडाख्यानं अतर्यामी कोसळलेली माझी मुलगी या प्रसगानं अधिक स्वाभिमानी बनली असेल. तिच्या न्याय्यहक्कासाठी मी धरलेल्या आग्रहामुळं आणि तो यशस्वी करून दाखवल्यामुळं, तिच्याही आत्मविश्वासात आणखी भर पडली असेल.

मी जे केलं ते स्वत.च्या मुलीसाठी हे नि:संशय; पण अशाच तऱ्हेनं एका स्त्रीन दुसऱ्या स्त्रीचा सन्मान आग्रहपूर्वक जपला पाहिजे. एका स्त्रीला तुच्छ लेखल गेलेलं दुसऱ्या स्त्रीनं खपवून घेता कामा नये. स्त्री मुक्तीसाठी आपण अशा तऱ्हेनं झटल पाहिजे.

दुसरा एक प्रसग आहे तो मृत्यूसारख्या दुख:द घटनेनंतरचा–

माझ्या ओळखीचं एक कुटुब– आई वडील आणि एकुलती एक मुलगी– उत्तम सस्कार, उत्तम विद्या देऊन वाढवलेली, मध्यमवर्गीय ससारात बसणारे चटके सोसत मुलीला डॉक्टर केलं. (येथे मुलीनं डॉक्टर होणं हा मुद्दा महत्त्वाचा नाही) तिला तिच्या स्वतःच्या पायावर उभं राहणारं शिक्षण दिलं ते महत्त्वाचं. योग्य वेळी तिचं लग्न झालं. नवराही चांगला कर्तृत्ववान मिळाला. दोघं मिळून हॉस्पिटल चालवतात. दोन्हीकडच्या कुटुबांना सांभाळतात. या मुलीची आई असाध्य दुखण्यान आजारी पडली. हिनं आईची मनोभावे शुश्रूषा केली. पैशाला, कष्टाला काहीही कमी केलं नाही. तरी त्यांचा त्या आजारात अंत झाला

उत्तरक्रियेच्या वेळी भटजी म्हणाले, याना मुलगा नाही तेव्हा अग्नि द्यायला दुसरा पुरुष...' ती मुलगी तडफेन उठली–' माझ्या आईचं और्ध्वदेहिक मीच करणार– मी तिच्या पोटी मुलगी म्हणून जन्म घेतला आणि मुलगा म्हणून नाही यामुळ माझ स्थान कमी प्रतीच ठरत नाही.'

–भटजी तयार होईनात आणि ही तर ऐकेना... पार्थिव देह तसाच अत्यसस्काराची वाट पहात पडलेला... अनेक प्रलाप ऐकू आले, 'काय अगोचर कार्टी आहे ..'

'ही वेळ आहे का असले वाद घालण्याची.'

'मोठा टेंभाच फार कर्तृत्वाचा..'

'अग तुझ्या आईला मत्राग्नि नको का मिळायला...'

तिन सर्व बोलणी कानाबाहेर टाकली. 'माझं आणि माझ्या आईचं एकमेकींवर कमालीच प्रेम होतं.. माझ्या हातान तिला मिळणारा अग्नि भडाग्नी असला तरी तिचा आत्मा तळतळणार नाही याची मला खात्री आहे ..'

तिच्या खबीरपणाचं आणि धैर्याच कौतुक करावं तेवढं थोडंच असं वाटतं शिष्टाचाराच्या कल्पना बाळगून तिनं तो आग्रह सोडला असता, तर सामाजिक परिवर्तनाचा क्षण हातातून सुटला असता 'काही काळ वेळ आहे का नाही या वादाला' असं म्हणणाऱ्या वडिलधाऱ्यांच्या मताला तिन मान दिला असता तर मग आपली तत्त्व नंतर कठशोष करूनही तिला दुसऱ्यांना पटवून देता आली नसती. मुलगी म्हणून मुलापेक्षा केव्हाही कधीही कमी नाही, ते पटवण्याचा तो एकच क्षण होता. त्यासाठी तिला टीकेचे वार सोसावे लागले. आईच्या चिरविरहाचं दु.ख बाजूला ठेवून वादग घालीत बसणं यात तिला काही विशेष आनंद मिळाला अस नव्हे. स्त्रीची प्रतिष्ठा राखण्याचा तिचा तो प्रयत्न होता. त्यात ती उणी पडली नाही यासाठी मी तिची पाठ थोपटते आहे.

याउलट आणखी एक प्रसंग– माझी मैत्रिण – पन्नाशी ओलाडलीय– आयुष्यभर एका मनोरुग्णाशी संसार केला. तीन मुलं झाली. त्यांना डोळ्यात तेल घालून वाढवलं. शिक्षण दिल. सद्वर्तनी बनवलं... कोणापुढं दैन्य दाखवल नाही... याचना केली नाही. स्वत:ची नोकरी सांभाळून मुलाची आयुष्यं

मार्गी लावून दिली... तो मनोरुग्ण पती जिवंत होता तेव्हा तिला सवाष्णीचे सर्व मानपान लाभत होते. तिच्या शेवटच्या अपत्याचे– मुलाचे लग्न ठरले तेव्हा नुकताच त्याचा अंत झाला होता. आता तिचं समाजातलं स्थान एकदम बदललं... आता धार्मिक कार्यक्रमात ती चालेनाशी झाली. वास्तविक तिच्या पतीच्या हयातीतही तो तिच्या लेखी असून नसल्यासारखाच होता. प्रथम मनोरुग्ण नंतर शारीरिक दौर्बल्य, शेवटी भ्रष्टचित्त हरवल्यासारखा वागणारा तो पुरुष तिला कुठल्या अर्थानं आधार देत होता? नव्हता आर्थिक आधार की मानसिक आधार! पतिपत्नीचं नातं तर केव्हाच संपुष्टात आलं होतं. तरीही तो हयात होता तेव्हा माझ्या मैत्रिणीला कुंकू लावायचा हक्क होता. नटण्यासजण्याची मुभा होती. तिला हळदी-कुंकवाची आमंत्रणं येत, सवाष्ण म्हणून श्रावणी शुक्रवारी कुणी सन्मानानं जेवायला बोलवी... वेळप्रसंगी तिची ओटी भरत...

सारं क्षणार्धात पालटलं. का? तर केवळ नावापुरता उरलेला तिचा पती हे जग सोडून गेला! लगेच तिचं कर्तृत्व संपल का? आयुष्यभर प्रतिकूल परिस्थितीशी झगडा करीत करीत तिनं स्वतःला सांभाळलं, मुलांना घडवलं हे लगेच मातीमोल ठरलं का?'

स्वतःच्या मुलीच्या लग्नात ती स्वतः कन्यादान करू शकली नाही... सीमंतपूजन, पुण्याहवाचन–सगळे विधी तिच्या खर्चाने झाले... पण ती सर्वत्र मागं... सवाष्ण नाही ना!

लग्न लावलं मामा–मामींनी... ही बाजूला...

लग्नाआधी मी तिला म्हटलं, 'बाई ग, मी काही तुझ्या घरच्या या लग्नाला येणार नाही...' 'हे ग काय? तू पण मला ऐन वेळी सोडणार?' 'नाही बये. जिथं तुला मान देत नाहीत तिथं मला यावसं वाटत नाही... तुझा मान राखायचा म्हणूनच मी येत नाही. तू या रुढींना बळी पडतेस हे मला पाहवत नाही...'

सद्‌गदित कंठानं, अश्रूपूर्ण नयनांनी ती मला म्हणाली, 'अशी चार–सहा माणसं माझ्यासारखीच्या मागं राहतील, आम्हाला पाठिंबा देतील तरच आम्हाला धैर्य येईल. एकटीदुकटीचं हे काम नाही...'

अलिकडे लग्नपत्रिका गतधवा स्त्रियांच्या नावानं निघतात ही एक स्तुत्य पद्धत अंमलात यायला लागली आहे.

अशाच सुधारणा लहान–मोठ्या प्रसंगातून आपण घडवून आणायच्या आहेत. कणाकणानं, क्षणाक्षणानं सामाजिक परिवर्तन घडवून आणायचं आहे. त्यासाठी कंठाळी आक्रोश नको. नवरा–मुलं वाऱ्यावर सोडून उंबरठे ओलांडायला नकोत...

एक पणती आपल्याला प्रत्येकाला लावता येईल. त्या पणतीच्या प्रकाशामुळं धीर येऊन दुसऱ्या कुणाला पणती लावावीशी वाटेल... त्या उजेडाचा परिणाम होऊन तिसरी... चौथी... असा हा खारीचा वाटा आपल्यापैकी प्रत्येकजण स्त्रीमुक्तीच्या चळवळीत उचलू शकेल! □

# शब्दांचं अंगण

## विज्ञानसाहित्य

आशा कर्दळे

गेल्या ५०–६० वर्षात विज्ञानानं मानवी जीवनचर्येत खूप बदल घडवून आणला आहे. पण विज्ञानाची माहिती सामान्य माणसापर्यंत पोचवायला वैज्ञानिक फारसे उत्सुक नसतात. वैज्ञानिक संशोधनाची माहिती सगळ्यांना व्हावी म्हणून विज्ञानकथा या तंत्राचा अवलंब डॉ. जयंत नारळीकरांनी प्रथम केला. त्यांच्याच शब्दात, विज्ञानाची कडू गोळी साखरेच्या (कथेच्या) आवरणात घालून त्यांनी लोकांसमोर ठेवली.

विज्ञानाची व्याप्ती फार मोठी आहे. विज्ञानानं या विश्वातली अनेक क्षेत्रं व्यापली आहेत. तेव्हा विज्ञान या विषयाची पुस्तकं आणि विज्ञान कथा–कादंबरी या दोन्ही प्रकारच्या साहित्याचा विचार या लेखात केलेला आहे.

विज्ञानकथा प्रथम मराठीत लिहिण्याचा मान डॉ. जयंत नारळीकरांचाच आहे. 'यक्षांची देणगी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. 'अंतराळातील भस्मासुर' हा त्यांचा नवा विज्ञानकथा संग्रह श्रीविद्या प्रकाशननं प्रसिद्ध केला आहे. विज्ञान कथा ही विज्ञानाच्या दृष्टीनं उद्‌बोधक आणि मनोरंजक असावी अशी त्यांची अपेक्षा आहे. विज्ञानकथा काही वेळा भविष्यातल्या विज्ञान प्रगतीचा वेध घेते. एखादी वैज्ञानिक कल्पना ही पायाभूत असतेच. डॉ. नारळीकरांच्या नव्या संग्रहातली 'हिमप्रलय' ही कथा, पृथ्वीवर वेळोवेळी हिमयुगं का अवतरतात त्याची जी कारणमीमांसा फ्रेड हॉयेलनं केली होती, त्यावर आधारित आहे. 'अंतराळातील भस्मासुर' या कथेत वाढत्या यंत्रावलंबनाचे धोके वर्णन केले आहेत. नियंत्रणाबाहेर गेलेलं सर्वनियंता असं गणकयंत्र त्याची एक वेगळी झलक या कथेत आहे. 'पेरुवाडीतील पुष्पक' या कथेत उडत्या तबकड्यांचा विषय आहे. लेखकाच्या मते असं काही नसतंच. 'अँथेन्सचा प्लेग' ही उत्कृष्ट कथा. त्यात हॉयेलचाच एक सिद्धांत आहे. अंतराळात रोगजंतू असतात व ते कोणत्याही मार्गाने पृथ्वीवर आले की नवे रोग फैलावतात. त्या सिद्धांतावर आधारित ही कथा आहे.

मराठीत हाताच्या बोटांवर मोजण्याइतके विज्ञानकथा–कादंबरी लेखक आहेत, याची डॉ. नारळीकरांना खत वाटते. पाश्चात्य देशांमध्ये या उलट स्थिती आहे. आर्थर क्लार्क, फ्रेड हायेल, एच्. जी. वेल्स, जुल्स व्हर्न, आयझॅक अ‍ॅसिमोव्ह अशी ही यादी शंभराच्या घरात जाईल! विज्ञानकथा किंवा कादंबरी लिहायला काही संशोधनच करायला हवं असं नाही, आणि द्रष्टेपणासाठी वैज्ञानिकच असायला पाहिजे असं नाही, असं नारळीकर आवर्जून सांगतात. त्यासाठी ते इ. एम्. फॉर्स्टरचं उदाहरण देतात. तो वैज्ञानिक नव्हता पण त्यानं यंत्रावलंबी संस्कृतीवर 'यंत्र थांबते' ही

सुदर कथा लिहिली.

जयत नारळीकरानी 'प्रेषित' या नावाची अतिशय सुरेख विज्ञान कादंबरीही लिहिली आहे

विज्ञान लेखकामध्ये निरंजन घाटे याचं नाव प्राधान्यान घ्याव लागेल त्यानी विपुल निर्मिती केली आहे. वारस, फिनिक्स, रामचे आगमन, काल्यत्राची करामत, मच्छर, आक्रमण, सक्रमण, साक्षात्कार, आभाळातून पडलेला माणूस ( कादबऱ्या ), झू, स्पेसजॅक (कथा सग्रह) अस साहित्य त्याच्या नावावर जमा आहे. 'अखेरचा मनू', 'घुमट' या त्यांच्या आगामी विज्ञान कादबऱ्या 'झू' या कथासग्रहात घाटयाना आवडलेल्या पाश्चात्य विज्ञान कथाचा अनुवाद-सग्रह आहे. 'वारस' ही चितामणी पब्लिशिंग हाऊसनं प्रकाशित केलेली कादंबरी. यात सूर्यमालेतल्या इतर ग्रहावर माणसाची वस्ती झाली आहे अस कल्पून चित्रण केल आहे. यात यत्रमानवाचा मुक्त वावर आहे त्रिमित दूर सपर्क साधन, आकाशगामी गाडया, लेविटेटर्स, ( म्हणजे प्रतिगुरुत्वाकर्षणावर आधारलेली यत्रणा. त्यामुळे माणसं वर उचलली जातात. ) लेसर झोत सोडणारी लेझर पिस्तुल, प्लास्पर (प्लास्टिक पेपर ) अशा अनेक वैज्ञानिक शोधाचा परिचय ही कादबरी वाचून होतो. 'युगधर' ही घाटयाची, अभिजित प्रकाशनन काढलेली नवी कादबरी तिला ते 'स्पेक्युलेटिव्ह फॅन्टसी' म्हणतात. सायन्स फिक्शन आणि सायन्स फॅन्टसी ( रंजन ) मिळून हे रसायन सिद्ध होतं ! मानवी मन ही अतीन्द्रिय शक्ती आहे. दुसऱ्याच्या मनातले विचार ओळखणे आणि भविष्यातल्या घटना सागणं याला वैज्ञानिक स्पष्टीकरण नाही. पण हे घडत हे खरं. तसच मानसिक शक्तीच्या सहाय्यानं लाबच्या वस्तू हालवणं हाही प्रकार अशक्य कोटीतला समजायला नको. यावर लिहाव अस खूप दिवसापासून त्यांच्या मनात होत. 'युगधर' ही अशीच कादबरी.

### स्पेसजॅक–विप्लवा

निरजन घाटयाचा 'स्पेसजॅक' हा स्वतत्र विज्ञानकथाचा सग्रह गेल्या वर्षी प्रसिद्ध झाला प्रकाशक, मेहता पब्लिशिंग हाऊस. स्पेसजॅक म्हणजे हवाई चाचेगिरीचा अवकाशातला प्रकार; पण यातल्या बहुतांश कथा पृथ्वीवरच घडतात घाटे म्हणतात की, मीही सुरुवातीला अवकाशाच्याच प्रेमात पडलो. इग्रजी लेखकसुद्धा शेकडा पच्याहत्तर कथा अवकाशात घडलेल्या अशाच लिहितात; पण विज्ञानकथा म्हणजे केवळ अवकाशात घडणाऱ्या कथाच नव्हेत, हे ठमवण्यासाठी त्यानी ह्या कथा लिहिल्या.

यत्रमानव हा घाटयाच्या कथेत महत्त्वाचा वाटा उचलत असतो. कथेच्या बाधणीतलं ते एक महत्त्वाचं पात्र असतं. यंत्रमानव आणि माणस याच्या सबधातले अनेक बारकावे निरजन घाटे टिपतात 'यत्रमाणुसकी' या कथेत यत्रमानव जेवढया माणुसकीन वागतो, तेवढं माणूसही वागत नाही अशी कल्पना आहे, तर 'यत्रमूल' या कथेत यत्रमूल एका श्रीमत कुटुबात पाठवून कसं वाढवलं जातं, ते मोठ होऊन त्याच लग्न ठरत हे जरा अतिरंजित वाटणार पण कल्पनेचा भरपूर वापर करून सागितल आहे. 'यत्रमानवाचा स्वातत्र्यसग्राम' या कथेत यत्रमानवही आपल्या हक्कासाठी कस बड करून उठतात, पण त्याचा निर्माता शेवटी मानवच असल्यान तो त्याना कस चिरडून टाकतो आणि यत्रमानवाच्या विचार-स्वातत्र्याला नष्ट करतो याच मजेदार चित्रण आहे.

काही विज्ञान कादबऱ्या प्रकाशित होऊन बरेच दिवस झाले असले, तरी त्याचा इथं उल्लेख करण आवश्यक आहे अरुण साधू हे सुजाण विज्ञान लेखक. विज्ञानातली एखादी कल्पना आधाराला घेऊन मानवतेचा सदेश देणाऱ्या दोन दर्जेदार कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. पहिली 'स्फोट'. पृथ्वीबाहेरच्या सगीताचा माणसावर मृत्युपर्यवसायी परिणाम होतो या शोधाचा मदतीनं, जगाची लोकसख्या निम्म्यान काही क्षणात कमी करणाऱ्या एका शास्त्रज्ञाची ही कथा आहे. 'विप्लवा' या कादबरीत विश्वाला बसलेला पीळ ही कल्पना आहे. याच नावाच्या ग्रहावरची प्रगत माणसं त्यात दाखवली आहेत. युद्ध, अण्वस्त्रं हे प्रकार त्यानी केव्हाच मागे टाकले आहेत पृथ्वीवर येऊन ते वैश्विक सलोख्याचा सदेश देतात. 'देवांसि जीवे मारिले' ही चितामणी देशमुख आणि लक्ष्मण लोढे या दोघानी मिळून लिहिलेली आणि ग्रथालीनं प्रसिद्ध केलेली कादबरी. वाचस्पती हा एक भारतीय शास्त्रज्ञ. त्यांना एक दिवस गूढ सदेश मिळतो. परग्रहावरच यान झपाटयानं पृथ्वीकडे येत असल्याचा. ते सकट होत, की पृथ्वीवरच्या माणसाचं कल्याण याचा निर्णय करता येत नाही. जगातल्या दोन महासत्ता त्याचे अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात. जागतिक राजकारणात शेवटी ते यान आणि त्यातली दोन माणसं नष्ट होतात लेसर फ्यूजन बॉम्बनं ते यान नष्ट केल जातं आणि नतर कळत की पृथ्वीवरच्या मानवाच्या कल्याणासाठी परग्रहावरच्या अतिप्रगत संस्कृतीचे दोन प्रतिनिधी त्या यानातून पृथ्वीवर यायला निघाले होते !

### शुद्ध वैज्ञानिक माहिती

विज्ञान साहित्य लिहिण्यात स्त्री लेखिका विरळीच. त्यात शुभदा गोगटे याचा उल्लेख करावा लागेल. त्याचा 'मार्जिनल्स' हा कथा संग्रह शुभदा सारस्वतनं प्रकाशित केला आहे यात कल्याणी, मार्जिनल्स, जन्मजन्मातर आणि वासुदेवे नेला कृष्ण अशा चार कथा आहेत. जनन विज्ञानाच्या क्षेत्रातल्या नव्या घडामोडीचे पडसाद या कथामध्ये आहेत. त्यात मानवी आणि अमानवी पात्रे आहेत. मत्स्यमानवी मुलं आढळतात. नियत्रित सुषुप्तावस्था म्हणजे माणसाला अत्यत कमी तपमानात गाढ बेशुद्धावस्थेत निजवून ठेवलं तर त्याचं वय वाढल तरी शरीर टवटवीत राहतं या कल्पनेवर आधारित अशी त्याची कथा आहे- 'प्रवासी' ही नुकतीच एका दिवाळी अकात आलेली त्याची कथा चांगली आहे. यात परग्रहावरची काही विचित्र माणसं. अगावर मासल भाग नाहीच. फक्त रक्तवाहिन्यांचं जाळं आणि त्यातलं रक्त हिरव्या रंगाच अंगातल रक्त बदलल की काही दिवस बर वाटतं म्हणून ही विचित्र माणस चालत्या रेल्वेगाडयांच्या स्लीपर कोचमध्ये शिरून प्रवाशाच रक्त पायातून शोषून घेतात. झोपेतच त्यांचा मृत्यू होतो. गाडीत असे लोक मरायला लागल्यावर पोलीस खडबडून जागे होतात. या माणसांचा ते शोधही लावतात; पण त्यांना पकडू शकत नाहीत कारण पोलिसानी त्याना स्पर्श केला तरी त्या रक्तवाहिन्या

फुटून त्या द्रवात पोलिसांचही मरण ओढवेल ! 'यन्त्रायणी' ही लेखिकेची पहिली विज्ञान कादबरीही यापूर्वी प्रकाशित झाली आहे.

शुद्ध वैज्ञानिक माहिती देणारी काही नवीन पुस्तक आता बघू. कृतिका प्रकाशनचं प्रा. मोहन आपटे यानी लिहिलेल 'अण्वस्त्राचा मृत्युघोष' हे पुस्तक अण्वस्त्राची सर्वसंहारक शक्ती आणि सर्वंकष भयानकता स्पष्ट करत. अण्वस्त्राचे भयकर परिणाम आणि त्यापासून सरक्षण करण्याचे उपाय याविषयी पाश्चात्य देशामध्ये शेकडो ग्रथ आहेत, पण आपल्या देशात अजूनही या विषयाकडे गाभीर्यानं पाहिलं जात नाही, अस लेखकाला वाटतं. अण्वस्त्र हा पाश्चात्य राष्ट्रापुढचा ज्वलत प्रश्न असून युद्ध झालच तर जबरदस्त तडाखा याच राष्ट्राना बसणार आहे, हेही लेखक नमूद करतो. अण्वस्त्रसज्ज राष्ट्राच्या हद्दी एकमेकाना चिकटलेल्या आहेत जगातली सगळी मोठी शहरं अण्वस्त्राच्या टप्प्यात येतात. अशा वेळी आपल्याला बेसावध राहून चालणार नाही. प्रत्येकाला अण्वस्त्राची किमान माहिती असावी, हा या पुस्तकाचा उद्देश.

सर्व राष्ट्रामध्ये मिळून ४० ते ५० हजार अण्वस्त्र असावीत. TNT हे अण्वस्त्राची क्षमता ठरवण्याच प्रमाण आहे. त्यानुमार चार अब्ज माणसामागे १३ अब्ज टन TNT अण्वस्त्राच सामर्थ्य म्हणजे एका व्यक्तीमागे ३.२५ टन TNT अण्वस्त्रं आहेत, असा हिशेब लेखकान दिला आहे अत्यत उपयुक्त चौकटी आकृती, याच्या मदतीन अणुबाँब निर्मितीचं तत्र, हायड्रोजन बाँबच तत्त्व, न्यूट्रॉन बाँबची रचना ही प्रकरणं माहितीपूर्ण झाली आहेत. आण्विक ढगामध्ये किरणोत्सर्गी द्रव्य असतात आणि अशा ढगाची उची कमाल सात हजार फूट किंवा २३ हजार मीटर असते अशा माहितीमुळेही हे पुस्तक वाचनीय झाल आहे

प्रा. मोहन आपटे यानीच लिहिलेल 'अग्निनृत्य' हे कृतिका प्रकाशनच आणखी एक पुस्तक. विषय अणुबाँब. दुसऱ्या महायुद्धाच जगाच्या इतिहासात महत्त्व अशासाठी, की या महायुद्धानं जगाला अणुबाँबची देणगी दिली ! या अग्नेयास्त्राची कहाणी या पुस्तकात आहे. अगदी अणुबाँबच्या निर्मितीच्या आधीपासूनचा सगळा अणूचा इतिहास सांगितला आहे. त्या त्या शास्त्रज्ञाचा परिचय, त्याचं अणुविज्ञानातलं कार्य यातून अणुबाँबचा जन्म आकाराला येत जातो. अणुविज्ञानाच पितृत्व रुदरफोर्ड या वैज्ञानिकाकडे जात. मादाम क्युरीनं रेडियम या किरणोत्सर्गी मूलद्रव्याचा शोध लावला. नतर आइन्स्टाइन. हिरोशिमाचा विध्वस पाहून स्वत:ची निर्भत्सना करणारा शातताप्रेमी शास्त्रज्ञ; पण त्याचच '$E = mc^2$' हे प्रसिद्ध समीकरण म्हणजेच अणुबाँबच्या विस्फोटातून निर्माण होणारे प्रचड शक्तीच सूत्र ! लिओ त्झिलार्ड यानं अणुविच्छेदनावर महत्त्वाच संशोधन केलं. त्याच्या उल्लेखाशिवाय अणुविज्ञानाचा इतिहास अपुराच राहील. अणूमधली शक्ती बाहेर कशी खेचता येईल याचं त्यान सशोधन केल. अमेरिकेत आजही हे या सगळ्या शास्त्राबद्दल अत्यत गुप्तता पाळली जाते. सगळं काम गुप्ततेच्या भक्कम पोलादी पडद्याआड चालतं अणूच्या संशोधनापासून त्याच्या स्फोटापर्यंत ज्या ज्या व्यक्तीचा सबध आला, त्या सर्वांच्या परिचयामुळे जिवत इतिहास उभा राहतो.

## विज्ञान छांदसी

पृथ्वी प्रकाशनचं, वसत शिरवाडकर लिखित 'ऊर्जेच्या शोधात' ह्या पुस्तकात ऊर्जेचा महत्त्वाचा प्रश्न हाताळला आहे. आज प्रत्येक क्षेत्रात ऊर्जेची गरज आहे. त्यामुळे ऊर्जेच्या पारपारिक साधनाचा साठा सपुष्टात येत चाललाय. पण मनुष्यप्राणी प्रयत्नशील आहे त्याने अणू, सूर्य यापासून ऊर्जा मिळवण्याचे प्रयत्न केले आणि त्याला विज्ञानाचीही साथ आहे. वारा, समुद्र ही निसर्गाची मोफत शक्ती. समुद्राच्या लाटामध्ये प्रचड शक्ती असते या लाटामधून वीज निर्माण करण्याचा प्रयोग प्रथम फ्रान्समध्ये १९३५ साली झाला. या कामी भरती आणि ओहोटी या दोघाचाही फायदा होतो. त्यानतर रशियान निर्मिती केली. जगात ६.५ कोटी मे. वॉ. वीज निर्माण होऊ शकेल, इतकी क्षमता समुद्राच्या पाण्यात आहे. समुद्राच्या पाण्याच्या उष्णतेपासून, वाफेपासून वीज निर्माण करण्याच श्रेय जॉर्ज क्लॉड या फ्रेंच शास्त्रज्ञाकडे जात. ( १९२० )

अतराळात ऊर्जा कशी निर्माण होऊ शकते, याविषयी लेखक सांगतो की, ऊर्जा ही सूर्यापासून सूक्ष्म कणांच्याद्वारे पृथ्वीवर येते. त्यांना 'फोटोन' म्हणतात. त्याचे विद्युत शक्तीत रूपातर करण्यासाठी 'सिलिकॉन सेल' वापरण्यात येतात. त्यावर प्रकाश पडला की वीज तयार होते, अंतराळातच आणि मग ती वीज वाहक तारामधून पृथ्वीवर आणण्यात येते

विज्ञान हे पूर्णत: भौतिक उपपत्तीवर आधारित, तर तत्त्वज्ञान हे अध्यात्माशी निगडीत. या दोहोची सागड ही कल्पना विचित्र वाटते, नाही ? पण हा प्रयत्न केला आहे. प्रा. दत्तात्रय श्रीधर जोग यानी आपल्या 'विज्ञान व तत्त्वज्ञान' या पुस्तकात ( काळे प्रकाशन, पुणे. ) भारतीय तत्त्वज्ञानाची भूमिका माडून त्या भूमिकेला विज्ञानाच्या वेगवेगळ्या तर्कशुद्ध आणि प्रयोगसिद्ध सशोधनाने कसा आधार मिळतो ते उदाहरणांनी दाखवलंय.

विज्ञान छादसी ( प्रा. रघुकृष्ण शेटये ) आणि प्रकाशाची किमया ( डॉ. बाळ फोंडके ) या दोन छोट्या पुस्तिका. सोप्या पद्धतीनं विज्ञानाची उकल करून दाखवणाऱ्या झेरॉक्स, फिल्म, लेझर या प्रकाशनाच्या किमया डॉ बाळ फोडके यानी स्पष्ट केल्या आहेत. 'विज्ञान छादसी' मध्ये वैज्ञानिक तत्त्व सोप्या प्रयोगामध्ये बाधली आहेत. त्यामुळे ती जास्त रजक झाली आहेत. प्रयोग प्रत्यक्ष करून विज्ञान जाणून घेण्यात जी चित्तथरारकता आहे ती हे पुस्तक वाचून ( नुसत वाचून नाही तर प्रयोग करून ) अनुभवाला येते. पाण्यावर चालणारं घड्याळ, घड्याळात दर्शवलेल्या वेळेनुसार फुटणारा बॉम्ब, विद्युतप्रवाह नसताना उपयोगात येणारा दिवा, बर्गलर अलार्म इत्यादी तयार करायला सागताना, त्यामागचं शास्त्रीय तत्त्वही स्पष्ट केलय रक्तातल्या लाल पेशी मोजण, रक्ताचा गट ठरवण याचही सप्रयोग मार्गदर्शन केल आहे. विज्ञान हे आपल्या भिंती जवळ, अगदी आसपास वावरतय, साधी साधी उपकरणं वापरताना आपण विज्ञानच हाताळत असतो, फक्त आपल्याला ते माहीत नसतं, हे अशी छोटी पण उपयुक्त पुस्तकं वाचून कळतं. विज्ञानाचा छद जडवून घेणं त्यातून सहज शक्य होतं.

□

## पुस्तके

# मूर्तिभंजन

कुसुमाग्रजांची विशाखा, लक्ष्मीनारायण बोल्ली यांची 'मैफल', सुरेश भटांची गझलयुक्त कविता, सुधाकर गायधनी यांची 'कब्रीतला समाधिस्त' या वाचताना जे जे निरनिराळे भाव कवितातून दिसले तसेच भाव या काव्यसंग्रहात दिसले. अर्थात तुलना करता येणार नाही. कारण प्रत्येक कवी व त्याचे भावविश्व– त्यातून निर्माण झालेला आविष्कार निरनिराळे असतात– हे सांगायला नकोच. कवीला काव्य का लिहावेसे वाटते, लेखकाला लेख का लिहावेसे वाटतात, कथाकाराला कथा का लिहाव्याशा वाटतात, यावा विचार केला तर त्या त्या व्यक्तीच्या मागची प्रेरणा हीच कारणीभूत असते. या मूल्यांचा विचार केला तर प्रस्तुत कवीच्या काव्याचा मागोवा घेता येईल; परंतु संग्रहातील १२६ कवितांबद्दल संपूर्ण काव्यालोचन करणे म्हणजे त्यावर एक प्रबंधच होईल. स्थलकालचा विचार केला तर ते शक्य वाटत नाही; परंतु मला जे भावले ते त्रोटकपणे देण्याचा प्रयत्न करतो.

'मूर्तिभंजन' हे काव्यसंग्रहाला नाव देण्यात कवीच्या काही काव्यावरून दिसून येते. (पृ. ८५, ८६, ८७, १०७, ११३ ते ११७). येथे नमूद करावेसे वाटते की, कवितांना 'शीर्षके' नाहीत. म्हणून त्या त्या कवितेच्या संदर्भाकरिता पृष्ठ क्रमांक देणेच प्राप्त आहे.

एके ठिकाणी कवी स्वतःबद्दल सांगून जातो– पृ. ११७ वर–

'कवीचा अहंकार फार मोठा असेल नसेल, माझा अहंकार मात्र नक्कीच मोठा आहे. ज्या शस्त्रानी गरिबांची शतके कापली, त्या शस्त्राच्या– शास्त्रांच्या आरतीत मी येणार नाही.'

पृ. ११८ – 'ठेकेदार न म्हणात मला कवी, गाडोत उपेक्षेच्या खंदकात.
तुम्ही व्हावे जुने टाळ पुन्हा हाती घेऊन तिच्यात सामील.

मी केसांच्या गळचात गळा घालणार नाही, तलवारींना गळचात पडू देणार नाही.... राखेच्या ढिपळांची अशी प्रस्तावना असते म्हणतात.'

कवी छोटचाशा निवेदनात म्हणतो 'हे वेळोवेळीचे फुटणे-प्रस्फुटणे, कवीला जसे विचार, भावना स्फुरल्या त्याचं एकीकरण अगदी मोकळेपणाने केलेले दिसते. कधी कधी तो विमनस्क, तसेच सुखदुःख मिश्रित अशा जीवनातही तो गेला आहे, अशा मनःस्थितीत दिसतो आणि मग जन्म मरणाच्या फेऱ्यांचाही तो विचार प्रकट करतो. कविता कशी स्फुरली आणि ती स्फुरत असताना त्याला ज्या वेणा लागाचा त्याचे शब्दचित्र थोडक्यात सांगून जातो. पृ. २ वर लिहितो– 'जीव झाला रानभरी तेव्हा लिहिली कविता. शब्द शब्द उणा गेला ओल्या जखमा शिवता... मला लिहिते कविता, गातो जखमांचा थवा. ऐशि मैफिल ही माझी, माझ्यापुरता वणवा.'

(कवी कल्पनेतल्या) प्रेयसीला उद्देशून काही कविता कवीने लिहिल्या आहेत. तेथे आर्तता दिसते– विरहाची स्पंदने दिसतात.

'तू असतीस तर, तू नसतीस तर' या कल्पनांवर आधारीत अशा या कविता. निसर्ग, कवि आणि कवीची 'ती' याचीही सांगड काही कवितांतून दिसते. अर्थात येथे 'ती' म्हणजे प्रिय-पात्र असेलच असे नाही. 'ती' म्हणजे कशी ते ज्याने त्याने ठरवावे. काही कवितांतून निसर्ग आणि कवि यांची स्पंदने दिसतात– निराशेचे सूरही गवसतात. (पृ. ७२, ७३) एकूण स्वकेंद्रित कविता जास्त आहेत.

काही कवितांतून इंग्रजी शब्द वापरून (पान १२१– 'त्यांनी तरीही ऑक्सिजनवर ठेवली मनुरात्र') किंवा चलनी प्रतिके (पृ. ५२– थुंकलेल्या थुंकीभोवती नाचणाऱ्या जिभेला करावे नृत्य निवृत्त') (पान १२२ जानवी थुंकली मानवी उदयावर तू चेचलास सनातन कुंटीणखान्याचा कणा) वापरून नवकाव्याचा घाटही जोपासला आहे. 'क्रांती सावित्री' ही अकरा कडव्याची कविता (पृ. ११९ ते १२४) त्या दृष्टीने पहाण्यासारखी आहे समाजात दिसणारी विदीर्ण चित्रे, भोंदूगिरी, भ्रष्टाचार इ. कवीने रंगविलेली दिसतात आणि त्याबरोबर सामाजिक बदलाची– पर्यायाने क्रांतीची गरज आहे हेही तो सांगून जातो (पृ. १२५ ते १२७), अनंत फंदीच्या उपदेशपर फटक्यासारखी एक कविता दिसते (पृ. ८१ ते ८३) पण हा फटका सध्याच्या काळाला धरून वाटला. कवीने ओवीचा प्रकारही हाताळला आहे. (पृ. ८८–८९). बाकीचा काव्यप्रकार मुक्त छंदातला वाटतो. कै. वा. सि. मर्ढेकरांच्या काव्यातून दिसणारी सामाजिक कौटुंबिक विदीर्णता या कवीच्या काव्यातूनही दिसते (पृ. ८८–८९) निसर्गातील प्रतीके घेऊन त्याचा वापर वैयक्तिक जीवनातील दुःखांशी समन्वय करून त्याचे चित्र रेखाटण्याचा कवीने उत्तम प्रयत्न केला आहे. (पृ. ९०, १०८ ते ११२) कवीच्या संभ्रमावस्थेतील कविता म्हणून पृ. ९१– 'आता सांगावे तरी काय, ऐकावे तरी काय ' ही पाहावी.

कवितांना शीर्षके त्या त्या पानांवर नाहीत हे मी वर म्हटले; पण अनुक्रमणिकेत त्या त्या पानावरील कवितेची पहिली ओळ म्हणून दिली आहे, तेच शीर्षक समजायचे का ?

ज्यांना काव्यप्रांतात आवड आहे, त्यांना हा काव्यसंग्रह आवडेल असे वाटते; पण काव्याची पुस्तके घेऊन वाचणारे वाचक किती हाही प्रश्न आहेच.

**–वसंत फाटक**

मूर्तिभंजन
श्री. यशवंत मनोहर
श्री विद्या प्रकाशन
पृष्ठे : १२८, मूल्य : तीस रुपये

# चोमा महार

ज्ञानपीठ पारितोषिक विजेते श्री. शिवराम कारंथ याच्या 'चोमन दुडी' (चोमाची डवरी) या मूळ कन्नड कादंबरीचा हा मराठी अनुवाद. शिवराम कारंथ यांच्या बहुतेक कादबऱ्यांचं कथानक हे दक्षिण कर्ना

टकात घडत. त्याच भागातल्या महाराच चित्रण असलेली ही कादबरी. कर्नाटकात महार जातीमध्ये देखील मेर, बैर, अजिल, मारी, मुडाळ अशा अनेक पोटजाती आहेत. त्यातल्या त्यात मेर ही पोटजात बरी. कारण त्यांना शेती करण्याचा अधिकार आहे. पण मारी जात ही सर्वात हीन. त्याची सावली सुद्धा काहींना चालत नाही. त्याना शेती करण्याची मुभा नाही. उष्ट, खरकटं, मेलेली जनावर खाऊन ते गुजराण करतात. उत्तर कर्नाटकात तर त्याना मजुरीलाही बोलवत नाहीत. दक्षिणेत मात्र शेतकामाला बोलावतात त्याच मारी या पोटजातीतला चोमा हा एक महार.

चोमाच्या गुरासारख्या जीवनात थोडंसं चैतन्य निर्माण करणाऱ्या काही गोष्टी आहेत. एक त्याची डवरी-डुडी. एक प्रकारच वाद्य. त्याचा आकार धान्याच्या मापट्यासारखा असतो. त्याच्या एका बाजूवर चामड ताणून बसवलेल असत. रात्री-बेरात्री, जेव्हा मनाची उलघाल असह्य होते, तेव्हा चोमा जीव खाऊन आपली डवरी वाजवत बसतो. चोमा-जवळ दोन बैल आहेत. केव्हा तरी जमिनीचा तुकडा घेऊन शेती करायची हे त्याच स्वप्न. शेतकरी व्हायच ही त्याची सुप्त आकाक्षा. पण धन्याकडे जमीन मागायचं धैर्य नाही. बापजन्मी या महारानी शेती केली नाही, चोमानं केली, तर गाववाले जिवंत ठेवतील का त्याला ? त्याच्या देखण्या बैलाची जोडी हडप करायला गावातले कितो तरी लोक टपलेले आहेत. तरीही ते प्राणप्रिय बैल, शेतकरी व्हायच स्वप्न आणि डवरी याना उराशी कवटाळून तो ढोरासारखा राबत दिवस ढकलतोय, जोडीला त्याचा संसार आहे. बायको मेली काही वर्षांपूर्वीच. काळू, निळू, चनिया, गुरुवा ही चार मुल आणि शुक्राच्या चांदणीसारखी तेज पुज बेळ्ळी ही मुलगी, इतका संसार त्याच्या पदरात आहे.

ही कादंबरी महार जातीचा सामाजिक पट अतिशय प्रभावीपणे आपल्यासमोर उल-गडते. त्यातून त्याच्या अनेक समस्या कळून येतात. हरिजनानी धर्म बदलला तर गदा-रोळ उठतो; पण त्यांचा वर्तमान धर्म आणि समाज त्याना कोणतेच अधिकार देत नाही. हे कोणीच लक्षात घेत नाही. चातुर्वर्ण्याचं पालन त्याना काटेकोरपणे करावं लागतं. या महारांच्या जगण्याचं अविभाज्य अंग म्हणजे वेठबिगारी. ट्रक्स भरभरून हे महार मजूर कॉफीच्या मळ्यामध्ये घाम गाळून कष्ट करतात. दिवसभर राबून त्यांना काय मिळत ? तर फक्त पावभर तांदूळ, सगळ कुटुंब धन्याच्या घरी राबत. या वेठबिगा-रीला जोडून येत कर्ज. कधी तरी चोमानं कॉफीच्या मळ्यावर काम करताना उचल घेतली असेल. वीस रुपये फक्त. नतर त्याची बायको वारली आणि तो मजुरी सोडून गावात आला. पण त्याचा धनी संकपय्या हे विसरला नव्हता. त्यानं आपला माणूस-मन्वेल पाठवला. कॉफीच्या मळ्यात जाऊन कर्ज फिटेपर्यंत वेठबिगारी करायची हाच उपाय होता. निरक्षर अडाणी महार बिचारे रावराब राबायचे; पण कर्ज कधी फिटायचच नाही. हिशोब कोणाला विचारणार ? चोमान चनिया आणि गुरुवा या दोन मुलाना मन्वेलबरोबर पाठवलं.

## न संपणारी वेदना

दारू आणि नशापाणी हा या गरिबाच्या जीवनाला आणखी एक शाप. त्यापायी उधारी अन् कर्जाचं शेपूट लाबतच रहायचं. मळ्यावर गुरुवाचं मारी नावाच्या मुलीवर प्रेम बसलं अन् तो तिच्याबरोबर पळून गेला. तो ख्रिश्चन झाला होता.

चनिया परतला तो ताप घेऊनच. चार दिवसाच्या तापानतर तरणाताठा चनिया मेला. चोमावर दुःखाच पहाड कोसळला. तो त्या दिवशी दुप्पट दारू प्यायला अन् त्यानं वेड्यासारखी डबरी बडवली

त्या वीस रुपयातली एक कवडीही फिटली नव्हती. दोघानी दारूपायी कर्ज जेवढच्या तेवढच ठेवलेलं. आता दोनच पर्याय होते. बैल विकायचे नाहीतर बेळ्ळीनं मळ्यावर जायच. शेवटी बेळ्ळी मळ्यावर गेली. सोबत निळू होता.

गरिबी आणि लाचारी असली तरी तरुण शरीर जे हव ते मागतच. मन्वेलन तिला तिथं सर्व दिलं. बेळ्ळी अधिकच रसरशीत दिसू लागली. कर्ज फेडून ती गावी परतली. चोमा आता तिच्या लग्नाची स्वप्नं रंगवू लागला. एकदा गुरुवाला भेटावं असं त्याला फार वाटत होतं. गुरुवाच्या गावी जायला तो सकाळी लवकरच निघाला. इकडे गावात मन्वेल आला होता. बेळ्ळी एकटी पाहून पुन्हा त्यानं संधी साधली. चोमा वेशीपर्यंत गेला असेल, बेतोबानं कौल दिला नाही म्हणून तो परत फिरला. आपली जात सोडून आपण ख्रिश्चन व्हायचा विचार केला याचा त्याला फार पश्चाताप झाला. विचारांच्या तद्रीतच तो झोपडीत परतला, तो त्याला नको ते दिसलं. चोमा एवढ्यात परत येईल ही दोघानाही कल्पना नव्हती.

चोमाचं माथं बिथरलं. त्याच्या स्वप्ना-च्याच जणू ठिकऱ्या झाल्या होत्या. बेळ्ळी ही त्याचं सर्वात मोठ विश्वासाचं स्थान. ती असं करेल हे त्याला कल्पनेतही वाटलं नव्हतं. आयुष्यभर उराशी जपलेलं स्वप्न – शेतकरी होण्याचं– त्यान आपल्याच हातांनी मोडलं. नांगर तोडून टाकला. बैल देऊन टाकले व पोराना घराबाहेर काढून तो झोपडीत जाऊन जिवाच्या आकांतान डबरी वाजवू लागला. तोडावाटे ब्र काढायची बेळ्ळीची अन् पोरांची हिंम्मत नव्हती. रात्री केव्हा-तरी डबरी आवाज शांत झाला. त्याचवेळी चोमाचे प्राणही देहातून निघून गेले होते !

कादंबरी तशी लहानच; पण कधीही न संपणाऱ्या वेदना आणि समस्या बाळगत काळाची वाटचाल करणारी एक जीवनपद्धती, या कादंबरीत प्रचड विस्तार पण विलक्षण सक्षेप घेऊन दडून बसली आहे. जात, कर्ज, वेठबिगारी, धर्मांतर, दारू, मजुरी यानी या जीवनपद्धतीला जखडून ठेवलं आहे. जो हे पाश तोडू बघतो, त्याचा अत असाच होतो– चोमासारखा.

चोमाबद्दल तर आपल्याला सहानुभूती वाटतेच; पण त्याहीपेक्षा जास्त बेळ्ळीबद्दल. ती सुंदर आहे. यात वाद नाही; पण परि-स्थितीनं किती समजस बनवलं आहे तिला. ती समंजस आहे म्हणूनच फक्त खस्ताच खाते आहे. बाप लहरी गेला कामाला तर ठीक, नाही तर नाही ! ती हसतमुखानं सगळं करते. मालकाच्या वाड्यावर राबते. जे काही तांदूळ मिळतील त्यातून सगळ्यांची पोटं भरते. आला गेला म्हणून थोडेसे बाजू-लाही काढून ठेवते. भावडावर कमालीची माया करते, बापाचं दारूशिवाय होणार नाही म्हणून त्याला दारूला पैसे देते. आईच्या पश्चात घर सुरेख सांभाळते पोक्त बाईसारखी. चोमा जेव्हा जेव्हा अविचार करतो, तेव्हा तेव्हा त्याला तीच सावरते. समजूतदारपणा दाखवते. ख्रिश्चन व्हायचा

प्रश्न समोर येतो तेव्हा मात्र विचाराती तयार होते, कारण जातीचं बंधनं फार जाचक व्हायला लागतात. मन्वेल असाच किरिस्ताव. त्याच्यापासून तिन सुख घेतलं हाच तिचा अपराध. ही व्यक्तिरेखा कारंथानी फार समर्थपणे रंगवली आहे.

दलित जीवनावरची एक संयमित आणि वास्तव चित्रण असलेली कादंबरी मराठीत उपलब्ध करून दिल्याबद्दल श्यामलता काकडे याना धन्यवाद द्यायला हवेत. त्यांनी सवादां- वर मराठी ग्रामीण भाषेचा साज चढवला आहे.

—आशा कर्दळे

चोमा महार
शिवराम कारथ
अनुवाद : श्यामला काकडे
कॉंटिनेन्टल प्रकाशन
पृष्ठे : ११७, किंमत : पंधरा रुपये

# ' हॉलिवुड 'ची राजहंसी - ग्रेटा गार्बो

रघुपती भट्ट

गर्दीपासून दूर अशा ठिकाणी ती आता राहते. आता वयाने ऐंशी ओलांडली आहे, पण अजून ती लोकाच्या स्मृतीतून गेलेली नाही. अनेक वर्षांपूर्वी तिने चित्रपट-संन्यास घेतला. पण सिनेमा जगानं तिच वलय अजूनही जपलय. अजून सौंदर्याची तुलना तिच्याशी होतेच. ऐंशी वर्षे झालेल्या या सौंदर्यवतीचं दर्शन मिळावं, तिची एखादी मुलाखत मिळावी, म्हणून अजून हौशी पत्रकार, लेखक धडपडत असतात ती कोणाला भेटत नाही. पूर्वीसुद्धा ती भेटत नव्हतीच· तिच्या उमेदीच्या काळात तिच्या-भोवती जे गूढतेचे वलय होते, ते आजही कायम आहे. एक प्रसिद्ध लेखक तिच्याबद्दल बोलताना म्हणाला, 'ती दरवर्षी अधिक सुदर होत जाते.' 'माय फेअर लेडी' चा डिझायनर, सेसिल बटिन याच्या मते 'ऐशी नार होणे नाही.' जगातील बहुसख्य नियत-कालिकानी तिच्याबद्दल लिहिले आहे आणि अजूनही कोणी लिहिले तर त्यावर वाच-काच्या उड्या पडतातच.

आणि विशेष म्हणजे सिनेमा—जगातील 'शुभ्र वस्त्राकित देवता' असं वर्णन जिचं केल जात तिच्याबद्दल फारशी माहिती कोणाला नव्हतीच. गॉसीपवालेसुद्धा तिच्या-बद्दल लिहू धजत नसत. तिच्याबरोबर ज्यानी काम केल, त्या निर्माते, दिग्दर्शक आणि नटमडळीनासुद्धा तिच्याभोवतीचा गूढतेचा पडदा उघडण्यात यश आलं नाही.

चार्ली चॅपलिन एवढा मोठा माणूस ! त्याला हॉलिवुडची बित्तबातमी असायची. त्याला माहिती नाही अस हॉलिवूडमध्ये काही घडलच नाही. पण त्यानसुद्धा त्याच्या आत्मचरित्रामध्ये या शुभ्र वस्त्राकित गूढ देवतेबद्दल अवाक्षर लिहिलेल नाही एका जमान्यातले दोन महान कलाकार पण चॅपलिन उल्लेख करीत नाही यातच या महान कलावतीची रहस्यमयता पटते.

अशी कोण ही शुभ्र वस्त्रान्विता ? तिची माहिती घेण्यासाठी खूप मागे जायला हवं अगदी मूक चित्रपटाच्या जमान्यात

एक स्विडिश मुलगी. उच, देखणी आणि सुबक बांध्याची. गुस्तफॅसन् असं नाव अस-लेली. आपल्या आईबरोबर ती स्वीडनमधील एका शहरात कामगार वस्तीत राहायची. दिवसभर खूप राबायची आणि सध्याकाळी एखाद्या थिएटरवर अभिनयाचे धडे घ्यायला जायची. दिवसभर तिला खूप काम करा-यला लागायच कधी न्हाव्याच्या दुकानात, कधी फळविक्रेत्याकडे, कधी कारकुनी, पण ती कधी थकायची नाही. सध्याकाळी न चुकता नाटचाचे धडे. अगदी तिचा बाप वारला त्या शोककाळातही तिन ते चुकवले नाहीत.

तिच्या बरोबरीच्या मुली, तारुण्याच्या एका वेगळ्या जगात नादत होत्या; पण तिला मात्र कशातच रस नव्हता. 'मी कधी लग्नच करणार नाही—' ती म्हणायची. तिला नाटक—सिनेमात नाव मिळवायचं होतं, आपल ग्रेटा गुस्तफॅसन हे नाव जगात गाजवायच होत तिला.

कार्ल ब्रिसॉन नावाच्या एका प्रख्यात स्विडिश नटाने प्रथम ग्रेटामध्ये काही ग्रेटनेस आहे हे ओळखल. ती उच आहे, सडपातळ आहे; पण तिच्या चेहऱ्यातून तेज ओसडते असं तो म्हणाला.

तिची खरी सुरुवात झाली ती मॉडेल म्हणून. छोटया छोटया जाहिरातीमधून ती झळकू लागली. तिला त्यातून थोडी मिळकत होऊ लागल्यावर ती स्टॉकहोमच्या थिएटरवर नाटचशास्त्र शिकायला जाऊ लागली. त्या ठिकाणी बड्याबड्याची मुलं शिकायला यायची. त्याच्या तुलनेत ग्रेटा गबाळी, बेंधळी वाटायची. तिचे उच्चार, वागण्याची पद्धत खेडवळ वाटायची. काही वेळा तिला ते सोडून द्यावस वाटायचं; पण आपल नाव गाजवायचा तिचा निर्धार तिला शक्ती द्यायचा, स्फूर्ती द्यायचा. ती शिकत राहिली

प्रथम प्रथम नाटचक्षेत्रातील लोकाना ग्रेटात काही विशेष जाणवलं नाही. तिला फार तर एखादी चरित्र भूमिका देता येईल एवढेच त्याना वाटले. पण स्टॉकहोम स्टेट थियेटरन मात्र तिला कायम स्वरूपात कामा-वर घेतले. तस पाहिल तर ग्रेटाला आता स्थैर्य मिळालं होत, पण ती तेवढ्यावर सतुष्ट नव्हती.

अचानक एके दिवशी तिला एका चित्र-पटाची ऑफर आली. तिच्या कपनीमार्फत स्टीलर नावाच्या एका दिग्दर्शकाला नव्या चेहऱ्याची आवश्यकता होती. 'द स्टोरी आफ गोस्टा बर्लिग' नावाचा चित्रपट होता. भूमिका एका सरदार स्त्रीची होती.

### स्टार—ग्रेटा

स्टीलरन ग्रेटाला पाहिल. तो मोजक बोलणारा मनुष्य होता त्याच्या समोरची मुलगी झोपडपट्टीतून आली होती. तिचे उच्चार तिकडचे होते तिची आई झाडूकाम करणारी होती आणि या मुलीला उच्चभ्रू स्त्रीची भूमिका करायची होती तो मनोमनी

हसला एक आव्हान म्हणून ग्रेटाला घडवायचे त्याने ठरवले.

'स्टीलर' ने ग्रेटाची कसून तालीम घेतली. त्याने तिला अदा शिकवल्या, चालण्याची पद्धत शिकवली. एक वेगळीच ग्रेटा त्याने जन्माला घातली. तिने स्वतःचे नाव ग्रेटा गुस्तॅफसन बदलले होते. आता ती स्टार झाली होती.

'ग्रेटा गार्बो !'

'गार्बो' म्हणजे इटालियन भाषेत 'कमनीय आकृती'

चित्रपट पूर्ण झाला. चित्रपटाच्या जाहिरातीसाठी स्टीलरने गार्बोला आपल्याबरोबर नेले. जर्मनीमध्ये लोक गार्बोच्या व्यक्तीमत्त्वाने प्रभावित झाले. स्टीलरच्या मनात गार्बोच्या नव्या चित्रपटाची कल्पना घोळू लागली होती. जाहिराती तयार होत्या.

नवे आकर्षण 'ग्रेटा गार्बो !'

'द जॉयलेस स्ट्रीट' नावाच्या चित्रपटात युद्धोत्तर बर्लिनमधील वेश्याव्यवसायाची कहाणी सांगितली होती. त्याच्या पॅब्स्ट नावाच्या दिग्दर्शकाने गार्बोची त्यासाठी निवड केली होती. यात गार्बोचं जमेना. काही संवादांच्या म्हणजे प्रसंगांच्या वेळी तिचे ओठ थरथरू लागले. मग दिग्दर्शकाने कॅमेरा जवळ आणण्याच्या प्रसंगात मार्लिन डिएट्रिच नावाची एक एक्स्ट्रा नटी वापरली. (पुढे मार्लिनही गाजली; पण त्यावेळी मात्र ती एक्स्ट्राच होती. आपल्याला योग्य चेहरा नाही त्यामुळे आपण एक्स्ट्राच राहू अशी तिची बिचारीची त्यावेळी खात्री होती.)

त्यानंतर हॉलीवूडची ऑफर आली. प्रख्यात मेयरकडून ती आली होती. खरं म्हणजे त्याला फक्त स्टीलर पाहिजे होता. पण स्टीलरने गार्बोचा हट्ट धरला.

त्यावेळचं हॉलीवूड तेवढं पुढारलेलं नव्हतं. गार्बोला ते काही बरं वाटलं नाही. हॉलीवूडमध्ये 'द टॉरेन्ट' नावाच्या चित्रपटाची तिला ऑफर आली. पण त्याचा दिग्दर्शक त्यांनी कोणी दुसरा निवडला होता. गार्बोला फक्त स्टीलरच पाहिजे होता. तिने स्पष्ट शब्दात सुनावलं—'स्टीलर नसेल तर मीपण नाही.' शेवटी स्वतः स्टीलरनेच तिची समजूत घातली, तेव्हा कोठे ती तयार झाली.

'द टॉरेन्ट' पडद्यावर झळकला आणि 'ग्रेटा गार्बो' हे नाव सर्वतोमुखी झालं. तिच्या व्यक्तिमत्त्वात सर्वांना काही वेगळे जाणवले. तिचा चेहरा, चाल, पद्धती सगळ्यामध्ये फक्त 'गार्बो'त्व होते. ज्याच्याशी तुलनाच करता येण्यासारखी नव्हती. अगदी कठोर समीक्षकांनीसुद्धा गार्बोच्या निवडीबद्दल मेयरचे अभिनंदन केलं.

त्यानंतर ताबडतोब 'द टेम्प्ट्रेस्' या दुसऱ्या चित्रपटासाठी तिला करारबद्ध करण्यात आलं. तिच्या विनंतीला मान देऊन स्टीलरला त्याचा दिग्दर्शक करण्यात आलं. गार्बोचा शब्द आता मोडता येण्यासारखा नव्हताच मुळी.

पण आता स्टीलरचं जमेना. त्याची काम करण्याची पद्धती संथ होती. त्यामुळे पुन्हा दिग्दर्शक बदलला. नव्या दिग्दर्शकाचं तंत्र वेगळं असल्यानं चित्रपटाचं भदं झालं; पण 'द टेम्प्ट्रेस्' जोरदार चालला. गार्बोचा चाहतावर्ग गार्बो पाहण्यासाठी चित्रपट पाहायचा मग त्यांना बाकी काही नसलं तरी चालायचे.



गूढ सौंदर्यवती – ग्रेटा

मेट्रो कंपनी खूष झाली. 'गार्बो' ही आता क्रेझ आहे, हे त्यांनी जोखलं होतं. गार्बो म्हणजे सगळ्या जगाचा कौतुकाचा विषय झाली होती. एक काही तरी गूढ, अनाकलनीय आकर्षण ग्रेटा गार्बो ह्या स्विडिश पोरीकडे होतं आणि तेही अवघ्या तीन चित्रपटात या पोरीनं मिळवलं होतं. सिनेमा – नियतकालिकांना दुसरा विषय नव्हता.

गार्बोच्या ते लक्षात आलं होतं.

## गूढ वलय

मेट्रोनं आता एक महान चित्रपट काढायच ठरवलं. सगळ्यात चांगला दिग्दर्शक, चांगला नायक वगैरे घेऊन साठ लाख खर्च करून 'फ्लेश अँड द डेव्हिल' नावाचा चित्रपट नक्की झाला. गार्बोच्या पहिल्या चित्रपटाची नायिका आता यात साहाय्यक भूमिकेत असणार होती. नायिका अर्थात ग्रेटा गार्बो.

पण गार्बोनं चक्क नकार दिला.

कमीत कमी, आठवड्याला पाच हजार डॉलर्स एवढी तिची मागणी होती. आपलं वजन तिच्या लक्षात आलं होतं.

मेयरनं लाख प्रयत्न केले पण गार्बो बधली नाही. आपल्या पहिल्या दोन चित्रपटांनी कंपनीला किती उत्पन्न दिलंय याचे आकडे तिच्याकडे होतेच. मग मेयरनं धमकी दिली. ती ऐकत नसेल तर तिला स्विडनला परत जावं लागेल. पण गार्बोनं त्याकडे दुर्लक्ष केलं.

मेयर संतप्त झाला होता. काम खोळंबून राहिले होते.

पण शेवटी गार्बोचाच विजय झाला. तिला आठवड्याला २५०० डॉलर्स देण्याचा करार झाला.

या चित्रपटाची कथा चांगली होती. दोन ऑस्ट्रियन ऑफिसर एका विवाहित स्त्रीच्या प्रेमात पडतात. त्याचे दिग्दर्शन आणि फोटोग्राफीही चांगली होती. गार्बोला त्यात सहजता आली. या चित्रपटाचा नायक जॉन गिल्बर्ट चित्रिकरणाच्या वेळी तिच्या प्रेमात पडला आणि त्याने तिला विवाहाची मागणी घातली. पण गार्बोने त्याच्या प्रेमाला प्रतिसाद दिला नाही. त्या बातमीमुळे चित्रपटाची बरीच जाहिरात झाली. अमेरिकेत तो एक चर्चेचा विषय झाला. गार्बोची मोहिनी जनमानसावर प्रचंड प्रमाणात होती. एक अलिप्त गूढ सौंदर्यवती अशी तिची प्रतिमा आता तयार झाली होती.

त्यानंतर गिल्बर्टबरोबरच 'लव्ह', 'द डिव्हाइन वुमन' आणि 'अ वुमन ऑफ अफेअर्स' नावाचे तीन चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटानी अमेरिकेला अक्षरशः वेड लावले. गार्बो ही स्त्रीत्वाची नवी संकल्पना तयार झाली. स्वतः गिल्बर्टही गार्बोसाठी पागल होता.

पण गार्बोने त्याच्या किंवा इतर झुरणाऱ्याना प्रतिसाद दिला नाही. ती सगळयानाच अनाकलनीय, गूढ वाटत राहिली. तिची अलिप्तता हा तिच्या सौदर्यातील एक महत्त्वाचा हिस्सा राहिला. आपली प्रतिमा, वजन आणि जनमानसातील क्रेझ ती ओळखून होती. त्याला तडा जाईल असं तिनं कधीही वर्तन केल नाही.

एका नियतकालिकाने सर्व्हे घेतला, तेव्हा त्यांना बहुसंख्य अमेरिकन्स गार्बोफॅन्स आहेत, आदर्श स्त्रीची अमेरिकन कल्पना ग्रेटा गार्बो ह्या स्विडीश मुलीशी ठामपणे जोडलेली आहे असं दिसून आल.

गार्बोच्या सिनेजीवनातील पहिला कालखड येथे सपतो.

## पहिला बोलपट

दुसरा कालखड 'अँना ख्रिस्ती' या चित्रपटाने सुरू होतो. गार्बोच्या मतानुसार याचे दिग्दर्शक, फोटोग्राफर निवडण्यात आले होते. नायक म्हणून गार्बोन चार्लस् बिकफोर्डची निवड केली. यात गार्बोला अभिनयाला वाव मिळावा, म्हणून तिचे संवाद कमीतकमी ठेवण्यात आले होते. हा तिचा पहिला बोलपट होता, आणि त्यात तिच्या वाटेला अगदी वेगळी भूमिका आली होती. मेट्रो कपनीला धोका पत्करायचा नाही. त्यानी अँना ख्रिस्तीची जर्मन आवृत्ती काढून तो बर्लिनमध्ये प्रदर्शित करण्याचे ठरवले. अमेरिकेत तो थोडासा उशिरा प्रदर्शित झाला. मूकपटातले अनेक अभिनेते, अभिनेत्या बोलपटात काम करायला गेले तेव्हा त्यांचा बोऱ्या वाजला होता. गार्बो म्हणजे अमेरिकेच्या हृदयाची धडकन होती. मेट्रो कपनीच्या दृष्टीने सोन्याचे अडे देणारी कोंबडी होती तिच्या बाबतीत तस होऊ नये म्हणून हॉलीवूड अतिशय काळजीपूर्वक वागत होते.

'अँना ख्रिस्ती' प्रदर्शित झाला गार्बो बोलते अशी खास जाहिरात केली होती. गार्बोचे फॅन्स खूष झाले होते. अगदी पहिल्या दिवसापासून 'अँना ख्रिस्ती'ला डोक्यावर घेतले. तात्रिक बाजू सगळ्या उत्कृष्ट जमल्या होत्या. कलाकारानी मन लावून काम केलं होत. गार्बो नसती तरी चित्रपट गाजलाच असता. पण गार्बोनं त्यात काम केल्यामुळे, ती अक्षरशः बोलल्याने त्या चित्रपटाची श्रेष्ठता वादातीत झाली होती.

'अँनी ख्रिस्तीच्या' प्रचड यशाने गार्बोने बोलपटाच्या जीवनात पाऊल टाकले. मूकपटाची साम्राज्ञी, बोलपटात सुद्धा त्याच सर्वोच्च पदावर राहाणार हे सिद्ध झाले. हॉलीवूड खुष झाले. एम. जी. एम. ने सुस्कारा टाकला. लगेच 'रोमान्स' आणि 'इन्स्पिरेशन' या दोन चित्रपटाची निर्मिती सुरू झाली. गार्बोच्या लोकप्रियतेचे दुसरे धमाल युग सुरू झाले.

त्यानतर आलेला 'सुसान लेनॉक्स' ही गार्बोचा एक महत्त्वाचा चित्रपट मानला जातो. यामध्ये मर्दानी सौदर्याचा आदर्श मानला गेलेला क्लार्क गेबल हा नायक होता. एम. जी. एम. च्या अनेक सौंदर्य तारकाना त्याने अवखळपणा दाखवला होता. पण गार्बोशी वागताना तो फार जपून वागला गार्बोबद्दल एक भययुक्त आदर त्याच्या मनात होता.

त्याच्यानतरच्या 'ग्रँड हॉटेल'मध्ये गार्बोने बॅले नर्तिकेची भूमिका केली ती अप्रतिम वठली, असा समीक्षकानी एकमुखाने कौल दिला. यात तिचा नायक होता, प्रख्यात अभिनेता जॉन बॅरीमूर । बॅरीमूरशी तिचे छान सूत जमले पहिल्या दिवशी बॅरीमूरने तिच्या हाताचे चुबन घेतले, आणि तो म्हणाला, 'माझ्या बायकोच्या आणि माझ्या मते तुम्ही जगातील सर्वात सुदर स्त्री आहात.' या वाक्यानेच त्याने गार्बोचे मन जिंकले. एके दिवशी सर्वांसमक्ष गार्बोने त्याचे चुबन घेतले आणि ती म्हणाली, 'तुमच्यासारख्या परिपक्व कलाकाराबरोबर काम करण्यात किती आनद वाटतो म्हणून सागू.' गार्बोने मन उघड करण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे प्रत्येक जण अवाक होऊन पाहात होता.

'ग्रँड हॉटेल' मध्ये चागल्या बाबी खूप होत्या; पण तो केवळ गार्बोचा चित्रपट मानला जातो आणि म्हणून या चित्रपटाचे पुनर्निर्माण करण्यात आलेले नाही. गाजलेले चित्रपट दुसऱ्या नटाना घेऊन पुन्हा काढण्याची हॉलीवुडची पद्धत आहे, पण 'ग्रँड हॉटेल' पुन्हा निघाला नाही.

कारण ग्रेटा गार्बोची जागा ती निघून गेल्यावर रिकामीच राहिलेली नाही. ती बॅलेरिना उभी करण्याची ताकद फक्त गार्बोचीच, अस हॉलीवुडचं ठाम मत आहे.

त्यानतर गार्बोने दोन बरे चित्रपट पूर्ण केले. त्याना चागले हा शेरा मिळाला नाही. 'माताहारी' आणि 'अॅज यू डिझायर मी' हे ते दोन चित्रपट. पण गार्बोच्या चाहत्यानी याही चित्रपटाना गर्दी केली. प्रत्येक चित्रपटातून गार्बोचे जे विहगम दर्शन घडायचे त्यासाठी अमेरिकन पब्लिक मॅड असायच. अर्थात ब्रिजिट बार्दोबद्दल प्रेक्षकाना जे आकर्षण वाटते त्यापेक्षा हे आकर्षण वेगळे होते.

## काही सर्वोत्तम भूमिका

'क्विन ख्रिस्तीना' नावाच्या चित्रपटात गार्बोची भूमिका एका विक्षिप्त स्त्रीची होती. याची गणना 'क्लासिक्स' मध्ये होते. मेरी डूसेलरन या भूमिकेसाठी गार्बोची शिफारस केली.

पुरुषाचे कपडे घालणाऱ्या, डेस्कार्टिस वाचणाऱ्या सतराव्या शतकातील एका 'रानी मा'ची ही भूमिका होती. गार्बोन याचा खूप अभ्यास केला. खरी ख्रिस्तीना साकार करता यावी, यासाठी ग्रंथालयातील पुस्तके चाळून तिनं या व्यक्तिरेखेचा शोध घेतला तिने स्वीडनला एक भेट दिली आणि नामवत इतिहासतज्ज्ञाशी चर्चा केली. आणि तिला समजलं की खऱ्या ख्रिस्तीनाच नाक थोडसं अपरं होत तिने परत येऊन मेयरला गळ घातली की, खऱ्या ख्रिस्तीनासारख दिसण्यासाठी ती आपल्या नाकात थोडासा बदल करून घेईल तोपर्यंत तिला वेळ मिळावा.

मेयर हादरला. भूमिका जगणारे कलावत त्याने पाहिले होते पण भूमिकेसाठी स्वत चा सुदर चेहरा बिघडून घेणे त्याला प्रथमच ऐकायला मिळत होते. त्याने गार्बोची समजूत घातली. प्रेक्षकाना प्रेमकथा पाहिजे आहे. इतिहास नको. त्याच गार्बोवर पित्यासारख प्रेम होते ती आपली मुलगी म्हणून त्यान तिची समजूत घातली आणि तस काही न

होता चित्रपट तयार झाला.

हा गार्बोचा अप्रतिम चित्रपट मानतात. 'क्विन ख्रिस्तीना' मध्ये सेक्स आहे पण तो उघडाबोडका नाही. सफाईदारपणे तो पेश केला आहे गार्बोचे काही सीन्स दिग्दर्शकानी मोठ्या कौशल्याने टिपले आहेत. त्यामुळे त्यातून अशी एक ख्रिस्तीना साकार झाली की तिने रसिकांच्या मनाची ताबडतोब पकड घेतली.

गार्बो म्हणजे कला, गार्बो म्हणजे सौंदर्य या सकल्पना एम. जी. एम. च्या डोक्यात एवढ्या बसल्या होत्या की गार्बोचे चित्रपटाना कथा आहे का, इतर कलाकार चागले आहेत का याचा विचार करणेच त्यानी नतर नतर सोडून दिले होते.

सॉमरसेट मॉमच्या 'पेन्टेड व्हेल' या कादबरीवर आधारीत अशा एका चित्रपटात तिने काम केले आहे. या चित्रपटात तिने एका विवाहितेचे काम केले होते. हा चित्रपट तेवढा काही खास नव्हता.

त्यानतर 'अॅना कॅरेनिना' यासाठी मेट्रोन मोजकी माणस निवडली होती. डेव्हिड सेल्झनिक निर्माता होता. यात गार्बो अतिशय सुदर दिसली तिन कामही अगदी मन.-पूर्वक केलं या चित्रपटात गार्बोचे काही नितातसुदर शॉटस् आहेत

अनेक निर्मात्याना मोहिनी घालत असलेला 'कॅमिली' हा चित्रपट गार्बोनं त्यानतर पूर्ण केला 'बर्नहार्डट्' या प्रसिद्ध नटीनं प्रथम सादर केलेली ही कथा त्यानतर ३–४ वेळा वेगवेगळ्या नटीनी सादर केली. गार्बोला मिळालेला नायक तेवढ्या तयारीचा नव्हता. त्यामुळे गार्बोने हा चित्रपट कच्चा खाऊन टाकला यामध्ये इतरही काही चागले गुण होते. इतर काही चागले अभिनेते होते, त्यामुळे इतर नटयानी सादर केलेली 'कॅमिली' आणि 'गार्बो' ची कॅमिली यात तुलनाच होऊ शकत नाही. ड्युमाची ही प्रसिद्ध कथा एम. जी. एम. ला चागलाच पैसा मिळवून देऊन गेली.

या चित्रपटाने सोन्यासारखे पैसे कसे दिले याच्या अनेक मनोरजक हकिकती आहेत.

आफ्रिकेतील एका खेड्यात जेव्हा हा चित्रपट दाखवला गेला, तेव्हा ते अशिक्षित निग्रो ग्रेटा गार्बोच्या सौंदर्याने एवढे प्रभावित झाले होते की, सपूर्ण चित्रपट होईतो पुतळ्यासारखे स्तब्ध बसले होते. सिनेमा सुटल्यावर सगळ्यानी मिळून 'गोऱ्या सौंदर्य देवते'च्या सन्मानार्थ एक जंगली नृत्य केले. 'कॅमिली'ने युरोप, अमेरिका, आशिया, आस्ट्रेलिया आणि आफ्रिका खंडांवर मोहिनी घातली आणि एम्. जी. एम्. ला प्रचड पैसा मिळवून दिला.

## कारकिर्दीची अखेर

एवढा चांगला चित्रपट दिल्यावर गार्बोने 'कॉन्क्वेस्ट' नावाचा एक वाईट चित्रपट दिला. यात ती मेरी वालेवास्का झाली होती. चार्लस् बॉए नेपोलियन झाला होता. चार्लस् बॉयाचे काम चागलेच झाले. एम्. जी. एम्. चे निर्माण आणि दिग्दर्शक सुरेख होते, पण हा गार्बोपट नव्हता—नेपोलियन पट होता.

त्यानतर 'निनोत्यका' नावाचा सुदर चित्रपट तिने दिला. हा शुद्ध गार्बोपट होता. ह्या कॉमेडीमध्ये गार्बोने अगदी सहजपणे अभिनय केला. गार्बोच्या चागल्या चित्रपटात त्याची गणना होते

तिचा शेवटचा चित्रपट म्हणजे 'टू फेसेड वूमन'. त्यात गार्बोची निवड चुकली. तिच्या प्रतिमेच्या अगदी उलट अशी भूमिका त्यात होती. प्रहसन हा तिचा स्वभाव नव्हता. ती टू फेसेड कधी नव्हतीच. गार्बोच्या चाहत्याना त्यामुळे धक्का बसला

त्याच्यावरच्या सगळ्या प्रतिक्रिया गार्बोने लक्षात घेतल्या. ती अजून बहरातच होती. वय ऐन तिशीतल होत, पण एका चित्रपटाच्या अपयशाने तिने मनाशी खूणगाठ बाधली आणि आपल्या दैदिप्यमान कारकिर्दीचा शेवट करायचे ठरवले. मेट्रो गोल्डविन मेयरबरोबरचे सबध तिने संपवले, आणि ऐन उमेदीतच तिने पुन्हा चित्रपटात कामे न करण्याचा निर्णय घेतला. आपल्याकडच्या नर्गिससारखाच तिचा हा निर्णय होता आणि सिनेमा जगातील एक देवता हॉलीवूड सोडून चालती झाली.

या घटनेला आता चाळीस वर्षाहून जास्त वर्षे होऊन गेली; पण गार्बोची याद हॉलीवूड आणि सिनेरसिक विसरू शकत नाहीत.

तिचा अभिनय फार उच्च दर्जाचा होता अशातील भाग नाही; पण काही समर्थ भूमिका तिनं जरूर केल्या आहेत. अभिनयाच्या बाबीत इन्ग्रिड बर्गमनची उची तिला गाठता आली नाही; पण तिच्याबद्दलचे आकर्षण शेवटपर्यंत टिकून राहिले, याचे कारण म्हणजे तिचे गूढ रहस्यमय सौंदर्य !

तिच्या वागण्यात कधीच उत्तानता नव्हती. तिचे वागणे एखाद्या देवतेसारखे प्रसन्न असे. उच कपाळ, खोल डोळे यामुळे तिच्यात एक भव्यता होती. ती फारसे कधी बोलत नसे. फालतू उपचाराचा तिला तिटकारा होता फालतू गॉसिप्सना तिच्याकडे थारा नसे. तिच्याबद्दल वावड्या कधी उठल्या नाहीत. कोणाबरोबर तिचे नाव जोडण्याचे धाडस कोणी केले नाही ती हॉलिवूडमध्ये असताना रस्त्यावर तिचे दर्शन दुर्मिळ असे. तिने बोलवले म्हटल्यावर आल्डस हक्सलेसारखे लोक धावत जात असत. ती कधीच आलीशान वागली नाही. घरखर्चही तिने अगदी माफक ठेवला होता.

'अनिता लूस' नावाच्या एका नटीने जुन्या हॉलिवूडच्या आठवणी सागितल्या आहेत. त्यात गार्बोसारखी नटी आपल्याला कशी वागवत असे, याचे तिने जे वर्णन केले आहे ते वाचण्यासारख आहे तिच्या एकंदरीत वागण्यात एक शान होती, डौल होता तो एखाद्या राजहंसीसारखा होता.

गार्बोबद्दल इतक लिहिल गेलंय की त्याचं एक सुदर गार्बो ग्रथालय होईल.

आता ती शात जीवन कंठते आहे. तिचा अल्पकाळ एखाद्या वीजेप्रमाणे जगाला दिपवून गेला. आता त्यात तिला रस नाही. अधूनमधून गार्बोच्या पुनरागमनाच्या वावड्या उठायच्या पण ती परत आली नाही.

नटयाचं जीवन तसं खळबळजनक असत. पण गार्बो एखाद्या कमळासारखी चिखलात राहूनसुद्धा चिखलापासून अलिप्त राहिली.

हेच गार्बोच मोठेपण आहे.

# गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी भाषा व साहित्य

## महाराष्ट्र राज्य रौप्य–महोत्सवी वर्षानिमित्त चर्चासत्र

मेधा सिधये

**१९८५** हे वर्ष महाराष्ट्र राज्य रौप्य–महोत्सवी वर्ष आहे. १ मे १९६० या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. कै. यशवतराव चव्हाण यानी सयुक्त महाराष्ट्राचा मगलकलश आणला आणि मराठी मन नवीन आशानी, सकल्पानी बहरून गेली त्या दिवसाच स्मरण या सवंध वर्षात, वेगवेगळ्या पातळ्यावरून केलं जाईल त्यातून विचारमथन, आत्मपरीक्षण होईल. निरनिराळ्या क्षेत्रातील प्रगतीच्या नव्या दिशाही दिसू लागतील.

मराठी भाषा व साहित्याच्या सदर्भात एक प्रयत्न नुकताच पुण्यात झाला. २८ फेब्रु., १ व २ मार्च १९८६ असे तीन दिवस पुण्याच्या मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे 'गेल्या पचवीस वर्षातील मराठी भाषा व साहित्य' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित केल होत. त्यात (१) मराठी भाषा (२) साक्षरता व प्रसार माध्यमे (३) कविता (४) नाटक (५) आत्मचरित्रे (६) मराठी सशोधनपर साहित्य (७) कथा (८) कादबरी (९) पाठ्यपुस्तके या विषयावर जाणकारानी निबध वाचले आणि त्या निबधाच्या अनुषगाने चर्चा झाली. कार्यक्रमाचे सयोजक मराठी विभाग प्रमुख डॉ. वि. भा. देशपाडे होते अतिशय योजनाबद्ध आणि भरीव स्वरूपाचं, बरच काही देणारं असंच हे चर्चासत्र झाल.

चर्चासत्राच उद्घाटन झाल श्री. शकर पाटील याच्या हस्ते २८ फेब्रु. ला दुपारी ३ वाजता. त्यागराज खाडिलकर या विद्यार्थ्याने गायिलेल्या – 'बहु असोत सुदर संपन्न की महा .' या महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नतर श्री शकर पाटील यानी ज्ञानेश्वराच्या प्रतिमेला पुष्पहार घालून आणि दीप प्रज्वलित करून चर्चासत्राचं उद्घाटन केल. उद्घाटन समारभाला प्राचार्य स. य. गभीर अध्यक्ष होते. त्यानी महाविद्यालयाच्यावतीने श्री शकर पाटील याचं स्वागत केल आणि कार्यक्रमासबधी माहिती दिली मराठी भाषेविषयी एवढ मोठ चर्चासत्र आयोजित केल, पण सरकारने मात्र त्यासाठी काहीही अर्थसहाय्य दिलं नाही याची खत प्राचार्यांनी व्यक्त केली. आपल्या प्रास्ताविक भाषणात डॉ वि भा. देशपांडे यानी सरकारने अर्थसहाय्य दिलं नाही, ते बरच झाल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली तर श्री शंकर पाटील यानी सरकारवर टीका केली. मराठी भाषेबाबत श्री शकर पाटील यांनी एकदोन विचार मांडले त्यात नाविन्य नव्हत, पण तळमळ निश्चितच होती. त्यापैकी एक म्हणजे शुद्धलेखनाच्या नियमाचा पुनर्विचार व्हावा. मराठी, सस्कृतनिष्ठ राहिल्यामुळे जो तोटा होतो त्याचा विचार करावा आणि बोली भाषांबद्दल आस्था निर्माण करणं हा मराठीच्या अभ्यासाचा हेतू असावा. या विचारांमागील भूमिका सर्वपरिचित आहे. पुणे विद्यापीठाची पत्रं इग्रजीत असतात, याबद्दल त्यानी नाराजी व्यक्त केली, ती योग्यच होती. श्री शंकर पाटील यांच्या मनापासून, तळमळीने केलेल्या भाषणामुळे चर्चासत्राला प्रारभीच सूर गवसला.

पहिला, 'मराठी भाषा' या विषयावरचा निबध वाचला डॉ. कल्याण काळे यानी यावेळी अध्यक्ष होते डॉ अशोक केळकर आणि चर्चा करणारे होते डॉ. चद्रशेखर बर्वे.

डॉ. कल्याण काळे यानी आपल्या निबधात मराठी तत्वत: राज्यभाषा झाली तेव्हापासून, ते मराठी अन्याय निर्मूलन परिषदेच्या आजच्या कार्यापर्यंतचा आढावा घेतला. महाराष्ट्र राज्यस्थापनेला पचवीस वर्षं झाली तरी मराठी अन्याय निर्मूलन समितीला खूप काम आहे, हा विचार त्यातून ठमला डॉ अशोक केळकर यानी १९७९ मध्ये स्वतत्र मराठी विद्यापिठाची मागणी केली होती, त्याचीही डॉ काळे यानी आठवण करून दिली.

### साक्षरता आणि माध्यमं

या निबधासबधी बोलताना डॉ चद्रशेखर बर्वे म्हणाले, की हा निबध भाषाविज्ञानाच्या अगाने जाणाऱ्या अभ्यासकाचा आहे तो अध्ययनाच्या अगाने जाणारा नाही. मराठीची अभिव्यक्तीक्षमता कशी वाढत आहे, याचा आढावा यात हवा होता सरकारने मराठी भाषेबाबत काय केल, काय नाही हे डॉ काळे यानी माडलं होत त्या सदर्भात डॉ बर्वे म्हणाले की, शिवाजीमहाराजाच्या काळात एकदा धोरण ठरवल्यानतर त्याची अमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्याचा मुलाहिजा ठेवला जात नसे आज मात्र अशा अधिकाऱ्याना पाठीशी घातल जात डॉ बर्वे यानी सागितलेल हे कटुसत्य मान्य होण्यासारखच आहे. कारण ही परिस्थिती आज आपण अनुभवत आहोत. पाठ्यपुस्तकाच्या राष्ट्रीयीकरणाच्या सदर्भात डॉ बर्वे यानी दोन मुद्दे माडले पाठ्यपुस्तक तयार करताना सपादकानी त्या त्या इयत्तेला शिकविणाऱ्या अध्यापकाशी संपर्क साधला पाहिजे. पण आज तसं होत नाही. पाठ्यपुस्तकावर समीक्षक नेमले जातात, पण त्याच्या, स्वतःला सोयीस्कर सूचनाच पाळल्या जातात या सगळ्याचा सबंध सरकारी यत्रणेशी आहे. भाषाविज्ञान आणि व्यावहारीक मराठी याबाबतचे बर्वे याचे विचार मतभेदाचे ठरले. प्रथम वर्ष वाणिज्य आणि द्वितीय वर्ष विज्ञान या विद्यार्थ्यांना व्यावहारिक मराठी शिकवल जात; पण ते त्या विद्यार्थ्यांना नको आहे त्याना चागल्या वाङमयाचा अभ्यास करायचा आहे म्हणून व्यावहारिक मराठीचा फेरविचार केला जावा तसेच B A च्या पातळीवर भाषाविज्ञान नसावे अशी आपली मते डॉ बर्वे यानी माडली ही त्याची मते

श्री. प्र. ना. पराजपे आणि डॉ. अशोक केळकर यानी खोडून काढली. २६ फेब्रु च्या 'भारत बद' च्या वेळी महाराष्ट्राच्या मुख्यमत्र्यानी दूरदर्शनवरून जनतेला शातता राखण्याचं आवाहन केल, तेव्हा मुख्यमत्री 'आवाहन' ऐवजी 'आव्हान' शब्द उच्चारीत होते ही मराठीची अवस्था प्र. ना. पराजपे यांनी निदर्शनाला आणली. चर्चेत भाग घेताना प्रा. अश्विनी धोगडे म्हणाल्या की, डॉ. कल्याण काळे यानी भाषिक वाढीबाबत विचार केला नाही. इग्रजी शब्द अधूनमधून वापरले तरी दचकण्याचं कारण नाही. व्यावहारिक सोपेपण म्हणूनच सरकारी अधिकारी ती वापरतात. श्री. मो. रा. वाळिंबे शुद्धलेखनाच्या प्रश्नाबाबत बोलले. Re-Orientation Courses ची गरज त्यानी बोलून दाखवली. प्रा. अरविंद वामन कुलकर्णी म्हणाले की, इग्रजी विरुद्ध मराठी असा सघर्ष नाही. इंग्रजी जोडभाषा म्हणून वापरली जाते. नाहीतर महाराष्ट्राच्या बाहेर आपण काय करणार? तसंच इथं माडला गेलेला दृष्टिकोन शहरी भागाचा आहे. शहरात शुद्धलेखनाची अनास्था आहे तर खेड्यात काय असेल याचा विचार व्हायला हवा. चर्चेच्या शेवटी डॉ कल्याण काळे यानी त्याच्या निबधाबाबत जे मुद्दे उपस्थित केले गेले होते, त्याना उत्तर दिलं.

साक्षरता व प्रसारमाध्यमाबद्दल श्री. वसंतराव कुलकर्णी बोलले. यावेळी प्रा. स. शि. भावे अध्यक्ष होते आणि श्री. विश्वास मेहेंदळे चर्चिक होते. श्री. वसतराव कुलकर्णी आकाशवाणी या प्रसारमाध्यमाबाबत बोलले. त्यांनी गेल्या पंचवीस वर्षात आकाशवाणी केंद्राची वाढलेली संख्या, मराठी भाषिकाच्या विविध श्रोतृगटासाठी नव्याने सुरू झालेले कार्यक्रम याबद्दल सागितलं. ग्रामीण भागाशी पाहिजे तेवढा सुसंवाद साधला जात नाही; आदिवासीसाठी कार्यक्रम नाहीत या त्रुटी दाखवल्या मराठी भाषिकाबद्दल पोटतिडीक असलेले अधिकारी नाहीत. अन्यथा सरकारी माध्यम असूनही कार्यक्षम अधिकाऱ्याना काही चागल करायच असेल तर करता येत हेही स्पष्ट केल. आकाशवाणीवर कार्यक्रम करणाऱ्याने हे माध्यम नीट समजावून घेतल पाहिजे. मोठमोठ्या साहित्यिकांनाही आकाशवाणीवर नीट भाषण करता येत नाही हा त्याचा अनुभव त्यांनी सांगितला. त्याची प्रचीती आपल्यालाही येतच असते. हाच मुद्दा श्री. विश्वास मेहेंदळे यानी दूरदर्शनच्या संदर्भात मांडला. मोठमोठी नामाकित माणससुद्धा दूरदर्शनवर वाङमयीन भाषा वापरतात, त्याना माध्यमाची जाण नसते आणि त्याबद्दल बोलताही येत नाही. कारण त्याचा अहकार दुखावतो. मराठी भाषेत मौलिक कार्य करणाऱ्या व्यक्तीबद्दलचे कार्यक्रम इतर भाषामध्ये झाले पाहिजेत; पण तसं होत नाही. चित्रावशास्त्रीबद्दलचा किंवा पु. ल. देशपांडे याच्यासंबधीचा कार्यक्रम हिंदीत करायचा ठरविलं तर मराठीची अस्मिता आड येते. असं होता कामा नये असं मत श्री. मेहेंदळे यांनी व्यक्त केलं. त्यांनी एक खत बोलून दाखविली की, साहित्य संमेलतात त्याच्या भाषणात साहित्यिक, सपादक इ. चा सत्कार केला जातो पण दूरदर्शनवर जे कार्यक्रम तयार करतात; दूरदर्शनसाठी लेखन करतात, दिग्दर्शन करतात ते साहित्यिक, दिग्दर्शक नाहीत का? त्याचं योग्य ते चीज होत नसल्यामुळे आमचा फक्त वापर केला जातो अशी दूरदर्शनवरील लोकाची भावना असते. चर्चेत भाग घेताना डॉ. तारा भवाळकर यानी दूरदर्शनवरील उच्चार अशुद्ध असल्याची तक्रार केली आणि ग्रामीण कार्यक्रम सादर करणारी माणसं शहरी असल्यामुळे ग्रामीण कार्यक्रम चागले होत नाहीत अस सागितलं. अध्यक्ष प्रा. स. शि. भावे यानी आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे, नियतकालिके या सगळ्याचाच या विषयाच्या सदर्भात विचार व्हायला हवा असं मत माडलं. तसच भाषा व वाङ्मय याचा विचार जीवनाशी सबधित असला पाहिजे असं सागितल. आकाशवाणी, दूरदर्शन, पाठ्यपुस्तक मडळ, वृत्तपत्रे यानी केलेल काम आणि महामडळ, स्वायत्त सस्था याचं काम यात शासनाच पारडं जड आहे असं सागितलं. या विषयाबाबत प्रसारमाध्यमाचा विचार झाला; पण साक्षरतेबद्दल मात्र विवेचन झालं नाही ही उणीव जाणवली. एवढी चर्चा होईपर्यंतच साडेसहा वाजून गेले होते. त्यामुळे रगलेली चर्चा थावली आणि दुसऱ्या दिवशी पुन: लौकर यायचे आहे अशा तयारीने सगळे परत निघाले.

## कविता—महानोर

शनिवार दि. १ मार्च रोजी सकाळी ९ वाजता डॉ. अक्षयकुमार काळे याच्या 'कविता' या विषयावरील निबंध वाचनाला सुरुवात झाली. यावेळी अध्यक्ष होते श्री. ना. धों. महानोर आणि चर्चिक होते डॉ. रेखा इनामदार, डॉ. श्रीरंग संगोराम. डॉ. काळे यानी गेल्या पचवीस वर्षातील मराठी काव्याचे समग्र रूप आपल्या डोळ्यासमोर उभे करून कवितेच्या सदर्भातील प्रवृत्तिप्रवाहाचे थोडक्यात दिग्दर्शन करणे हा शोधनिबधाचा हेतू असल्याचे सागितले. १९६० च्या दरम्यान मर्ढेकरी परंपरा स्थिरपद झाली होती. असे म्हणून त्यांनी मर्ढेकरी परंपरेचे तीन टप्पे सोदाहरण विशद केले. त्यानंतर नारायण सुर्वे यांच्या कवितेची वैशिष्ट्ये सागितली आणि दलित कवितेचे टप्पेही सागितले. महाराष्ट्रात 'गझल' लोकप्रिय करण्याचे श्रेय सुरेश भटांना देऊन त्याच्या मर्यादा, अनिष्ट प्रवृत्ती याबाबतचीही आपली मते नोदवली. र. कृ. जोशी याच्या मूर्त कवितेच्या चळवळीत कुठलीही अपरिहार्यता नाही असं मत व्यक्त केलं. या निबधावर चर्चा करताना डॉ. श्रीरग सगोराम यानी या निबंधात छंदांकडे दुर्लक्ष झाल आहे असं नमूद केलं. सौंदर्यवादी कविता हेच दलित काव्याचही अंतिम उद्दिष्ट आहे, असं मत डॉ. सगोराम यांनी डॉ. काळे याच्या याबाबतीतील विवेचनाच्या संदर्भात केल. डॉ. रेखा इनामदार म्हणाल्या की, या निबधात ठिकठिकाणी पुष्कळ नावं एकत्र आलेली दिसतात. ती सगळी एका प्रवृत्तीची निदर्शक नाहीत. त्याच्यापैकी एकेका नावाच्या योग्य त्या स्थानाबद्दल खूप मतभेद होऊ शकतील. तसेच डॉ. काळे याचे काही अभिप्राय हे तुटकपणे येतात. वास्तविक त्याचा सविस्तर उहापोह व्हायला हवा होता. विशिष्ट कालखंडातील कविता आणि नियतकालिके याचा काही परस्पर सबध असतो का, याचा विचार व्हायला हवा होता. प्रामुख्याने कवितेतून साम्यवादी परपरेचा जो काही आविष्कार झाला आहे त्याला दखल घेण्याजोगे कलारूप आलेले आहे का? असाही प्रश्न त्यानी विचारला. प्रा अर्रविद वामन कुलकर्णी म्हणाले की मर्ढेकराची परंपरा म्हणण्यापेक्षा वर्तुळ

म्हणणं जास्त बरोबर ठरेल. श्री. नारायण सुर्वे यांच्या कवितेतील सोपेपणा त्यांच्या कवितेतील तत्त्वज्ञानातून आलेला आहे. श्री. नामदेव ढसाळ यांच्या कवितेवर वैचारिक आततायीपणाचा आरोप करता येईल का ? असा प्रश्न त्यांनी विचारला. डॉ. गं. ना. जोगळेकर म्हणाले की, १९६० ते ८५ या कालखडात मागच्या पिढीतल्या कवीनीही भरघोस कार्य केलं आहे. त्यांचाही विचार व्हायला हवा. डॉ. अशोक केळकर म्हणाले की या चर्चासत्राकडे साहित्याच्या भावी इतिहासाची पूर्वतयारी म्हणून पाहिलं जावं. त्यांनी त्या दृष्टीने मौलिक विवेचन केलं. प्रा. दिगबर पाध्ये यांनी सुर्वे यांच्या कवितेतील सोपेपणाचा संबंध त्यांच्या विचारसरणीशी नाही हे आपलं मत माडलं. प्र. ना. पराजपे म्हणाले की, परंपरा व पिढी या दोन संकल्पना कशा वापरायच्या याबाबत मतभेद होऊ शकतात. सुर्वे याची कविता म्हणजे केवळ मार्क्सवाद नव्हे. त्याची परपरा नाही हे विधान तर्कदुष्ट आहे. प्रा. गो. म. कुलकर्णी यानी सागितलं की दलित कवीना सुर्वे भावले. मध्यमवर्गीय कवी भावले नाहीत.

कवितेवरील चर्चेच्या वेळी श्री. ना. धों. महानोर यांनी खरी बहार आणली. त्यानी समीक्षेतील जटिलतेला दूर सारून रसास्वादाकडे श्रोत्यांना प्रभावीपणे वळवलं. अनेक कवीच्या कवितामधील ओळी त्यानी उत्स्फूर्तपणे म्हणून दाखवल्या. कवितेतील चैतन्य, रसरशीतपणा याचा प्रत्यय त्यातून आला. हे गभीर चर्चासत्र असल्यामुळे आणि समोर बहुसंख्य समीक्षक असल्यामुळे बहुधा आनदाने टाळ्या वाजवून महानोराना दाद दिली गेली नाही; पण त्यांच्या भाषणातील वेगळेपणा नक्कीच उठून दिसला.

## नाटके–आत्मचरित्रे

प्रा. पुष्पा भावे यानी नाटकावर निबंध वाचला. अध्यक्ष होते श्री. दामू केंकरे आणि चर्चिक होते डॉ. अनंत देशमुख व डॉ. तारा भवाळकर. प्रा. पुष्पा भावे यानी स्वातंत्र्योत्तर काळात, रगभूमीच्या इतिहासातून जे प्रश्न निर्माण झाले ते मांडले. १९५४ ते ६० या काळातील प्रवृत्तीविषयी सागितलं आणि नाट्यलेखन, रगमच जाणीव, नाट्यव्यवहार या तीन पातळ्यांवरील घटनाचा आढावा घेतला. त्यांच्या विस्तृत विवेचनात 'रगमच' या अंगावरच लक्ष अधिक होत. नाटक, नाटकाची भाषा किंवा लक्षणीय नाट्यकृतीच्या अनुषगाने चर्चा नव्हती हा डॉ. अनंत देशमुख याचा अभिप्राय बरोबरच होता. डॉ. तारा भवाळकर यांनी लोकनाट्याच्या सदर्भात विचार माडले. प्रा. वसत दावतर म्हणाले की, नाटक प्रयोगाशिवाय पूर्ण होत नाही या विधानाचा तपशीलाने विचार व्हावा. श्री. दामू केंकरे म्हणाले की, रगमच निर्मितीमूल्यावरच बोलल गेल हे बरोबर नाही.

डॉ. अजली सोमण यानी आत्मचरित्रावर निबंध वाचला. अध्यक्ष होत्या डॉ. सरोजिनी वैद्य आणि चर्चिक होते डॉ म. वि. गोखले आणि प्रा. गंगाधर पाटील. डॉ. सोमण यानी आत्मचरित्राला केवळ कलात्मक मूल्य नाही, तर तो एक Social document असतो असं सागितलं. आत्मचरित्राचा रूपबंध त्यानी स्पष्ट केला आत्मचरित्र सत्यदर्शी होण्यातील अडचणी सागितल्या. या संदर्भात दलिताच्या आत्मकथनातील उणीवा माडल्या. आत्मचरित्र कलात्मक होण्यासाठी कोणते घटक असावे लागतात याच उदाहरण घेत घेत विवेचन केलं. मराठीत चागल्या आत्मचरित्राची सख्या थोडी का आहे याचा विचार केला. आत्मचरित्राच वर्गीकरण करून या कालखडाने या वाङ्मय प्रकाराच्या संदर्भात नेमकं काय दिलं ते सागितलं. प्रा. गंगाधर पाटील यानी आत्मचरित्रातील 'मी' बद्दल चागलं विवेचन केलं डॉ. म. वि. गोखले यानी आत्मवृत्त, आत्मकथन, आत्मचरित्र असा फरक करावा असा विचार माडला. प्रा. सुधाकर देशपाडे यानी दोन प्रकारच्या आत्मचरित्राचा निबधात उल्लेख नाही, तिकडे लक्ष वेधल. एक म्हणजे ज्याचं शब्दाकन दुसऱ्याने केलेलं आहे अशी आत्मचरित्रं आणि भाषातरित आत्मचरित्र. प्रा. वसत दावतर यानी आत्मचरित्र ही ललितकृती मानायची असेल तर त्याला चरित्र का म्हणायच, असा प्रश्न विचारला आणि आत्मचरित्रातलं सत्य हे subjective असेल तर तो चर्चेचा विषयच होऊ शकत नाही असं मत माडलं. डॉ. अरविंद वा कुलकर्णी म्हणाले की सत्य–असत्य हे कस पारखणार? ज्याला सत्य घटना माहीत असेल, तोच त्यासबधी काही साग् शकेल. डॉ. चद्रशेखर बर्वे यांनी आत्मचरित्रं हा साहित्यातला एक चकवा आहे हे ठाम मत नोदवल. डॉ. सरोजिनी वैद्य यानी आत्मचरित्र हे वेगवेगळ्या वाङ्मय प्रकाराच्या सीमारेषेवर असत अस सागितल. आत्मचरित्राच्या संदर्भात आपण तीन ज्ञानविषयाच्या कक्षेत शिरतो अस म्हणून त्याच सोदाहरण विवेचन केलं. १) इतिहासचर्चा २) मानसशास्त्रीय चर्चा ३) साहित्याच्या कलात्मक सौंदर्याच्या निकषांची चर्चा.मराठीत परिपूर्ण आत्मचरित्रं नाहीत असं मत त्यानी दिलं.

## कथा–कादंबरी

'मराठी संशोधन साहित्य' या विषयावर डॉ. वसत जोशी यानी भाषण केल. त्यात त्यांचा भर प्रामुख्याने Ph. D च्या प्रबंधाची आकडेवारी देण्यावर होता ख्रिश्चन, जैन, मुसलमान, लिंगायत याच्या मराठी साहित्यावरील, संशोधनाचा त्यानी उल्लेख केला. त्याचप्रमाणे संशोधन क्षेत्रातील वादविवादा संबंधीही ते बोलले. प्रा. गो. म. कुलकर्णी यावेळी अध्यक्ष होते आणि डॉ. नसिराबादकर व डॉ. ग. ना. जोगळेकर हे चर्चिक होते डॉ. नसिराबादकर यानी जाहिरातीविषयीच्या संशोधनाकडे लक्ष वेधलं आणि विद्यापीठीय सशोधनाच्या सदर्भात समान व्यासपीठाच्या निर्मितीची आवश्यकता प्रतिपादन केली. डॉ. ग. ना. जोगळेकर यानी आजचे Ph. D चे विद्यार्थी आणि जुन्या पिढीतले, सबंध आयुष्य सशोधनाला वाहून घेणारे सशोधक याची तुलना केली आणि आजच्या Ph. D. च्या विद्यार्थ्यांवर कडक टीका केली. त्यामागील कळकळ नक्कीच मोलाची आहे. त्यानी सागितलेली परिस्थिती सत्यच आहे; पण यात फक्त विद्यार्थ्यांना दोषी ठरविणे कितपत योग्य ठरेल ? असा प्रश्न मनात आला. आज जे Ph. D. च्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक आहेत त्यात राजवाडे, केतकर, मिराशी प्रियोळकर याच्या तोडीचे कुणी आहेत का ? असं जर एखाद्या विद्यार्थ्याने विचारलं तर त्याला काय उत्तर देता येईल ?

मराठी कथा या विषयावर प्रा. सुधा जोशी यानी निबंध वाचला. प्रा. वसत दावतर अध्यक्ष होते आणि डॉ. अरविंद

वामन कुलकर्णी आणि डॉ. विद्याधर पुडलिक चर्चिक होते.

प्रा. सुधा जोशी म्हणाल्या – १९६० चा काळ हा नवकथा स्वीकारल्याचा काळ आहे. या काळातल्या कथालेखकाना आव्हान आणि आवाहन दोन्ही मिळाल या काळातील काही सास्कृतिक संदर्भांचा त्यानी निर्देश केला. नियतकालिकामधील कथासमीक्षा, विविध कथास्पर्धा, सर्वोत्कृष्ट कथासग्रह यातून अनुकूल वातावरण कस निर्माण झाल ते सागून मुख्य कथाप्रवाहासबधीची निरीक्षणे त्यानी माडली. डॉ. अरविंद वा कुलकर्णी यानी निबधात राहून गेलेल्या गोष्टीचा उल्लेख केला. मराठी प्रेरणामधून लिहिणाऱ्या आणि अमराठी प्रेरणेतून लिहिणाऱ्या अशा दोन प्रकारच्या कथालेखकाविषयी ते बोलले. कथाच्या बाबतीतील Communication gap कधी भरून येणार, असा प्रश्न त्यानी विचारला. ग्रामीण कथाकार जेव्हा शहरी डोळ्यानी पाहून चित्रण करतात तेव्हा ते नागरांकडून अनागराच होणारं सास्कृतिक शोषणच असत, असा विचार त्यानी व्यक्त केला. डॉ. विद्याधर पुडलीक म्हणाले की, जिथे Complxity असेल तिथे सौंदर्यघटक निर्माण होतो. त्यानी वाङ्मयमीमासेतील वर्गीय जाणीवेबद्दलही विवेचन केल. डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी गेल्या ७–८ वर्षातील कथा ही कथा राहिली नाही असं सागितलं. डॉ. ग. ना. जोगळेकर यानी प्रा. सुधा जोशी याच्या निबंधात ज्याचा उल्लेख नाही अशा २०–२५ कथाकाराची यादी सागितली. प्रा गो. म. कुलकर्णी म्हणाले, की जी. ए. कुलकर्णी याच्या सदर्भातील *literary Dead end* चे स्पष्टीकरण व्हावे तसेच गगाधर गाडगीळाच्या शैलीचा उत्तरकालीन लेखकावर प्रभाव पडला नाही याची कारणे शोधली जावीत. पांडुरग गायकवाड यानी विचारले की, लेखक दुर्बोधतेत धन्यता मानतात ते कितपत बरोबर आहे ? तसेच कलात्मकता सर्वसामान्याला कळावी अशी असावी ? की आपण मानतो ती कलात्मकता असे इतरानी गृहीत धरले पाहिजे अशी अपेक्षा असते ? डॉ. चद्रशेखर बर्वे म्हणाले की Complexity पेक्षा सूक्ष्मतेवर लक्ष द्यावे. मराठी माणूस दुभगला आहे का ? म्हणून तुकडे पहाणं... जोडणं असं चालू आहे याचा विचार व्हावा. डॉ. अंजली सोमण यानी डॉ. पुडलिकांच्या काही विधानाबाबत मतभेद दर्शविला १९६० नंतर कादबरी व आत्मनिवेदन या वाङ्मयप्रकारांच्या Dominance होता असं सागितल आणि प्रा. गो. म. कुलकर्णी यांच्या गगाधर गाडगीळांसंबंधीच्या विधानाची चर्चा केली. प्रा. सुधा जोशी यानी चर्चेला उत्तर दिलं.

प्रा. दिगबर पाध्ये यानी कादबरीवर निबध वाचला. अध्यक्ष होते डॉ. भीमराव कुलकर्णी आणि चर्चिक होते डॉ. विलास खोले व डॉ. आनंद यादव.

## शालेय पाठ्यपुस्तके

प्रा. दिगबर पाध्ये यानी कादबऱ्यांच्या संख्येत झालेल्या प्रचंड वाढीबद्दल सुरुवातीला सांगितलं, आणि या काळात जीवनानुभवाचे क्षेत्र विस्तारल्यामुळे काय काय घडल त्याची चर्चा केली. त्यांनी कोसला, अजगर, सावित्री या तीन कादबऱ्यांमधील तीन वेगवेगळ्या प्रवृत्तीचा सदर्भ घेऊन एकूण मराठी कादंबरीविषयीची निरीक्षणं माडली. विविध प्रवृत्ती, प्रायोगिकता हे सारं असूनही मराठी कादबरी समर्थ नाही. जीवनाचे जे आकलन हरिभाऊंच्या कादबऱ्यामध्ये आहे ते १९६० नंतरच्या, वास्तववादाचा आधार असणाऱ्या मराठी कादंबरीत नाही असं मत त्यानी माडल आणि या वस्तुस्थितीची कारणं शोधताना महाराष्ट्रातील मध्यमवर्गाच्या विशिष्ट परिस्थितीचं स्वरूप, मराठी माणसाची वृत्ती आणि साहित्याकडे पहाण्याची आपल्या समाजाची दृष्टी याबाबतचे विचार माडले.

डॉ. विलास खोले म्हणाले की बगाली, हिंदी, कानडी अशा विविध भाषामध्ये मध्यमवर्गीय लेखकानी लेखन केलेल आहे. त्याच मध्यमवर्गीयपण लेखनाच्या आड आलेल नाही. आपल्या लेखकाना पाश्चात्य परपरेची जितकी आच आहे तेवढी भारतीय तत्त्वज्ञान, मूल्यव्यवस्था यांची नाही, म्हणून कसदारपणाचा अभाव दिसतो. मराठी लेखकाना परिश्रमांचा कटाळा आहे असं ते म्हणाले. लेखकाच्या स्वातंत्र्याबद्दल चर्चा खूप झाली पण लेखकाचं स्वातंत्र्य धोक्यात याव अस कादंबरी लेखन मराठीत झालेलं नाही. डॉ. आनंद यांनी समीक्षेच्या सदर्भात विचार न मांडता निर्मितीच्या बाजूने विचार मांडले. कादंबरी हा एक ढिला वाङ्मयप्रकार आहे. आपण नको इतके Form conscious झालो आहोत अस ते म्हणाले.

पाठ्यपुस्तकासंबंधीच्या चर्चेत फक्त शालेय पाठ्यपुस्तकासंबंधीच विवेचन होऊ शकल. हा निबध वाचला डॉ. रा. सो सराफ यानी. अध्यक्ष होते डॉ. व. दि. कुलकर्णी आणि चर्चिक होते प्रा. स. शि. भावे.

डॉ. सराफ यानी पाठ्यपुस्तके हा एकूण ग्रंथव्यवहाराचा कणा आहे आणि त्याचा उपयोग हा शिक्षणव्यवहारातील अत्यावश्यक घटक आहे हे प्रथम स्पष्ट केले. पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीची प्रगती सागताना त्यांनी महाराष्ट्रातील शालेय शिक्षणव्यवस्थेचा विचार मांडला. हा इतिहास सागताना धोरणामधील विसंगती स्पष्टपणे सागितली. पाठ्यपुस्तक निर्मितीच्या क्षेत्रातील नवीन प्रवाहाचं स्वरुप स्पष्ट केलं आणि त्यातून या विषयाची नेमकी माडणी झाली. प्रा. स. शि. भावे म्हणाले की, १ ली ते १२ वी पर्यंतच्या पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी एकच मंडळ असणे आवश्यक आहे पाठ्यपुस्तकाशी गुणवत्ता व जीवनदृष्टी या दोन्हीचा सबध आहे. म्हणून पाठ्यपुस्तके तयार करणारे केवळ शिक्षणतज्ज्ञ नसावेत, तर चागले साहित्यकही असावेत. आज एकागीपणे, दलितवाङ्मयाला पाठ्यपुस्तकात प्राधान्य दिल जात आहे हे चूक आहे. पाठ्यपुस्तकावर जो प्रचड पैसा खर्च होतो आहे तो भार करदात्यावर पडतो. म्हणून पालक आणि विद्यार्थी यांनी याबाबत जागरूक राहिलं पाहिजे. आपल्याकडे निश्चित शैक्षणिक धोरण नाही. आधुनिकता नाही, गणित, पदार्थविज्ञान याचे अभ्यासक्रम आधुनिक झाले. भाषा व वाङ्मय मात्र सगळ्यात कमी आधुनिक राहिल. पाठ्यपुस्तकांवरील चर्चेत डॉ. शैलजा जोशी, श्री. मो. रा. वाळिंबे, चंद्रकुमार डागे, डॉ. भिमराव कुलकर्णी इ नी भाग घेतला. महाविद्यालयीन स्तरावरील पाठ्यपुस्तकांचा विचार चर्चेत होऊ शकला नाही; पण सौ. सुषमा जोगळेकर यांनी ११ वी च्या यदाच नवीन आलेल्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील उणीवा, चुका दाखवून दिल्या आणि हे पाठ्यपुस्तक शिकविण्यासबधी काही प्रश्न उपस्थित केले.

या चर्चेनंतर समालोचन, समारोप हा कार्यक्रम होता. त्यावेळी अध्यक्ष होते प्रा. सीताराम रायकर. समालोचक होते डॉ. वि. रा. करदीकर आणि प्रा. म. द हातकणगलेकर. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रथम डॉ. द. दि. पुडे याच्या 'वाङ्मयेतिहासाची सकल्पना' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. वि. रा. करंदीकर याच्या हस्ते झाले. त्यानंतर डॉ. वि. रा करंदीकर यांचं मराठी भाषेच्या प्रगतीसंबंधी भाषण झाल. प्रा म. द. हातकणंगलेकर यांनी एकूण चर्चासत्राचा आढावा घेतला आणि हे चर्चासत्र समाप्त झाले. □

# डॉ. काशिनाथ घाणेकर नावाचं वादळ

वि. भा. देशपांडे

रविवार दोन मार्च सह्याऐंशी, दुपारी एक-दीडच्या सुमारास बातमी आली, डॉ. काशिनाथ घाणेकर गेले. ती बातमी ऐकत असताना सुन्नपण आले. गलबललेपण आले. काहीशी सैरभैर अवस्था झाली.

जाण्याआधी तीन-चार दिवस आधी नुकतीच पुण्यात सविस्तर भेट झालेली. त्यामुळं तर काही खरंच वाटत नव्हतं. असंख्य आठवणी, अनेक रूपं डोळ्यासमोर येऊ लागली. त्याचं जगणं म्हणजे कॅलिडोस्कोप होता. सतत निरनिराळे आकार घेणार, रंगीत तुकड्या तुकड्यानी फुललेलं. ज्यांना जसा तो दिसला, भावला तसतसा तो लोकांमधून व्यक्त होत गेला. ज्यांनी त्रयस्थपणानं किंवा कोरडेपणान पाहिलं त्यांना त्याच्या व्यसनाधिनतेच्या, विक्षिप्तपणाच्या कथा चवीचवीनं सांगाव्याशा वाटल्या, अशा मडळीनी त्याच्या सबधीचे काही तर्क केव्हाच गृहीत धरून निर्णयाप्रत येणं केलं. ज्यानी त्याला फक्त रगमंचावर-पडद्यावर पाहिला त्यांनी कलावंत म्हणून त्याचं भरभरून कौतुक केल. त्याला आपल्या 'दिलाचा राजा' बनवला. ज्यानी त्याला कलावंत आणि माणूस म्हणून पाहिला, न्याहाळला, अनुभवला त्याना त्याचं जगणं वेगळच भासलं !

अन् मग माणसं म्हणू लागली, काशिनाथ कसा होता ? मनस्वी, हट्टी, फटकळ, हेकेखोर आग्रही, भावडा, लाघवी, अती प्रेम करणारा, आणखी काय काय ? तर तो सगळच होता. त्याचं मनस्वीपण जितक खरं होत, तितकच त्याचं उध्वस्तपणही खरं होतं. त्याचं स्वतः-वर, स्वतःच्या कलागुणावर जितक प्रेम होतं, तितकच भवतालच्या जीवनातील जे मगलमय आहे, काळजाला हात घालणारं आहे, भव्य-दिव्य आहे त्यावरही होत. त्यानं सुख, आनंद आणि दुःख तितक्याच तीव्रतेनं, उत्कटतेन दिलं. पैशांची, शब्दांची उधळणही मुक्त केली आणि रसिकांना कलानंदही मुक्तपणानच दिला. अशी देवाण-घेवाण करता करताच तो गेला... !

लालसर गौरवर्ण, पाणीदार घारे डोळे, मध्यम उंचीचा, तल्लख बुद्धीचा हा कलाकार कोकणातून ( चिपळूणातून ) देशावर आला आणि दतवैद्य झाला. यानं वरळीला उत्तम दवाखानाही काढला. पण त्यात त्याच मन रमेना. कारण ती त्याची वाट नव्हती. पुढं तो त्या वाटेला गेलाही नाही, फक्त त्यातलं डॉक्टर हे बिरुद मात्र त्यानं सतत बरोबर ठेवल. त्या निमित्तानं जी डॉक्टरकी राहिली तेवढीच !

याच काळात त्यानं रंगभूमीवर प्रवेश केला. तीस-बत्तीस वर्षांपूर्वी मुबईच्या भारतीय विद्या भवनच्या वतीनं आतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा आरंभित झाल्या. तिथून हौशी स्तरावर याचा नाट्यप्रवास सुरू झाला असं म्हणता येईल. तिथ तो हळूहळू ध्यानात यायला लागला. या स्पर्धांचं फार मोठ ऋण मराठी रंगभूमीवर आहे. ते म्हणजे या स्पर्धेतले अनेक नाट्यकलावत पुढे हौशी-प्रायोगिक-व्यावसायिक रगभूमीवर नामवत झाले. उदाहरणार्थ दामू केंकरे, विजया मेहता, अरविंद देशपांडे, कमलाकर सारंग असे कितीतरी. काशिनाथ हा त्यापैकीच एक.

याच स्पर्धेत तो ध्यानात आल्यानं त्याला विजय तेंडुलकराच्या 'माणूस नावाचं बेट' नाटकासाठी विचारल. त्यानं त्या नाटकाचे मोजकेच प्रयोग केले. दिग्दर्शक होता दामू केंकरे. दामू या नाटकाच्या सदर्भात सागतो की, एका प्रयोगात काशिनाथ आलाच नाही, कारण त्याची दाढ दुखत होती. प्रयोग रद्द झाला. काशिनाथन जे कारण सागितलं होत त्याच शब्दात ते नाट्यगृहाबाहेरच्या फलकावर लिहिलं गेल. ते कळल्यावर तो अस्वस्थ झाला. पण ती आठवण दीर्घ काळ ध्यानात ठवून अगदी अलिकडच्या काळात काशिनाथ पुन्हा एकदा दामूकडं आला आणि मला हॅम्लेट करायचय आणि तेही तुझ्या दिग्दर्शनाखाली असा आग्रह धरला. पण ते काही जुळून आल नाही.

काशिनाथला पाहताना मला नेहमी असं वाटायचं की, गद्य नटांच्या परंपरेतला हा महत्त्वाचा नट, पण यानं हॅम्लेट का केला नसेल ? त्याची इच्छा तर तीव्र होती. यावर खाजगीत बोलणं चाललं असताना दामू केंकरे सहजपणानं म्हणाला की, काही वर्षांपूर्वी कदाचित हे घडलही असतं असं अनेकांना वाटतं. पण मला कधीच वाटलं नाही. याचं कारण नट म्हणून त्याची ताकद कमी होती असं नव्हे तर हॅम्लेटच्या व्यक्तिरेखेसाठी त्या नटामध्ये जी अंतर्मुखता लागते ती त्याच्याकडं कमी होती. ही गोष्ट मात्र नक्कीच मानावी लागेल की, काशिनाथ नट म्हणून बहिर्मुख वृत्तीचा होता. त्या वृत्तीच्याच व्यक्तिरेखा तो निवडीत गेला आणि त्याला मिळतही गेल्या.

त्यानं जस आरंभीच्या काळात 'माणूस नावाचं बेट' मध्ये काम केलं तसं आणखी तेव्हाचं महत्त्वाचं नाटक केल, ते म्हणजे गो. नी दाडेकराच 'शितू'. याच्या दिग्दर्शिका होत्या विजया मेहता ( तेव्हाच्या विजया खोटे). तसच सुधा करमरकराच्या 'मधुमजिरी' या रत्नाकर मतकरीलिखित बालनाट्यात काम केल. पुढं आय. एन् टी. न केलेल्या 'माते तुला काय हवय' मध्येही काम केल. पण हा काशिनाथच्या रंग-कारकिर्दीचा पूर्वार्ध होता. तो स्वतःची वाट शोधत होता. हौशी-प्रायोगिक रगमचावर रहाण हे त्याच्या स्वभावात मूलतः नव्हतंच!

## शंभूराजे आणि संभाजी

१९६२ साल उजाडलं आणि वसतराव कानेटकराचं 'रायगडाला जेव्हा जाग येते' रंगभूमीवर आल. या ऐतिहासिक नाटकानं मराठी रगभूमीत इतिहास घडवला. या बहुचर्चित नाटकात सर्वात लक्षवेधी ठरला तो काशिनाथ. सभाजीच्या भूमिकेत. काशिनाथच्या जीवनातल एक नव पर्व आरभित झालं. त्या भूमिकेत तो दिसायचा उत्तम, बोलायचा उत्तम, मुद्राभिनयही करायचा उत्तम. त्याच रंगभूमीवरचं देखणं नटरूप

खिळवून ठेवायचं. त्याच्या बाबतीत पु. ल. देशपांडे यांनी म्हटलंय ते अगदी खरंय, की 'त्यानं रंगमंचावर प्रवेश केला की, सभागृहात लकाकणारे झुंबर पेटल्यासारखं वातावरण निर्माण व्हायचं.' असं लकाकणारं पेटतं झुंबर मी १९६२ साली पुण्यातल्या 'रायगड'च्या पहिल्या प्रयोगाला पाहिलं. त्यावेळी पुण्यात नाट्यगृहांची वानवाच होती. त्यामुळं भरत नाट्य मंदिर सोडलं तर कायम स्वरूपाचं नाट्यगृह नव्हतं. त्याच्या जोडीला महाराष्ट्र मंडळात नाटकाचे प्रयोग व्हायचे. हा प्रयोगही तिथंच झाला होता. काशिनाथचा शंभूराजे तिथं मी पाहिला. मा. दत्ताराम आणि काशिनाथ यांच्या अभिनयाची जुगलबंदी तिथंच पाहिली. महाराष्ट्र मंडळाच्या रंगमंचावर (तो रंगमंच कसला, संध्याकाळी मल्लखांब किंवा इतर व्यायामासाठी बांधलेला मोठा चबुतरा, तिथंच रात्री पडदे लावून नाटक.) नाटक पाहणं ही एक शिक्षाच असे. पण त्या सगळ्या प्रतिकूल परिस्थितीत दत्तारामबापू आणि काशिनाथनं शेकडो प्रेक्षकांना गुंतवून ठेवलं. पितापुत्रांच्या मधले अनेक अमूर्त भावक्षण विलक्षण ताकदीनं मूर्त झाले. या शंभूराजानं प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवायला प्रारंभ केला तो याच नाटकानं. हा प्रयोग संपल्यावर डॉ. श्रीराम लागू, वसंत कानेटकर आणि आम्ही पी. डी. ए. मधली तरुण नाट्यवेडी मंडळी कितीतरी वेळ बोलत होतो. त्यावर नंतर डॉ. लागूंनी रसरंगमध्ये एक लेखही लिहिला होता.

या शंभूराजाची घोडदौड इथून जी सुरू झाली ती दीर्घकाळ टिकली. त्यामध्ये गारंबीचा बापू, अश्रूंची झाली फुले, गुंतता हृदय हे, अंधार माझा सोबती, मला काही सांगायचंय, सुरुंग, आनंदी गोपाळ, इथे ओशाळला मृत्यू, वर्षाव अशा नव्या नाटकांमध्ये भूमिका करणं चालूच होतं. पण पूर्वी होऊन गेलेल्या नाटकांपैकी संशयकल्लोळ, सुंदर मी होणार, तुझे आहे तुजपाशी ह्याही नाटकात महत्त्वाच्या भूमिका करणं होतंच.

यातली सर्वच नाटकं आणि त्यातल्या भूमिका एकाच तोलामोलाच्या होत्या असं कोणीच म्हणणार नाही. पण त्यातल्या काही भूमिका केवळ काशिनाथच्याच संदर्भात नव्हे तर, एकूणच मराठी रंगभूमीच्या संदर्भात महत्त्वाच्या ठरल्या. रायगडमधला शंभूराजा तरुण, कोवळा, काहीसा स्वच्छंदी, आबासाहेबांच्या मृत्युनं हळवा झालेला, परिपक्व नसल्यानं मुसलमानांना जाऊन मिळालेला असा बराच काही होता. तर 'इथं ओशाळला मृत्यु' मधला संभाजी अगदी वेगळ्या स्तरावरचा. विशेषतः त्या नाटकातला शेवटला भाग म्हणजे कोणत्याही नटाला आव्हान देणारा होता. देहाचे कितीही हाल झाले, प्रसंगी प्राण गमवावा लागला तरीही आपल्या धर्माचं, देशाचं स्वत्व न गमावणारा असा होता. हे दोन्हीही संभाजी काशिनाथनं तितक्याच ताकदीनं उभे केले. रायगडमध्ये जसा दत्तारामबापूंशी अभिनयाचा सामना समोरासमोर होता तसा ओशाळलामध्ये प्रभाकर पणशीकरांशी, पर्यायानं औरंगजेबाशी होता. कारण त्या नाटकातली संभाजी ही व्यक्तिरेखा जितकी ताकदीची तितकीच औरंगजेबाची व्यक्तिरेखाही ताकदीची आहे. त्यामुळं या दोन्ही नाटकात संभाजीच्यारूपात काशिनाथला पाहताना मनोमन समाधान व्हायचं. पुढं या दोन्ही नाटकात काशिनाथनं संभाजी सोडल्यावर अनेक नटांनी त्या भूमिका केल्या आणि करतीलही. पण या दोन व्यक्तिरेखांवर त्याची असलेली मुद्रा कधीच मलीन झाली नाही. होणारही नाही.



☐ जिवंतपणी दंतकथा होण्याचं भाग्य (?) लाभलेला डॉ. काशिनाथ 'वर्षाव'मध्ये आशा काळे बरोबर ☐

काशिनाथ जसा संभाजी, तसा तो 'अश्रूंची झाली फुले' मधल्या लाल्या असंही एक समीकरण तयार झालं. नटांच्या संदर्भात अनेकदा म्हटलं जातं की, अमूक एक नट अमूक एका भूमिकेसाठीच जन्माला आलाय. किंवा त्याच्यासाठी ही भूमिका जन्माला आलीय. यातलं अलंकरण सोडून दुरून जरी पाहिलं तरी एक मान्यच करावं लागेल की, काशिनाथनं लाल्या ज्या ताकदीनं उभा केला तसा पुन्हा होणे नाही. स्वतः त्याच्याकडूनसुद्धा नंतरच्या काळात ते घडलं नाही. इतरांचा तर प्रश्नच नव्हता. संभाजीप्रमाणंच तो पूर्णत्वानं लाल्या दिसायचा. लाल्याचं बेबंद विद्यार्थीपण, त्यातली मस्ती, लाल्याचं इन्स्पेक्टर होण्यापर्यंतचा प्रवास आणि आपल्याच 'सरांना' विमानतळावर पकडण्याचा आलेला प्रसंग हे सारे भडक वाटणारे नाट्य काशिनाथ अतिशय परिणामकारी रीतीनं पोहोचवायचा.

संभाजी, लाल्याचं बरोबरीनं काशिनाथ जनमान्य झाला तो गारंबीच्या बापूनं आणि 'गुंतता हृदय' मधल्या बाबुलनं. ह्या दोन्ही

व्यक्तिरेखा चांगल्या होण्यासाठी आवश्यक ते अभिनयगुण त्याच्याकडं होतेच, पण त्याही-पेक्षा एक गोष्ट होती. ती म्हणजे कोकणच्या मातीशी त्याचं आणि त्या व्यक्तिरेखाचं असलेलं नातं. त्यातले अनेक बारकावे त्यानं कधी पाहिलेले, कधी अनुभवलेले असावेत. कदाचित त्यामुळच त्याची त्या भूमिकेतली तन्मयता प्रेक्षकांना भिडली असावी.

मला स्वत:ला 'आनंदी गोपाळ' मधला त्याचा गोपाळरावही तितकाच आवडायचा. इतर नाटकाइतकं ते लोकाच्या स्मरणात नसेलही; पण ज्यावेळी गारंबीमधला बापू आणि हा गोपाळराव याबद्दल मी त्याच्याशी एकदोनदा बोललो तेव्हा माझ्या म्हणण्याशी तो बराच सहमत झाला होता. मी त्याला म्हटलं होतं की, तू या दोन्ही भूमिका उत्तम करतोस. कारण त्या व्यक्तिरेखामधले अनेक तपशील तुझ्या स्वभावाशी जुळतेमिळते आहेत. विशेषत: गारंबीच्या बापूचा अफाट-पणा आणि गोपाळराव जोशाच्या वागण्या-तला विक्षिप्तपणा त्यावर तो छानसा हसला. पुढं मी त्याला गमतीनं असंही म्हटलं की, खरं तर त्या गोपाळराव जोशींना गोपाळराव घाणेकर आणि त्या उलट तुझं नाव ठेवलं असत तरी चालल असत !...

रंगमचावर यश लाभल्यावर चित्रपट-वाल्यानी त्याला विचारण स्वाभाविकच होतं. तसे त्याला काही चागले मराठी चित्रपट मिळालेही. उदाहरणार्थ पाठलग, मराठा तितुका मेळवावा, मधुचद्र, सुखाची सावली, हा खेळ सावल्याचा, एकटी, चंद्र होता साक्षीला, आणि हिंदीमध्ये 'दादी माँ' इत्यादी. यातले काही चित्रपट चागले चाल-लेही, काशिनाथला त्या संदर्भातली काही सन्मानित करणारी पारितोषिकेही मिळाली; पण चित्रपटाच्या क्षेत्रातला त्याचा वावर मर्यादितच राहिला. मला तर वाटत की, त्याला ते वातावरण तरी मानवलं नसाव किंवा अन्य काही कारणानं त्याचं मन तिथं रमलं नसाव. त्याचं जस स्वत.वर मन पूर्वक प्रेम होत तसंच रगभूमीवरही !

जन्मत असलेलं लोभसवाण रूप आणि अभिनयगुणाची संपन्नता मराठी रगभूमीच्या संदर्भात फारच अल्प नटाना लाभली. काशिनाथ त्यापैकी एक होता. रंगमंचावरचं त्याचं असणं, दिसण हे तर मोहक होतंच, पण त्याची स्वत.ची बोलण्याची एक ढब होती. काहीसा शब्द खेचण्याचा, कधी शब्दाची तर कधी वाक्याच्या अखेराची दुरूक्ती करण्याची त्याची पद्धती होती. त्याच्या आवाजात असलेली भावनिकता रसिकांच्या काळजाचा वेध घेणारी होती. डोळे आणि एकूणच मुद्रा यामध्ये आवा हकता होती. ह्या साऱ्या गोष्टीमुळ तो सर्व-सामान्य प्रेक्षकाना तासनतास गुतवून आणि गुगवून ठेवीत असे. जनसामान्याना गुतवून ठेवण्याची त्याची स्वत.ची ही एक खास पद्धती होती. आपला शब्द, त्यातल्या साऱ्या भावछटासह शेवटच्या ओळीतल्या प्रेक्षका-पर्यंत पोहोचावा ही त्याची उत्कट इच्छा असे. त्यासाठी रंगमंचीय सर्व युक्त्या तो वापरीत असे. त्याच्या अभिनयाची शैली बनून तिच अनुकरण करण्याचाही यत्न काहीनी केला, तसच काहीनी त्याची टिंगल टवाळीही केली त्याबद्दल अनेकानी केलेल्या टीकेकड दुर्लक्ष करून त्यान आपला रस्ता कधी सोडला नाही. तसा प्रयत्नही केला नाही. त्याची खतही बाळगली नाही.

## 'हाऊसफुल्ल'ची नशा

प्रेक्षकाची मिळणारी दाद ही त्याच्या कलाजीवनातील मर्मबंधातली ठेव होती. ती दाद त्यानं अतिशय हळूवारपणान जपली. सतत गोंजारत ठेवली. त्याला ती सतत मिळतही गेली. त्याला माहीत असायचं की आपण ज्या नाटकात काम करतो त्यात आपण केंद्रस्थानी आहोत, असलोच पाहिजे असा आग्रहही असे. म्हणूनच नाटकात काम करणाऱ्या इतर कलावताची नाव सांगून झाली की शेवटी काशिनाथच नाव यायच. त्यातूनच ...आणि डॉ. काशिनाथ घाणेकर ! हा वाक्प्रयोग सर्वतोमुखी झाला या संबंधात त्याला एकदा मी विचारल, तेव्हा तो म्हणाला होता की, सर्व नावं सांगून झाल्यावर आणि ...म्हणून माझं नाव घेतल्यावर प्रेक्षागृहातून जो सुखद प्रतिसाद येतो तो क्षण मी जगतो तो काय असतो ते सांगण्यातल नाही. अनुभवण्यातलंच आहे...!

काशिनाथ हा गर्दीचा नट होता. गर्दी-साठीच होता. गर्दी त्याच्यासाठी होती, म्हणूनच त्याला आपल्या प्रयोगाला हाऊस-फुल्ल बोर्ड पाहण्याच जणू वेडच होतं. ते त्यान अखेरपर्यंत जोपासल. एकदा बालगंधर्व रंगमंदिराच्या तिकीटविक्रीच्या जवळपास तो आणि मी गप्पा मारीत उभे होतो. नाटकाला काहीसा अवकाश होता. मी सहज म्हटलं, डॉक्टर अजून हाऊसफुल्लचा बोर्ड नाही लागला. माझ्या बोलण्याचा रोख ध्यानी घेऊन तो तिकीटविक्रीच्या खिडकीजवळ गेला आणि तिथल्या माणसाला त्यानं विचा-रलं, किती तिकिटं शिल्लक आहेत. तो माणूस म्हणाला, अडीचशे–तीनशे रुपयांची तिकिटं शिल्लक असतील. जातील अर्धा–पाऊण तासात. पण काशिनाथला तेवढा धीर नसावा. त्यान खिशातून तेवढे पैसे काढले आणि त्या माणसाला सांगितल की, हे पैसे घे आणि ताबडतोब बोर्ड लाव. त्याचा शब्द ही आज्ञाच असायची. जशी त्याच्या नजरेत दाहकता होती तशीच शब्दातही होती.

धन–कीर्तीच्या आवर्तात जसजसा तो गुरफटत गेला तसा व्यसनाच्या दुष्टचक्रातही अडकला. त्याच्या अनेक कथा तयार व्हायला लागल्या. जिवतपणीच दतकथा निर्माण होणाऱ्या कलावतात त्याची गणना झाली. अनेकजण त्याच्या सदर्भातल्या कथा स्वत:ची कमीजास्त भर टाकून नाटकाच्या वर्तुळात चवीचवीनं सांगू लागले. धन्यता मानू लागले. काशिनाथ त्या सगळ्याच्या पलीकड होता. तसा तो कोणाचीच तमा न बाळगणारा. फक्त काहीच्यासमोर आज्ञाधारक मुला-सारखा, निरागस असायचा. ह्या खऱ्याखोट्या कथाच्या पलिकड जरी तो गेला तरी त्याच्या वाणीवर–शब्दोच्चारावर जो व्हायचा तो वाईट परिणाम होत राहिलाच. उच्चाराची स्पष्टता, नेमकेपणा, परिणामकारकता तो गमावत होता काय होते आहे ते त्याला कळत असाव, पण वळत नसाव अस सारखं वाटत राहायचं. पण त्या वाटण्याचा काहीच उपयोग नव्हता.

काही वेळेला त्याची अवस्था पाहून वाटा-यचं की, हा रंगमंचावर किती आणि कसा टिकणार आहे ? पण एका अर्थानं भाग्यवान ठरला. कोणत्याही नटाला वाटतं की, आपण चालते-बोलते आहोत, रगभूमीवर काम करतो आहोत, लोकाना हवेहवेसे आहोते तेव्हाच जाव; पण अस इच्छामरण प्रत्ये-काला मिळतच अस नाही. अलीकडच्या काळात शंकर घाणेकरला मिळालं, आता

काशिनाथ घाणेकरला ते मिळालं !

२८ फेब्रुवारीला त्यान दौऱ्यावर जाण्यासाठी पुण सोडलं. त्याच्याआधी तीनच दिवस त्याची भेट पुण्याला पूना गेस्ट हाऊसमध्ये झाली होती. भेट अर्धा-पाऊण तासच झाली. पण का कुणास ठाऊक आयुष्यातल्या अनेक गोष्टीबद्दल तो खूप तपशिलात बोलत होता. आपण आयुष्यात काय मिळवलं, काय गमावल याचा हिशेब सागत होता. घरच्या लोकाबद्दल, नाटकाबद्दल बोलत होता. अनिल जोगळेकरचे ' जादूगार ' नाटक आवडल्याचं सागत होता. पुन्हा 'रायगड' करण्याची इच्छा व्यक्त करत होता. बोलण्यातली उमेद मोठी होती, पण आतून आपण हे सारं करू शकू की नाही याची एक खोलवर बोच त्याला असावी. कारण अधूनमधून विचारायचा की, हे माझ्याच्यान होईल की नाही! निघता निघता म्हणाला, एक काम कर. बॅगेतली एक कादबरी काढून मला दिली. डॉ. शेजवलकराची ' वाझोळ ' नावाची ती कादंबरी होती. ' ही कादंबरी वाचून यातल्या डॉक्टरच्या भूमिकेसाठी माझं नाव नक्की होतंय. त्यावर चित्रपट होतोय. तुझं मत मला हवंय. नुसतं तोडी नको, सविस्तर लिहून पाठव. ' त्याच्यावरच्या अतीव लोभान नाही म्हणण शक्यच नव्हत. वेळात वेळ काढून ती कादबरी मी दोन दिवसात वाचली. कादबरीबद्दल आणि त्याच्या भूमिकेबद्दल आवश्यक ते लिहून पाठवलं. समक्ष जाणं जमलं नाही कारण पुन्हा भेटायच ठरलच होतं...

.. पुन्हा भेट झाली ती एकतर्फीच. कारण तेव्हा सारच संपलं होत. त्याच्या मृतदेहाकडं पाहून वाटत होतं की, आपली तर भेट नाहीच; पण आता कोणाशीच भेट नाही. डॉ. काशिनाथ घाणेकर नावाचं वादळ आता शात झालं होतं. एक झंझावान सपला होता. एक मस्ती निवांत झाली होती. आता या नतर अनेक नवी नाटकं येतील, कदाचित त्यानं केलेली नाटकं पुन्हा कोणी करतील; पण त्यावेळी काशिनाथ नावाचं लोभसवाण नटरुप रंगमचावर असणार नाही. त्याच्याइतके गुणवान किंवा त्याहीपेक्षा अधिक गुणवत्ता असलेले नट आजही आहेत, पुढेही होतील; पण नावाची जादू असलेला, हाऊसफुल्लचा बोर्ड सतत शतकवीरासारखा झळकत ठेवणारा काशिनाथ पुन्हा होणे नाही. आपल्या असण्यानं साऱ्याचं लक्ष वेधून घेणारा, कोणत्याच क्षणाचा भरंवसा देता येणार नाही असा वागणारा, त्याच्या अनेक गोष्टीचा राग येऊनही पुन्हा त्यावर जीवापाड प्रेम करावासा वाटणारा काशिनाथ आता होणे नाही. कदाचित मराठी रगभूमीवर काशिनाथ नावाच असं काही वादळ होऊन गेलं यावर आणखी पाचपन्नास वर्षांनी कोणाचा विश्वास बसणार नाही आजच्या पिढीला बालगधर्व ही जशी ' मिथ ' वाटते तसच याचही होईल. हे वादळ लोभसवाणं होत, जीव घेणारही होत आणि जीव लावणारही होतं, यावर पुढीलांचा कदाचित विश्वास बसणार नाही. ज्यानी हे वादळ कधी दुरून कधी जवळून पाहिलं त्याना धन्य वाटल्याशिवाय राहणार नाही. अशांपैकी मी एक ..! एकच वाटून गेलं की, हे वादळ वयाच्या पचावन्नाव्या वर्षी सपायला नको होतं. हे जाणं अकाली नसल तरी योग्य कालाचंही नव्हतं. म्हणूनच ते चटका लावून गेलं. काळजाचा थरकाप करून गेलं. □

( मुखपृष्ठावरील आणि आतील छायाचित्रे मनोरंजनच्या मनोहर कुलकर्णी याच्या सौजन्याने ! )

---

चित्रपट

## नव्या कलाकारांमुळं प्रेक्षणीय ' लव 86 '

प्रेमकथा हिंदी पडद्याला नव्या नाहीत. फक्त कधी कधी व्हायचं काय की, त्या पडद्यावर दाखवताना वास्तवाशी सबंध अगदीच तुटायचा. आता हिंदी चित्रपटाचा आणि वास्तवाचा सबंध फार थोडा असतो हे सगळयानाच माहीत आहे. पण कॉलेजमध्ये शिकणाऱ्या आणि एकमेकावर भावूक वगैरे प्रेम करणाऱ्या कोवळया प्रेमिकांच्या भूमिका चाळीशी पार केलेल्या नायकान आणि पस्तीशी उलटलेल्या नायिकेनं केल्या तर? हिंदी चित्रपट म्हणून कल्पनाशक्ती आणि सहनशक्ती किंतीही ताणली तरी हे पचनी पडणं थोडं अवघडच. पण हे असले प्रकार सर्रास चालू असताना आणि प्रेक्षकही ' आलिया भोगासी-' म्हणत निमूटपणे ते पहात असताना 'बॉबी'च्या निमित्तानं राजकपूरनं तरुण नायक-नायिकाना पुढं आणायची जी परंपरा सुरू केली ती आता खऱ्या अर्थानं इथं रुजू पहाते आहे.

कथा नेहमीचीच असली, एकूण चित्रपटातच एरवी पहायला गेलं तर काहीही नाविन्य नसलं तरी असा चित्रपट केवळ तरुण आणि ताज्या चेहऱ्यामुळ कसा जिवत होतो याच ताज उदाहरण म्हणजे ' लव 86 '. एरवी कटाळवाण्या होऊ शकणाऱ्या या चित्रपटात फराह, रोहन कपूर, नीलम आणि गोविंदा या चार नवोदित कलाकारानी खरा रंग भरला आहे.

' लव 86 ' हे नावही तसं वेगळ आणि त्यामुळं आकर्षून घेणारं. विकी उर्फ विक्रम (गोविंदा) आणि ओमी (रोहन कपूर) हे दोघं सुशिक्षित पण बेकार. नोकरी मिळत नसल्यानं छोटया-मोठया चोऱ्या करून आणि लोकाना या ना त्या प्रकारे फसवून पैसे मिळवण्यात पटाईत झालेले. त्याची गाठ एके दिवशी लीना ( फराह ) आणि ईशा ( नीलम ) या दोन बहिणीबरोबर पडते. या दोघीची आई लक्ष्मीदेवी (तनुजा) ही श्रीमंत पण अतिशय अहकारी. तिच्या स्वभावामुळेच नवऱ्यापासून ती विभक्त झालेली आणि दोन्ही मुलीही तिच्या स्वभावाला कटाळलेल्या. या चौघाची एकमेकाशी गाठ पडते आणि ते एकमेकाच्या प्रेमात पडतात

ओमी आणि विकी एकदा चोरी करताना पकडले जातात. पण ज्याच्या घरात त्यानी चोरी केलेली असते, त्या रामनिवास तिलकला (शफी इनामदार) त्याच्या चागुलपणाबद्दल खात्री असते. तो त्याना सोडवून आणतो. विकीला पोलीस इन्स्पेक्टर बनायच असतं तर ओमीला बँक ऑफिसर. रामनिवास त्याना आपल्या घरीच ठेवून घेतो.

पुढं या दोघानाही कळत की, लीना आणि ईशा रामनिवासच्याच मुली आहेत लक्ष्मीदेवीच्या स्वभावाला कटाळून तो वेगळा झालेला असतो. तोही या दोघांना साथ द्यायचं ठरवतो. लक्ष्मीदेवीच्या मॅनेजरला (असरानी) हाताशी धरून विकी आणि ओमी एक नाटक रचतात. पण ऐन वेळेस ते फसतं.

थोडया दिवसानंतर मात्र लक्ष्मीदेवी ओमी आणि विकीचं आपल्या मुलीशी लग्न करायचं कबूल करून ह्या दोघानाही आपल्या घरी रहायला बोलावते आणि नतर मात्र त्यांच्यावर चोरीचा आळ आणून त्याना तुरुंगात पाठवते. रामनिवासलाही तो आरोप खरा वाटतो आणि तो या दोघांच्याही सुटकेसाठी प्रयत्न करत नाही.

अर्थात पुढ कालातरानं खरं उघडकीला येत ओमी आणि विकी दोघंही तुरुगातून सुटतात. त्याच्याशी लग्न करण्यासाठी म्हणून लीना आणि ईशाही घराबाहेर पडतात.

शेवटी लक्ष्मीदेवीलाही पश्चाताप होतो आणि ती त्याच्या लग्नाला हजर रहाते

'लव 86 'चं खर आकर्षण आहे त्यातल्या दोन तरुण जोडया त्यामुळ ह्याची कथा अनेकदा वापरून गुळगुळीत झाली आहे याकडे लक्षही द्यायच नाही. आणि या चौघांनीही आपली काम अतिशय उत्साहान केली आहेत. रोहन कपूर, फराह, नीलम यांचा हा दुसरा, तर गोविंदाचा पहिलाच चित्रपट. पण हे सगळेच लोक अतिशय सफाईन, आत्मविश्वासानं आणि मन लावून काम करतात. रोहन–फराह, गोविंदा–नीलम या जोडयाही चागल्या शोभून दिसतात. त्यांच्या चेहऱ्यातला ताजेपणा आकर्षक. रोहन कपूर आणि गोविंदा दोघाकडेही तसं पाहिलं तर हिंदी चित्रपटाच्या नायकाला लागतं तस व्यक्तिमत्त्व नाही. पण त्यानी अतिशय जोषात काम करून ती उणीव भरून काढली आहे. विशेषत: गोविंदा आपल्या नृत्यकौशल्यामुळे अधिकच उठून दिसतो. शिवाय या पहिल्याच चित्रपटात त्याला मिळणारा प्रेक्षकाचा प्रतिसाद पाहिला तर, हिंदी चित्रपटसृष्टीत तो लवकरच स्थिरावेल अशी एकूण चिन्हं दिसतात.

या चौघाना साथ देण्यासाठी आहेत तनुजा-शफी इनामदार. तनुजान अहकारी, रागीट, पैशाची मिजास असलेली लक्ष्मीदेवी मस्त रंगवली आहे. तिचा रागीटपणा उठून दिसण्यासाठी तिला दिलेला चष्मा सोडला तर दिसतेही छान. शफी इनामदारही आपल्या भूमिकेत व्यवस्थित आहे. विनोदासाठी असरानी आणि पांडू आणि साडू म्हणून सतीश शहा आणि रवी वास्वानी या त्रिमूर्तीची योजना आहे. यापैकी असरानी क्वचित जास्त आचरटपणा करतो. पण तो फार हाताबाहेर जाऊ नये एवढी दक्षता दिग्दर्शकान घेतली आहे.

दिग्दर्शक इस्माईल श्रॉफनी चित्राची गती चांगली ठेवली आहे. 'आहिस्ता आहिस्ता', 'थोडीसी बेवफाई' सारखी गभीर चित्रं देणाऱ्या श्रॉफनी एकदम हलक्याफुलक्या करमणुकीकड मोर्चा वळवला आहे हे थोडंस आश्चर्यजनकच. पण चित्रपटाचा हा प्रकारही त्यानी चागला पेलला आहे आणि मनोरजन करायचा प्रयत्न केला आहे ओमी–विकी पोलिसाना आणि इतराना गुगारा देण्यासाठी जी नाटकं करतात किंवा हे चौघेजण लक्ष्मीदेवीना फसवून भेटण्यासाठी जे उपाय योजतात, ते प्रसग त्यानी चागले खुलवले आहेत.

चित्रपटाची तात्रिक अगे ठीक आहेत. लक्ष्मी–प्यारेंनी चित्रपटाची नस बरोबर पकडून सगीत दिल आहे. 'किस्मत अपनी खुल गयी' आणि 'आयी है बारात–' ही गाणी लोकप्रिय होण्यासारखी.

'लव 86' हा तरुण कलाकारांच्या कामगिरीन प्रेक्षणीय बनलेला चित्रपट ८६ साल गाजवणार असा एकूण रग.

–सीमा कुलकर्णी

विज्ञान

## साखरेशिवाय गोडी

साखर, गूळ किंवा तत्सम गोड पदार्थ मनुष्य सनातन काळापासून वापरीत आला आहे. साखर घालून केलेले गोड पदार्थ मुले, मोठी माणसे व कित्येक प्राणीही आनदाने खातात. परतु मधुमेही माणसांना साखर वर्ज्य असते. साखर खाल्ल्यास त्याना त्रास होतो. मधुमेही माणसानाही गोड पदार्थ आवडतात; पण साखरेतून मिळणारी ऊर्जा त्याना अपायकारक असते. म्हणून गोडी मिळेल पण ऊर्जा नसेल– किंवा असलीच तर खूप कमी असेल असे पदार्थ त्याना वापरावे लागतात.

अलिकडे स्त्रीपुरुषांना लठ्ठपणा बिलकुल आवडत नाही हडकुळी नाही तरी सडपातळ शरीरे असणे ही गेली कित्येक वर्षे युरोप–अमेरिकेतली व म्हणून भारतातील उच्चभ्रू, श्रीमंत लोकाची फॅशन आहे. ही माणसे अन्नातील 'कॅलरीज' वर लक्ष ठेवून असतात. ती 'डाएटिंग' करतात. त्यानाही गोडी असून कॅलरीज नसलेले पदार्थ हवे असतात.

हल्ली शीतपेयाचा खप प्रचंड प्रमाणात वाढला आहे व तो दिवसेंदिवस वाढतच आहे. असली पेये गोड असतात पण त्यात साखर वापरीत नाहीत. कारण साखर दिवसेंदिवस महाग होत चालली आहे आणि मुख्य म्हणजे वरील श्रीमत व सडपातळपणाची फॅशन असलेल्या लोकातच शीतपेयाचा मोठा खप असतो. त्यामुळे असल्या पेयातही गोड असून ऊर्जा नसणारे पदार्थ वापरावे लागतात.

फ्रक्टोज म्हणजे फळातून मिळणारी नैसर्गिक साखर. ती ऊसाच्या साखरेपेक्षा दीडपट जड असते. पण एक चमचा साखरेइतकी गोडी आणण्यासाठी वापरावयाच्या फ्रक्टोजमध्ये १२ कॅ. ऊर्जा मिळते. म्हणून फ्रक्टोजचा मोठ्या प्रमाणावर वापर करता येत नाही. 'सॉर्बिटॉल' या वनस्पतिज पदार्थाचा वापरही याच कारणाने फारसा होत नाही. 'झायलिटॉल' हा पदार्थ मनुका, बेदाणे, अलुबुखार, फ्लॉवर इ. अनेक वनस्पतीत आढळतो.यात सॉर्बिटॉलइतकीच गोडी असते; पण त्यापासून १८ कॅ. उष्णता मिळते. शिवाय हे दोन्ही पदार्थ सारक असतात. त्यामुळे ते मधुमेही लोकांना फारसे उपयुक्त ठरत नाहीत

सॅकरिनचा वापर कित्येक वर्षे साखरेचा पर्याय म्हणून जगभर होत आहे. हा सेंद्रीय पदार्थ असून साखरेपेक्षा ३०० पट गोड असतो. त्यापासून ऊर्जाही मुळीच मिळत नाही त्यामुळे सॅकरिन हा अगदी आदर्श मधुरक (Sweetner) ठरला होता. वर्षानुवर्षे निरनिराळया नावाखाली अनेक कपन्यानी सॅकरिनची विक्री केली. परतु गेल्या दशकातील प्रयोगानी सॅकरिनमुळे हृदयविकाराना चालना मिळते असे आढळ्याने ते एकदम मागे पडले. 'सायक्लॅमेट' हा सेंद्रीय पदार्थही काही वर्षे मधुरक म्हणून वापरात होता. परतु त्याचा मूत्रपिंडाच्या कॅन्सरशी सबध आहे, असे कळल्यापासून त्यावर भारत व अमेरिका या देशात बदी आहे. मात्र त्याचा कॅन्सरशी असलेला सबंध निर्विवादपणे सिद्ध झालेला नसल्याने, इतर अनेक देशात सायक्लॅमेट अद्यापही वापरले जाते. तसेच शीतपेयात अजूनही सॅकरिन वापरतात. या सर्व मधुरकांचा एक प्रमुख दोष म्हणजे त्यांचा वापर केलेले पदार्थ खाऊन किंवा पिऊन झाल्यावर जिभेवर एक कडवट चव पुष्कळ वेळ रेंगाळत रहाते.

वरील सर्व दोषावर मात करून अगदी कमी ऊर्जा (फक्त २ कॅ.) असलेला, साखरेपेक्षा २०० पट गोडी देणारा एक नवा मधुरक शास्त्रज्ञानी तयार केला आहे 'अॅस्पारटेम' हा अॅमिनो अॅसिडापासून तयार केलेला, पहिला कृत्रिम मधुरक आहे. हा पदार्थ निसर्गात मुळीच आढळत नाही. सपूर्णपणे मानवनिर्मित अॅस्पारटेम पाश्चात्य देशात 'न्युट्रास्वीट' या व्यापारी नावाने बाजारात आले आहे. ते पूर्णपणे दोषमुक्त आहे किंवा कसे, याविषयी अजून काही ठिकाणी प्रयोग चालू आहेत 'अॅस्पारटेम' पूर्णपणे निर्दोष ठरल्यानतरच ते भारतात येईल असे दिसते. □

('सायन्स टु डे', वरून)

नाव

'पेनिसिलिन' हे नाव त्या औषधाचे स्फटिक पेन्सिलीसारखे दिसतात म्हणून दिलेले आहे. पण एका फ्रेंच शास्त्रज्ञाने शोधलेल्या एका जीवरक्षक औषधाचे नाव 'स्टोन्हेन' असे आहे. कारण त्या शास्त्रज्ञाच्या फ्रेंच नावाचा इंग्रजीत 'स्टोन्ह' असा अर्थ होतो !

–भा. रा. बापट

MANOOS WEEKLY (Licensed to post without prepayment of postage No-11) Regd. No. PNCW-28

प्रकाशित झाले

या कॉम्प्यूटरमध्ये दडलंय काय ?

आणि

ऊर्जा प्रश्न : आशा उद्याच्या

यानंतरचे

व्यावहारिक—व्यावसायिक उपयोगाचे

आणखी एक राजहंस प्रकाशन

# लघुउद्योग मार्गदर्शक

लेखक : शिरीष सहस्रबुद्धे

आकार : डेमी । पृष्ठे : २४०

किमत : ६५ रुपये

छोटे उद्योग चालू करणं, अन् यशस्वी करणं
यासाठी उद्योजकांना-बँकेच्या आणि सरकारी अधिकाऱ्यांना
असायलाच हवी अशी चौफेर, ताजी, बहुमोल माहिती
मराठीत प्रथमच एकत्र.

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०. फोन : ४४ ३४ ५९

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर, दादर
मुंबई : ४०० ०२८ * फोन : ४२२ ५४५५, ४२२ ३९०१